**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४२९

निर्णय दिनांक- ०१-०९-२००७.

| | | |
|---|---|---|
| श्री.विलास केशव देव,<br>एन-११, के-३७/११<br>नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>मिलींद मल्टीपरपज हायस्कूल,<br>नागसेनवन, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, पिपल्स एज्युकेशन सोसायटी,<br>आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट,<br>मुंबई-४०००२३. | | |

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०१-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.विलास केशव देव ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मिलींद मल्टीपरपज हायस्कूल नागसेन वन औरंगाबाद,श्रीमती लिना डेसंमद आयसॅक (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.तर जनअपिलीय अधिकारी

तथा सचिव पिपल्स एज्यूकेशन सोसायटी (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे श्री. आमराव यांची विद्यालयात लिपीक म्हणून झालेल्या नेमणूकीबद्दल सन २००४ ते २००५ व २००५- २००६ व २००६- २००७ या कालावधीतील एकूण खालील प्रमाणे १६ मुद्यावर माहिती मागविली होती.

"१. आपल्या विद्यालयात श्री.आमराव यांची लिपीक म्हणून नेमणूक केलेली आहे असे समजले. त्याबद्दल माहिती कळवावी.

२. आपल्या विद्यालयात २००४-२००५, २००५-०६ व २००६-०७ या वर्षात संचमान्यतेप्रमाणे किती पदे रिक्त आहेत ? ( संचमान्यतेची झेरॉक्स प्रत द्यावी)

३. रिक्त पद भरण्यासाठी नियमाप्रमाणे जाहिरात दिली आहे काय दिलेली असल्यास कोणत्या दैनिकात जाहीरात दिली ? ( जाहीरातीची झेरॉक्स प्रत द्यावी)

४. आपण त्यासंबंधीचा प्रस्ताव संस्थेकडे कधी पाठविला होता ? (झेरॉक्स प्रत द्यावी)

५. संस्थेने त्यांची नेमणूक कधी केली ? (झेरॉक्स प्रत द्यावी)

६. आपण मान्यतेसाठी जिल्हा परिषदेकडे त्यांचा प्रस्ताव कधी पाठविला ? (झेरॉक्स प्रत द्यावी)

७. जिल्हा परिषदेने मान्यता दिली का? असल्यास त्यांचे पत्राची झेरॉक्स प्रत द्यावी.

८. श्री.आमराव यांची नेमणूक करण्याकरिता शालेय कार्यकारणीची बैठक कधी बोलावली होती ? बोलाविली असल्यास कार्यकारणीमध्ये किती व कोणते सभासद होते ? (यादीची झेरॉक्स प्रत देणे)

९. सदर नेमणूकीला मान्यता घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडे आपण ठराव पाठवला होता का?

१०.मुलाखत घेतली आहे काय ? घेतली असल्यास मुलाखतीस किती संस्थेतील व शाळेतील सदस्य व किती बाहेरील व्यक्ती आल्या होत्या ? (मुलाखतीस आलेल्या सदस्यांची/ कर्मचा-यांची यादीची झेरॉक्स प्रत द्यावी)

११.पदे (रिक्त) भरण्याकरता संस्थेत व शाळेत काम करणा-या कर्मचा-यांच्या पदोन्नती करिता आपण काय केले ?

१२.पदोन्नती करिता किती संस्थेतील व शाळेतील कर्मचा-यांचे अर्ज आपणांकडे आलेले आहेत ? ( झेरॉक्स प्रत द्यावी)

१३.आपल्या विद्यालयात शिक्षकेतर कर्मचा-यामध्ये किती कर्मचारी अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती व ओपन कॅटेगरीमध्ये आहेत ? याबद्दल माहिती कळवावी.

१४.२००४-२००५, २००५-०६ व २००६-०७ या तीन वर्षात आपल्याकडे रिक्त जागे करता किती अर्ज आले आहेत ? त्यापैकी किती निकाली काढले ?

१५.श्री.आमराव यांची नेमणूक कोणत्या नियमाने केली आहे ?

१६.श्री.आमराव यांना कोणत्या तारखेपासून आपण रोजंदारीप्रमाणे वेतन देत आहात ? व जिल्हा परिषदेने कोणत्या तारखेपासून त्यांचे वेतन मंजूर केले ? (दोन्ही वेतनाच्या रकमा नमूद करणे )"

अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे स्वरुप पहाता अपिलार्थीनी ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ही माहिती पोष्टाने अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक-१७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, " आपण विचारलेल्या बाबीवर उत्तर देण्यास व माहिती पुरविण्यास पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यालय, मुंबई हेच केवळ सक्षम आहेत. अशा परिस्थितीत सदरहू बाबीवर

टिप्पणी करणे हे माझ्या कार्यक्षेत्राचा विचार करता उचित नाही. करिता माहितीच्या अधिकाराचा कायदा २००५ यातील कलम ६ (३) नुसार पिपल्स एज्यूकेशन सोसायटी, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे." असे उत्तर देवून अपिलार्थीनी संस्थेशी संपर्क साधण्याचे त्यांना सूचित केले. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतूदीनूसार दिनांक- ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे अथवा अपिलार्थीस यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा नकारात्मक प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना लेखी स्वरुपात लवकरात लवकर मिळावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी संस्थेकडे वेळोवेळी ब-याच वेळा विनंती अर्ज केलेले आहेत. तथापि त्यांच्या प्रयत्नाना अद्यापपर्यंत यश आलेले नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांना माहिती अधिकार कायद्यातील कलमांची कोणतीही माहिती नाही.

या प्रकरणामध्ये आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेलया माहितीवरुन सदर शिक्षण संस्थेने जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापीका मिलींद  मल्टीपर्पज हायस्कल, नागसेन वन औरंगाबाद यांची जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. तथापि या जनमाहिती अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीचे किमान आवश्यक ते ज्ञान अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. माहिती अधिकारातंर्गत त्यांना नेमून दिलेल्या विहित कर्तव्य त्या आवश्यक त्या कार्यक्षमतेने पार पाडू शकतील किंवा कसे याचीही तपासणी ही संबंधित संस्थेने केल्याचे  दिसून येत नाही. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या दिनंक- ०३-०१-२००७ रोजीच्या अपीलावर विहित मुदतीत जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही किंवा त्या अपीला संदर्भात अपिलार्थी यांना साधे पत्र पाठविण्याचे सौजन्य त्यांनी दाखविले नाही.  ही निश्चितपणे खेदाची  बाब आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जाची दखल न घेणे व विहित मुदतीत अपील न ठरविणे, या त्यांच्या कृती त्यांच्यातील माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रति त्यांच्या मनात असलेला अनादर व बेफिकीरवृत्ती स्पष्ट करतात.त्यांच्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीची, अध्यक्ष पिपल्स एज्यूकेशन सोसायटी, मुंबई यांनी यथायोग्य दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी जी माहिती जनमाहिती अधिका-याकडे मागितली आहे ती संपूर्ण माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये ज्या मुद्यावर संस्थेस खुलासा करण्याची व कारणे देण्याची अपेक्षा अपिलार्थी यांनी व्यक्त केली आहे, त्या प्रश्नाना जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जरी काही मुद्यावरील माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असली तरी ती माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे व त्यांना ती अपिलार्थीस देणे सहज शक्य आहे, असे आढळून आले आहे. त्यामूळे अपिलार्थीने केवळ प्रश्नार्थक

माहिती विचारली आहे. या साध्या तांत्रिक उणीवेचा बाऊ न करता, या मुद्यावरिल माहिती, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी. असे आदेशित करण्यात येत आहे त्याच बरोबर पुढे असेही आदेशित करण्यात येत आहे की, या संस्थेतील क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचा-यांना अद्यापही माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे किमान ज्ञानही प्राप्त नाही. या करिता संस्था व्यवस्थापनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाळातील कर्मचा-यांकरिता व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील कर्मचा-यांकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/ शिबीरे आयोजित कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर सात दिवसाच्या आत अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, साक्षांकित करुन स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.
३. संस्था व्यवस्थापनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाळातील कर्मचा-यांकरिता व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील कर्मचा-यांकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळ/ शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- ०१-०९-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. विलास केशव देव, एन-११, के-३७/११, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मिलींद मल्टीपरपज हायस्कूल, नागसेवनवन,औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा सचिव, पिपल्स एज्युकेशन सोसायटी आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, पिपल्स एज्युकेशन सोसायटी,मुंबई, आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड,मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

निर्णय नस्ती.**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६५
निर्णय दिनांक- ०१-०९-२००७

१ श्री.रामराव नागनाथराव रत्नागिरे, : अपिलार्थी

पोलीस स्टेशन जवळ कुंडलवाडी,
तालूका- बिलोली, जिल्हा-नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगरपरिषद,कुंडलवाडी, तालूका-बिलोली
जिल्हा- नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०१-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.रामराव नागनाथराव रत्नागिरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, कुंडलवाडी, ता.बिलोली (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,श्री.सोमनाथ सा.गुंजाळ (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

“ मयत श्री.रत्नागिरे रामराव नागनाथराव यांची नगरपरिषदे मधील वैयक्तीक संचिका व सेवा पुस्तिकांची झेरॉक्सप्रत.”

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलाची सुनावणी दिनांक- १५-०७-२००६ रोजी सुनावणी घेवून जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीने विनंती केल्यानुसार अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले.

जनअपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्या नंतरही अपिलार्थीच्या वडीलाची सेवापुस्तिका व वैयक्तीक संचिका पैकी मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०२-०८-२००६ रोजी अपिलार्थीस फक्त सेवापुस्तिकाची झेरॉक्सप्रत दिली आहे. वैयक्तिक संचिकेची प्रत दिली नाही. वैयक्तिक संचिकेबाबत अपिलार्थीने संबंधित नगर परिषदेकडे विचारणा केली असता, वैयक्तिक संचिका त्यांनी त्यांच्या कार्यालयात ठेवली नसल्याचे अपिलार्थीस सांगितले जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होवूनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक- २९-०८-२००६ रोजी विभागीय आयुक्त महसूल विभाग औरंगाबाद यांच्याकडे व्दितीय अपील केले आहे. सदर अपीलअर्ज दिनांक- ३१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्तांनी  मुख्य राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे  पाठविला असून त्याची नोंद मुख्य माहिती आयुक्त कार्यालयात दिनांक- ०५-०९-२००६ अशी घेण्यात आली आहे. या अपीलअर्जा मध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना उद्देशून एक पत्र लिहीले आहे. या पत्रामध्ये त्यांनी त्यांना नगरपरिषदेकडून प्राप्त झालेल्या त्यांच्या वडीलाच्या सेवापुस्तिकेत असलेल्या त्रुटी आयुक्तांच्या (आता आयोगाच्या) निदर्शनास आणून दिल्या आहेत. अपिलार्थीस देण्यात आलेल्या त्यांच्या वडीलाच्या सेवापुस्तिकेमध्ये अनेक त्रुटी असल्याने, ही

माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे. असे अपिलार्थीचे मत तयार झाले आहे त्याच बरोबर त्यांच्या वडीलाच्या सेवापुस्तिकामध्ये रजेची चुकीची नोंद घेतली असल्याने या रजेच्या रोखीकरणाची रक्कम त्यांना मिळाली नाही व परिणामी त्यांचे आर्थीक नुकसान झाल्यामूळे त्यांना माहिती अधिकाराच्या अर्जाचा मार्ग अवलंबावा लागला, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामूळे त्यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी ता.बिलोली यांना जबरदंडीत करण्याची विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत. अपिलार्थीस जनअपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्या प्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. आता या माहितीमध्ये त्रुटी असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे व या त्रुटी असल्याने ही माहिती चुकीची , दिशाभूल करणारी व खोटी आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या मते जर त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये काही त्रुटी असतील तर त्या त्रुटीचे निराकरण त्यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयाकडून किंवा त्यांच्या वरिष्ठाकडून करुन घ्यावयास हवे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थीने दिनांक- २७-०२-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस हवी असलेली माहिती दिनांक- २६-०३-२००६ पूर्वी किंवा तत्पूर्वी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविणे आवश्यक होते. तथापि ही माहिती अपिलार्थीस, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०२-०८-२००६ रोजी पुरविली आहे. म्हणजेच ही माहिती अपिलार्थीस देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी ९८ दिवसाचा विलंब लावल्याचे निःसंशयपणे या प्रकरणी सिध्द होत आहे. सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्यास जनमाहिती अधिकारी यांना काय अडचणी आल्या होत्या, हे कळण्यास त्यांच्या अनुपस्थितीमूळे

मार्ग नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली आहे. हे निःसंशयपणे सिध्द झाल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतूदीस ते पात्र ठरतात. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की,-

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त विलंबाने अपिलार्थीस माहिती पुरविल्याने त्यांच्यावर संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांनी प्रचलित सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी .
२. मयत श्री.रत्नागिरे नागनाथराव रामराव यांच्या सेवापुस्तिकेमध्ये काही त्रुटी असल्यास त्यांची पुर्तता मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत करुन आयोगास आपला अहवाल सादर करावा.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त विलंबाने अपिलार्थीस माहिती पुरविल्याने त्यांच्यावर संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांनी प्रचलित सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.
३. मयत श्री.रत्नागिरे नागनाथराव रामराव यांच्या सेवापुस्तिकेमध्ये काही त्रुटी असल्यास त्यांची पुर्तता मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी यांनी हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत करुन आयोगास आपला अहवाल सादर करावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- ०१-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.रामराव नागनाथराव रत्नागिरे, पोलीस स्टेशन जवळ कुंडलवाडी, तालूका- बिलोली, जिल्हा-नांदेड.
२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी, तालूका. बिलोली, जिल्हा- नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,(सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा ईमारत, तीसरा मजला, सरपोच खानवाला मार्ग, वरली, मुंबई-३०, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७८**

| | |
|---|---|
| **निर्णय** | **०१-०९-** |
| **दिनांक** | **२००७** |

श्री. अ. लतीफ कुरेशी, : अपिलार्थी

दक्ष नागरिक समिती, मु. पो. आखाडा

बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,

जिल्हा हिंगोली

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अ. लतीफ कुरेशी, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी यांचे प्रतिनिधी श्री. मधुकर गोविंदराव खंडागळे, अव्वल कारकून हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, हे गैरहजर आहेत. उपविभागीय अधिकारी हिंगोली यांच्या गैरहजेरीबद्दल आयोगाने तीव्र नापसंती व्यक्ती केली असून याची विभागीय आयुक्त (महसूल) यांनी नोंद घ्यावी असे त्यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी सूचित करण्यात येते.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०३-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आर्थिक वर्ष २००४-२००५ या कालावधीतील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“ संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत वर्ष २००४-२००५ साठी मंजूर करण्यात आलेले व कामासाठी धान्य देण्यात आले त्याबद्दल मी मागे दिलेल्या तक्त्याप्रमाणे.”

अपिलार्थीने या माहिती अर्जाच्या मागे एक प्रपत्राचा नमुना जोडला असून त्यामध्ये कामाचे नांव, गावाचे नांव, या योजनेतील धान्य वाटप करण्यात आलेल्या स्वस्त धान्य दुकानदाराचे नांव व पत्ता, गहू व तांदुळ यांचे परिमाण (क्विंटलमध्ये), स्वस्त धान्य दुकानदाराला तहसील गोदामातून धान्य देण्यात आले ती तारीख, स्वस्त धान्य दुकानदाराने मजुराकडील धान्याचे कुपन्स तहसील कार्यालयास परत केले ती तारीख या माहितीचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००६ रोजी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांनी तयार केलेल्या नमुन्यात तयार नसल्याने ही माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व त्याच बरोबर त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेले या विषया संदर्भातील अभिलेखे अपिलार्थीस निरीक्षणास देऊन त्यावर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीने त्यांचे कार्यालयात हजर राहून घेऊन जाण्यास अपिलार्थीस सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या दिनांक ३१-०३-२००६ च्या उत्तरास अपिलार्थी यांनी दिनांक १५-०४-२००६ रोजी एक पत्र देऊन जन माहिती अधिकारी यांना त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी ते ज्या स्वरुपात देऊ शकत असतील त्या स्वरुपात देण्याविषयी विनंती केली आहे. व या दुस-या पत्रामध्ये त्यांनी आपले मूळ माहितीतील मुद्दे कायम ठेवले आहेत. तथापि अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२००६ च्या पत्रावर देखील जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

अपिलार्थीस प्रयत्न करुनही आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक २३-०५-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक २४-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदर अपिलाचा सुनावणीचा निकाल जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२००६ रोजी पारीत केला व निकालामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले आहे व अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी तहसील कार्यालयातील अभिलेख्याचे निरीक्षण करुन आवश्यक ती फी तहसील कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने अभिलेखाचे निरीक्षण करुन फीस भरल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती देण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीचे अपील नामंजूर करण्याप्रित्यर्थ जन अपिलीय अधिकारी यांनी असे कारण दर्शविले आहे की, तहसीलदार कळमनुरी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात त्यांच्याकडील दिनांक ३१-०३-२००६ च्या पत्रान्वये अभिलेख्याचे निरीक्षण करुन व ते घेऊन जाण्याविषयी सूचित केल होते. तथापि या निरीक्षणप्रित्यर्थ अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांनी वेळोवेळी प्रयत्न करुनही त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्याप्रित्यर्थ

बोलाविले असता ते निरीक्षणासाठी का गेले नाही असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नेहमीच उडवाउडवीची उत्तरे दिली जातात व माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते असे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला आहे. या युक्तिवादा-मध्ये अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती निरीक्षणाच्या संदर्भात हजर राहिले नाहीत या त्यांच्या मुद्दयावर भर दिला आहे. त्याच बरोबर अपिलार्थी यांनी नियमाने माहिती हस्तगत न करता त्यांनी ही माहिती मिळविण्याकरिता उपविभागीय अधिकारी यांच्या कडे अपील केले. त्यामुळे अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याची गरज नसल्याचे व अपिलाथीने जन माहिती अधिकारी यांना केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने हे प्रकरण तयार केले आहे असे निर्देशित करुन अपिलार्थी यांना लागणारी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून देण्याची कारवाई चालू असतांनाच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळले त्यामुळे त्यांना आयोगाकडे देखील अपील करण्याचा हक्क राहत नाही असे पुढे म्हटले आहे व या लेखी पत्रामध्ये अपिलार्थीचे अपील फेटाळण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जाची तपासणी करता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने माहितीसाठी जो अर्ज केला होता त्यामध्ये त्यांनी लेखी स्वरुपात माहिती अपेक्षिली होती. त्यांनी मूळात केलेला अर्ज हा माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीच केला होता. त्यांनी या अर्जामध्ये कुठेही अभिलेख्याच्या निरीक्षणाचा उल्लेख केलेला नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने निरीक्षण करण्याची कोणत्याही प्रकारची मागणी केली

नसतांना, अपिलार्थीस अभिलेख्याचे निरीक्षण करण्यास निमंत्रित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती चुकिची आहे. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ही माहिती देण्यासाठी लागणा-या शुल्काची माहिती अपिलार्थीस त्यांनी सर्व प्रथम शुल्काच्या सर्व तपशिलासह कळवावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख्याचे निरीक्षण करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात निमंत्रित केले. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ मध्ये माहिती अधिकार अधिनियमातंर्गत माहितीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर पुढे कशा प्रकारे प्रक्रिया करावयाची याचे विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले आहे तथापि जन माहिती अधिकारी यांनी या कलमातील तरतुदीप्रमाणे कारवाई केलेली नाही. दुसरी बाब अशी की माहिती अधिकार अधिनियम ७ (९) अंतर्गत " सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरुपात ती सर्वसाधारणपणे, पुरविण्यात येईल." असे म्हटले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) वरील तरतुदींचा अंर्तभाव केल्यास व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहिल्यास सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ मागितलेल्या तक्त्यामध्ये माहिती देण्यास हरकत नाही. तथापि तदनंतरही अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०४-२००६ च्या पत्रामध्ये एकूण ६ मुद्दयावर ही माहिती मागविली आहे. किमान त्या ६ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे हे सहज शक्य आहे व ही माहिती देण्यास प्रमाणा-बाहेर साधनसामुग्री लागण्याची अथवा अवाजवी खर्च लागण्याची शक्यता नाही असे आयोगास वाटते. हे विधान करतांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे या योजने अंतर्गत सर्व अभिलेखे

व्यवस्थित व नियमितपणे ठेवलेले आहेत असे गृहीत धरले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांचे मनात कोठेतरी पुर्वग्रह दुषित दृष्टीकोन आहे की काय याची आयोगास शंका येते. मूळात अपिलार्थीने अभिलेखे पाहण्याची मागणी केली नव्हती, तरी त्यांना अभिलेखे पाहाण्यास बोलविणे अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यापोटी लागणारे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून न कळविणे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर केलेली कृती चुकिची ठरते व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे ग्राह्य धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला अपील निर्णय चुकिचा ठरतो. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कोणत्याही नागरिकास माहिती मिळणे हा त्यांचा हक्क आहे परंतु या हक्क पुर्ततेपासून त्यांना अनेक सार्वजनिक प्राधिकरणकडून वंचित ठेवले जाते. सदर प्रकरण हे त्यापैकीच एक आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०१ सप्टेंबर २००७	राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१	श्री. अ. लतीफ कुरेशी, दक्ष नागरिक समिती, मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२	जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६७
निर्णय दिनांक- ०३-०९-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.महंमद अन्वरुल्लाहखान,<br>९-४-४५५, कय्युम प्लॉटस, नांदेड. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जल<br>निस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर,<br>महानगरपालिका, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. | | |

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. महंमद अन्वरुल्लाह खान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सध्याचे जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, श्री.एस.व्ही.कायंदे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) सध्याचे जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. विष्णू गोर्वधनदास झंवर (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०४-१२-२००६ रोजीच्या रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सप्टेंबर, २००५ ते डिसेंबर, २००६ या कालावधीतील कव्छीकॉलनी, साईनगर व प्रभाग ११ च्या कय्यूमप्लॉट मधील जलवाहिनीच्या कामाच्या बील संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली आहे.

“1 Xerox copy of the last C.C. through Which the payment was done.

2 Was there any Part Rate & Reduced Rate made for the Items, of yes, the Give the reasons with all the copies of office notes.

3. Was there any enquiry ordered for this work, what was the final report submitted to the office after completing the investigation. Provide the Xerox copy of the said report.

4. Was any Engineer (s) found guilty by the investigating officers in performing his duties . If yes, then what action have been taken, then why the delay in taking the action ? Give the reasons. ”

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात व अभिप्राय अथवा कारणे असलेली माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नल्याचे स्पष्ट करण्यात आले. अपिलार्थी यांच्या वरील प्रमाणे केलेल्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित मुदतीत अधिनियमातील तरतूद कलम ७ (१) प्रमाणे कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००७ रोजी झाली. सुनावणीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या

दिनांक- १२-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २८-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी माहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे या प्रकरणी एकच असल्याचे व कायद्यामध्ये अशी तरतूद आहे काय ? अशी आयोगास विचारणा केली आहे व त्याचबरोबर त्यांना जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणीपूर्वी फक्त एकच तास आधी सुनावणीची सूचना दिली होती, हे बरोबर किंवा कसे, यावर त्यांनी आयोगाकडे विचारणा केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती दिनांक- ०३-०१-२००७ पूर्वी अगर तत्पूर्वी द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ०७ (१) मध्ये विहित केलेल्या तरतूदीनूसार न देता अपिलार्थीस ही माहिती दिनांक-१२-०२-२००७ रोजी म्हणजेच ४० दिवस इतक्या उशिराने दिलेली आहे. हे निर्विवादपणे सिध्द होते. जनमाहिती अधिकारी यांचे या विलंबा प्रित्यर्थ असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे चौकशी अहवालाची प्रत मागितली होती. तो अहवाल त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हता. आता तो अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील ७ (१) मध्ये अपिलार्थीच्या विनंतीचा अर्ज निकालात काढण्या विषयी केलेल्या तरतूदी स्पष्ट आहेत. त्यानूसार जनमाहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध असलेली महिती देवून जी माहिती त्याच्याकडे त्यावेळी अनुपलब्ध आहे ती माहिती अनुपलब्ध असल्याचे कळवयास हवे होते. तथापि त्यांनी यापैकी कोणतीही कृती केली नाही.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे एकच  होते. अपिलार्थी यांच्या मते सुनावणी श्री.कायंदे, उपविभागीय अभियंता यांनी घेतली तर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा जलनिस्सारण विभाग नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड श्री. राम सायन्ना लोलापोड यानी या प्रकरणाची सुनावणी घेतलेली आहे. आता ही सुनावणी नक्की कोणी घेतली हे कळण्यास मार्ग नाही. तथापि या सुनावणीतील चर्चे नंबर अपिलार्थीस जी माहिती द्यावयाची आहे, त्या माहितीची स्थळप्रती पाहिल्या असता त्याच्यावर श्री.राम सायन्ना लोलापोड,कार्यकारी अभियंता  यांच्या सहया असलेल्या दिसतात. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अपील सुनावणीच्या पत्रावर देखील उपअभियंता यांची सही आहे. अपिलावर सुनावणीच्या आमंत्रण पत्रावर जरी जनमाहिती अधिकारी यांची स्वाक्षरी असली तरी ते जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाचा एक भाग असल्यामूळे त्यांच्या सहीबद्दल हरकत असू नये, अपिलार्थीस सुनावणीचे पत्र  जरी सुनावणीच्या आधी एक तास मिळाले तरी अपिलार्थी या सुनावणीस हजर राहीले, ही बाब नजरेआड करुन चालत नाही. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस सुनावणी हजर होण्याच्या पूर्वी सुनावणीची कल्पना  सर्वसाधारणतः १० ते १५ दिवस इतक्या आधी अपिलार्थीस देणे सर्वमान्य पध्दत आहे.. तथापि या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या दिवशी पत्र दिले त्याच दिवशी सुनावणी घेतल्याचे व त्यास अपिलार्थी उपस्थित असल्याचे दिसून येते.

जर ही व्यवस्था अपिलार्थीस मान्य नव्हती तर अपिलार्थीने अपिलाच्या सुनावणीस हजर राहावयाचे नव्हते. तथापि त्यांनी तसे केले नाही. तसेच या प्रकरणातील मूळ मुद्दा अपिलार्थीस माहिती, माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण हा असून या मुद्दापूढे अपिलार्थीने उपस्थित केलेले हे मुद्दे गौण ठरतात. त्यामूळे त्या मुद्यांचा विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी यापूढे अपील

सुनावणीची पत्रे देतांना सतर्क राहावे. अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे. याच बरोबर अपिलार्थी यांनी त्यांना मुद्या क्रमांक-३ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून अद्यापही अप्राप्त असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. संबंधित चौकशी अहवाल आता जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाला असून त्यातील निष्कर्षा प्रमाणे सर्व संबंधितावर आता आवश्यक ती कार्यवाही सुरु झाली असल्याने या अहवालाची प्रत अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी सात दिवसात विनामूल्य द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात उध्दृत केलेली वस्तुस्थिती व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता असे आदेशित करण्यात येते की -

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता मुद्दा क्रमांक ३ ची संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती न दिल्यामूळे सचिव, पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रचलित सेवा नियमानूसार जनमाहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता मुद्दा क्रमांक ३ ची संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती न दिल्यामूळे सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांनी प्रचलित सेवा नियमानूसार जनमाहिती अधिकारी याच्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ०३-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.महमद अन्वरुल्लाह खान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, पाणी पुरवठा व जल निस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जल निस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६८**

**निर्णय दिनांक** **०३-०९-२००७**

श्री. प्रसाद माणिकराव देशमुख, : अपिलार्थी
दत्तनगर, कारेगाव रोड,
परभणी, जिल्हा परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उप
संचालक, आरोग्य सेवा औरंगाबाद यांचे
कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रसाद माणिकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. विनायक नरहर जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्याच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " माझ्या अनुकंपा तत्वावरील मॅटमधील प्रकरणात आपण आपल्या दिनांक ०८-०९-२००६ च्या शपथपत्रात म्हटले आहे की, श्री. मगर, साबळे, जाजू व खान यांना आपल्यातर्फे अनुकंपा तत्वावर दिलेल्या नेमणूका सह संचालक आरोग्य सेवा (हि. व ह.) पुणे यांच्या अलोटमेंट नुसार दिल्या आहेत. तरी सदरील अलोटमेंट केलेल्या पत्राची एक प्रत देण्यात यावी. "

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली असून माहितीशी संबंधीत कालावधी सन १९९१ नंतर असा दर्शविला आहे.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये याच माहितीकरिता प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी झाली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही कारण जन अपिलीय अधिकारी हे आज सुनावणीस विनापरवानगी गैरहजर आहेत. सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्राखालील जन माहिती / अपिलीय अधिका-यांना राज्य माहिती आयोगाचे सुनावणीस ज्या ज्या वेळी बोलावणे येईल त्या त्या वेळी त्यांनी पुर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहू नये अशा आशयाच्या सूचना त्यांच्या पातळीवरुन प्रस्तुत कराव्यात. सुनावणीच्या वेळी विनापरवानगी गैरहजर राहण्याची त्यांची कृती, माहिती अधिकार अधिनियमाविषयी त्यांच्या मनात असलेला अनादर स्पष्ट करते याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २८-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना सह संचालक आरोग्य सेवा पुणे यांनी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना, सन १९९१ ते १९९१ या कालावधीतील नियुक्ती देण्यासंदर्भात ज्या सूचना दिल्या होत्या, त्या सूचना पत्राची प्रत अपिलार्थीस आवश्यक असल्याचे त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदीनुसार कोणतीही कारवाई केली नाही हे मान्य केले. अपिलार्थीने मागितलेल्या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयात प्रथमतः शोधण्यात येत आहे आणि ही प्रत त्यांच्या कार्यालयात जर सापडली नाही तर सह संचालक आरोग्य सेवा यांच्या कार्यालयात जाऊन ती प्रत शोधण्यास देखील त्यांनी आयोगासमोर आज तयारी दर्शविली आहे.

या प्रकरणातील घडमोडींचा घटनाक्रम पाहिला असता सार्वजनिक आरोग्य खाते जन सामान्यांकडून त्यांच्याकडे आलेल्या अर्जाची कशा प्रकारे विल्हेवाट लावते याचा हे प्रकरण म्हणजे उत्तम नमुना आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरु नये. या प्रकरणी अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांना विहित मुदतीत मिळणे हा अपिलार्थीचा हक्क आहे तथापि तो हक्क देखील त्यांना कशा दृष्टीने बजावता येणार नाही अशा प्रकारचे वर्तन आरोग्य संचालनालयातील कर्मचा-यांचे असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत द्यावयाची असते एवढी साधी माहिती अधिकाराच्या अधिनियमातील तरतूद देखील आरोग्य संचालनालयाच्या कर्मचा-यांना व अधिका-यांना माहित नसावी ही दुर्दैवाची

बाब म्हटली पाहिजे.  अपिलार्थीने अर्ज केल्यापासून १ महिन्याचा लागणारा कालावधी व्यापगत होऊनही अपिलार्थीस हवी ती माहिती देण्याबाबत आरोग्य संचालनालयाकडून काहीही केल्याचे दिसून येत नाही.  उपस्थित जन माहिती अधिकारी हे आता असे सांगत आहे की, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या पत्राची प्रत त्यांना दिली नाही.  वास्तविक हे प्रकरण न्यायालयामध्ये असणे आणि अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रांची मागणी करणे याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. **प्रकरण जरी न्यायप्रविष्ठ असले तरी अपिलार्थीने केलेली विनंती जोपर्यत माहिती अधिकार अधिनियमाचे कलम ८ व ९ च्या तरतुदीस छेद देत नाही, तोपर्यत माहिती अधिकाराच्या अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने माहिती मागणी हा अपिलार्थीचा हक्क असतो व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असते.**  या प्रकरणी तसे कर्तव्य जन माहिती अधिकारी यांनी पार पाडले नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.  तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केवळ अपिलार्थीची, त्यांना आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत न देऊन, केवळ अडवणूक केली एवढेच नव्हे तर माहिती अधिकार अधिनियम २००५ बद्दल त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांनी आपल्या कृतीव्दारे दाखविला आहे.  त्यांची, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कृती, त्यांच्या कार्यशैलीमध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव असल्याचे स्पष्ट करते व त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केल्याचे सिध्द करते.

उपरोक्त विवेचनावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) भंग करुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी

यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ (शिस्त व अपील) नुसार सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.  त्याच बरोबर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर नागरी सेवा १९७९ (शिस्त व अपील) नुसार सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी यथायोग्य कारवाई करावी व आपला अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रसाद माणिकराव देशमुख, दत्तनगर, कारेगाव रोड, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उप संचालक, आरोग्य सेवा औरंगाबाद यांचे कार्यालय औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५३**

**निर्णय दिनांक** ०४-०९-२००७

श्री. देविदास विष्णूपंत गरड, : अपिलार्थी

मु. पो. जागजी,

तालुका जिल्हा उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, पोल-४,

मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सह सचिव, गृह विभाग, पोल-४,

मंत्रालय, मुंबई – ३२

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. देविदास विष्णुपंत गरड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, पोल-४, श्री. सिध्दार्थ वक्टूजी चवरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "सह संचालक म्हणून पदोन्नती बाबत प्रादेशिक न्याय सहाय्यक रासायनिक प्रयोगशाळा संचालनालय सांताक्रुझ मुंबई वरील पदाच्या आस्थापना मंडळाच्या निर्णयाच्या प्रतीची" मागणी केली होती.

अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जाव्दारे व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपिलासंदर्भात आज दिनांक ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळेस सुरुवातीसच अपिलार्थी यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे प्रयोजन त्यांना आता उरले नसल्याने हे अपील चालवण्यामध्ये त्यांना स्वारस्य नसल्याचे स्पष्ट केले व त्याच बरोबर राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी केलेले व्दितीय अपील मागे घेण्याची परवानगी एका शपथपत्राव्दारे मागितली असून त्यामध्ये त्यांची विनंती मान्य करण्याविषयी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस आता त्यांनी पुर्वी मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याने व अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दिनांक २०-०७-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील चालविण्यामध्ये आता स्वारस्य नसल्यामुळे त्यांची विनंती मान्य करुन त्यांनी आयोगा कडे केलेले व्दितीय अपील मागे घेण्याची परवानगी त्यांना देण्यात येत असून अपिलार्थीचे आयोगाकडील अपिल खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देविदास विष्णूपंत गरड, मु. पो. जागजी, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, पोल-४, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, पोल-४, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७४**

**निर्णय दिनांक** ०४-०९-२००७

श्री. अब्दुल रफीक अ. रशीद, : अपिलार्थी

भोईपुरा, अमृतेश्वर मंदिरासमोर,

जुना जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक शिक्षण संचालक, प्राथमिक

विभाग, शिक्षण उपसंचालक विभागीय

कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,

औरंगाबाद

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अब्दुल रफीक अ. रशीद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक श्री. सुनिल रतनसिंग चौहाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक श्री. माधव रामराव देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ च्या पत्रान्वये “ जालना जिल्ह्यातील मदिनातूल उलूम प्राथमिक उर्दू शाळा जालना या शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या मंजुरीसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक महाराष्ट्र राज्य, पुणे) यांना

दिनांक ०७-०३-९८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे पाठविल्या गेलेल्या प्रस्तावाची नक्कल ” मागितली होती.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि त्यांच्या कार्यालयामार्फत एक पत्र अपिलार्थीस दिनांक ०४ एप्रिल २००६ रोजी पाठविले. या पत्रा मध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रस्तावाची प्रत संबंधीत शाळेकडे उपलब्ध असणे अपेक्षीत असल्याचे नमूद करुन या प्रकरणी अपिलार्थीने संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक जे या प्रकरणात - माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत – त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०९-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्याबाबत संबंधीत कार्यालयाचा शिक्का व संबंधीत लिपिकाची सही अपिलार्थी यांच्याकडे आहे. तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचे अपील पोहोचले नसल्याने अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी हे कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी एक अर्ज केला असून या अर्जामध्ये या प्रकरणाचा सर्व घटनाक्रम नमूद करुन

अपिलार्थीने आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे. सदर अर्ज अपिलार्थीने विहित नमुन्यात दाखल केलेला नाही. तथापि नमुना अपील अर्जातील बहुतेक सर्व तपशीलाचा या अर्जामध्ये उल्लेख केला गेला असल्याने अपिलार्थीचा हा अर्ज राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार दाखल करुन घेतला आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०८-२००७ रोजी (म्हणजेच या सुनावणीच्या अगोदर ७ दिवस) त्यांना अपेक्षीत माहिती प्राप्त झाली, तथापि त्यांनी मूलतः मागणी केलेल्या दिनांक ०७-०३-९८ च्या प्रस्तावाच्या प्रतीचा त्यामध्ये समावेश नाही. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बरीच जुनी असल्याने व त्यांनी प्रयत्नपूर्वक शोध करुनही त्यांना या पत्राची प्रत त्यांच्या कार्यायातील अभिलेख्यावर सापडली नाही व त्यामुळे ही प्रत ते अपिलार्थीस देऊ शकले नाही.

अपिलार्थीने मागितलेल्या पत्राची मूळ प्रत प्रचलित पध्दतीनुसार शिक्षण उप संचालक कार्यालयाकडून शिक्षण संचालक यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावात असते. या पत्राची स्थळप्रत शिक्षण उप संचालक यांच्या कार्यालयात असणे सर्वसाधारणतः अभिप्रेत आहे तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांच्यामार्फत सर्व जिल्ह्याच्या शिक्षणाधिका-याकडून प्राप्त झालेल्या शिक्षकेतर पद मंजुरीचे प्रस्ताव मूळ प्रतीमध्येच पुढे पाठविण्यात येतात. शिक्षणाधिका-याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या सर्व मूळ प्रती त्यांच्या कार्यालयामार्फत एका पत्राने (forwarding letter) शिक्षण संचालकाचे कार्यालयाकडे पाठविल्या जातात. अशा प्रकारच्या बराच काळ वापरात असलेल्या पध्दतीमुळे ते या प्रस्तावाच्या मूळ प्रती त्यांच्या कार्यालयात ठेवत नाहीत त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ज्या शाळेकडून हा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला होता त्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून

(जे या प्रकरणी माहिती अधिकारी आहेत) माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे मांडण्यात आलेला हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही कारण शिक्षण उप संचालकाचे कार्यालय व शिक्षण संचालकाचे कार्यालय ही दोन्ही कार्यालये एकाच सार्वजनिक प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग असल्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, शिक्षण संचालक यांना एक तर अपिलार्थी यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याची विनंती करावयास हवी होती व त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती अथवा त्यांनी शिक्षण संचालकाचे कार्यालयात त्यांच्या कार्यालयाचा प्रतिनिधी पाठवून या पत्राची प्रत शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेऊन ती नंतर अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी या दोन्हीपैकी कोणतीही कृती न करता अपिलार्थीस सदर संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे जाण्याचे सूचित केले आहे. त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक महाराष्ट्र राज्य, पुणे) यांच्या कार्यालयातून अपिलार्थीने मागितलेल्या दिनांक ०७-०३-९८ च्या पत्राची प्रत प्राप्त करुन घ्यावी व अपिलार्थीस तिची नक्कल साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याच बरोबर त्यांना अशीही ताकीद देण्यात येते की, त्यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमा खाली प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये अशा प्रकरणांचा निपटारा करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक महाराष्ट्र राज्य, पुणे) यांच्या कार्यालयातून अपिलार्थीने मागितलेल्या दिनांक ०७-०३-९८ च्या पत्राची प्रत प्राप्त करुन घ्यावी व अपिलार्थीस तिची नक्कल साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रफीक अ. रशीद, भोईपुरा, अमृतेश्वर मंदिरासमोर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, प्राथमिक विभाग, शिक्षण उपसंचालक विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८३
निर्णय दिनांक- ०४-०९-२००७

१ श्री.प्रकाश कोंडाजी राशिनकर, : अपिलार्थी

'शांताई', रामनगर, पिंपळनेर, तालूका-साक्री
जिल्हा-धुळे.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक : प्रतिवादी
जिल्हापरिषद,धुळे.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हापरिषद,धुळे.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनअपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हापरिषद, धुळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक (ग्रा.पं.) जिल्हापरिषद, धुळे, श्री.अमर सोनभाउ शिंदे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियमा संदर्भात, १९५८ ते २००६ अखेर या कालावधीतील खालील प्रमाणे एकूण ३ मुद्दांवर माहिती मागविली होती.

“.A) सरकारी बरवळ जागेवर अतिक्रमण करुन निवासी घराचे बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून बांधकाम परवानगी देता येते का ? होय अथवा नाही या संबंधी नियमाची माहिती.

B) ग्रामपंचायतीकडे येणा-या तक्रारी (उदा.अतिक्रमणाबाबत) ची दखल घेवून कार्यवाही करण्याचे कर्तव्य पार पाडण्याबाबत सर्वस्वी जबाबदार कोण ? सरपंच की ग्रामविकास अधिकारी ?

C) ग्रामपंचायतीने घरपट्टी आकारणीची मागणी निश्चित केली असता त्यात पूर्वलक्षी प्रभावाने एखाद्यास सूट देणे किंवा कमी करण्याचा अधिकार सर्वस्वी कोणाचा असतो ? मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद धुळे, गट विकास अधिकारी किंवा ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यापैकी कोणाच्या अधिकारात पूर्वलक्षी प्रभावाने एखाद्याची घरपट्टी कमी करुन ‘ मागणी’ मधील कपात केली जाऊ शकते.”

अपिलार्थीने ही माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १९-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राने अपेक्षित माहिती पुरविल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि

जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस दिनांक- १५-०२-२००७ रोजी एक पत्र पाठविण्यात आले असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती परत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रकरणावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त झालेले अपीले ठरविण्यांची त्यांची ही कृती चुकीची आहे. त्यांनी जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघानाही एकत्र बोलावून घेवून दोघांचेही म्हणणे ऐकून घेवून त्यावर आपला ठोस निर्णय देणे, हे अपील ठरविणे या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपील न घेवून आपल्या कार्यशैलेतील कर्तव्यपरायणतेचा अभाव सिध्द केला आहे. असे म्हटल्यास वावगे होणार नाही. जनअपिलीय अधिकारी यांच्या या कृतीची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी यथायोग्य घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडील या निर्णयाने अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे त्यांचे म्हणणे त्यांचेकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मांडले असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी पहिल्या मुद्यातील माहिती संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२ च्या

तरतुदीची प्रत दिली आहे. तर मुद्दा क्रमांक-२ च्या संदर्भात अपिलार्थीस कलम ५३ च्या तरतुदीच्या प्रतिची छायाप्रत अपिलार्थीस पुरविलेली आहे.

अपिलार्थीने उपस्थित केलेला मुद्या (C) यामध्ये घरपट्टी आकरणीमध्ये बदल करण्याचे अधिकार कोणास आहेत. ही माहिती विचारली असता अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४ च्या तरतुदीची झेरॉक्सप्रत दिलेली आहे. यामध्ये कर आकारणी विरुध्द कोणाकडे अपील करता येईल, याची तरतूद आहे. तर कर आकारणी पूर्वप्रभावीपणे कमी करण्याचे अधिकार कोणाचे आहेत, याचा स्पष्टपणे उल्लेख नाही. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या कोणत्याही प्रश्नांना सरळ उत्तरे न देता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील संबंधित मुद्यांशी संबंधीत असलेलया ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतूदींच्या झेरॉक्सप्रति अपिलार्थीस पुरविलेल्या आहेत.

या ठिकाणी अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे संपूर्ण माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने प्रश्न विचारणे व जनमाहिती अधिकारी यांनी त्या प्रश्नांची उत्तरे देणे, अशा प्रकारचा पत्रव्यवहार अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम २ (च) च्या व्याख्येमध्ये माहिती या शब्दाची व्याप्ती पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वेगवेगळया स्वरुपातील माहिती अर्जदारास देण्याची तरतूद आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या प्रश्नांना सरळपणे उत्तरे न देता जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या चौकशीच्या संबंधित अधिनियमाच्या छायांकितप्रती अपिलार्थीस पुरविलेल्या आहेत. वास्तविकतः अपिलार्थीस

विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर सरळपणे जनमाहिती अधिका-यास देता आले असते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रश्नाशी संबंधित अधिनियमाच्या छायांकितप्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती चुकीच्या पध्दतीने विचारली असल्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस पुरविलेली माहिती योग्य वाटते.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला गेला की, अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नाशी संबंधीत माहिती, अधिनियमातील ज्या तरतूदीमध्ये आहे, त्या तरतुदीच्या छायांकितप्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात वारंवार वेगवेगळया प्रकारे माहितीची मागणी करीत असतात. अपिलार्थीस हवी असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या संबंधित तरतूदीच्या छायांकित प्रतीमध्ये असल्यामूळे व अपिलार्थीने विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात योग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ०४-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.प्रकाश कोंडाजी राशिनकर, 'शांताई ' रामनगर पिंपळनेर, ता.साक्री, जिल्हा-धुळे

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक (ग्रामपंचायत), जिल्हापरिषद, धुळे,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हापरिषद, धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८४**

**निर्णय दिनांक** ०४-०९-२००७

मो. अन्वरउल्लाखान मो. बरकतउल्लाखान, : अपिलार्थी

कय्युम प्लॉट्स, ९-४-४५५,

नांदेड

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, नांदेड-वाघाळा शहर

महानगरपालिका, नांदेड (उप अभियंता)

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर

महानगरपालिका, नांदेड (कार्यकारी अभियंता)

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी मो. अन्वरउल्लाखान मो. बरकतउल्लाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता राम सायन्ना लोलापोड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून नांदेड महानगरपालिका क्षेत्रातील कय्युम प्लॉट या प्रभागातील मलःनिस्सारण वाहिनीच्या कामाच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत, सर्वसाधारण अहवाल, संकल्पचित्र, मोजमाप दर पृथकरण व लीड चॉर्ट, शेड्यूल "बी" ४ झेरॉक्स

प्रत, कार्यारंभ आदेशाची झेरॉक्स प्रत सर्व मोजमाप पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती, प्रस्तावित इन्स्पेक्शन चेंबर्स दुरुस्ती केली जात आहे की नव्याने बदलले जात आहे"

अपिलार्थीने सर्व माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून अपिलार्थीस ही सर्व माहिती साक्षांकीत करुन हवी होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांना देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ११० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याविषयी सूचित केले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे सांगण्यात आले की, सदर पत्र देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील जिलानी नावाचा शिपाई अपिलार्थी यांच्या घरी गेला असता अपिलार्थी व शिपायाची भेट होऊ शकली नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीकडे दिनांक ०४-०३-२००६ रोजी सुपुर्द करण्यात आली. अपिलार्थीस माहिती देतांना एकूण ५५ पृष्ठांची माहिती देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी ही माहिती घेतांना त्यांना दिलेल्या माहितीची पृष्ठ संख्या फक्त ३२ इतकीच होती त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०७-०३-२००६ रोजी ५५ पृष्ठांची माहिती देण्याची विनंती केली. तदनंतर अपिलार्थीने दिनांक ०६-०३-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ११० रुपये इतके शुल्क भरुन त्याच दिवशी त्यांनी आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेतली. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या ५५ इतकी असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील प्रकारे मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर

अपिलाची सुनावणी दिनांक २९-०४-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन या निर्णयासंदर्भात अपिलार्थीस दिनांक १५-०५-२००६ रोजी एक पत्र लिहिले व या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मागणीचा त्यांनी खुलासा करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर होते व त्यांनी यास हरकत घेतली होती असे नमूद केले आहे. त्यांच्या कडील असलेली सर्व कागदपत्रे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दाखविली होती तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अनावश्यक संरक्षण देवून त्यांच्या बाजुने निर्णय दिला आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर आक्षेप घेऊन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलाची सुनावणी झाल्या नंतरही त्यांना नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या उप आयुक्तांनी त्याच अपिलाच्या सुनावणीस दिनांक १२-१०-२००६ चे पत्रान्वये उपस्थित राहण्याचे सूचित केले होते याची प्रत आयोगास दाखविली. एकदा सुनावणी होऊन परत त्याच अपिलावर दुस-या अधिका-याकडे महानगर पालिके मध्ये सुनावणी होते यावरुन त्यांचा कारभार कशा प्रकारे चालला आहे हे समजून येते असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. एकदा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्या नंतर उप आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका त्यांनी त्याच अपिलावर परत सुनावणी घेणे उचित ठरत नाही. तथापि या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित राहिले त्यामुळे या सुनावणीची नोंद आता आयोग घेत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक ०६-०३-२००६ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस कळविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये नकाशाचा देखील समावेश आहे. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती ५५ पृष्ठांची आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ५५ पृष्ठांची माहिती दिली आहे त्यामध्ये या योजनेचे नकाशे अंदाजपत्रके यांचा समावेश आहे. प्रश्न फक्त अपिलार्थीस देण्यात आलेल्या कागदाच्या आकारमानाचा आहे. मोजमाप पुस्तकामध्ये ए-४ अथवा ए-३ आकाराची पृष्ठे असतात व २ पृष्ठे एकाच क्रमांकाची असतात. अपिलार्थीस माहिती २ A-४ आकारमानाच्या आकाराची माहिती २ रुपये प्रती पृष्ठ या दराने पुरविणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजीच्या या मुद्दयावरील अधिसूचनेमध्ये ए-४, ए-३ या आकाराच्या पेपरच्या कागदाच्या एका प्रतीचे २ रुपये इतके शुल्क ठरविण्यात आले आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या कागदाचा आकार याहून जास्त असल्याने ही माहिती अपिलार्थीस २ पृष्ठे ए-४ साईजच्या आकारमानाच्या पेपरवर देण्यात आली आहे हे पाहता अपिलार्थीने उपस्थित केलेला कागदाच्या आकाराचा मुद्दा विचारात घेणे योग्य ठरणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लावलेले शुल्क बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस कळविली आहे व अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये कोणत्याही विशिष्ट माहितीवर निर्णय मागितला नसल्यामुळे अपिलार्थीचे अपील वरील प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ मो. अन्वरउल्लाखान मो. बरकतउल्लाखान, कय्युम प्लॉट्स, ९-४-४५५, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड (उप अभियंता) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड (कार्यकारी अभियंता) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८६
निर्णय दिनांक- ०४-०९-२००७

१ श्री. मो.अन्वरुल्लाखान बरकत उल्लाखान : अपिलार्थी
९-४-४५५, कय्युम प्लॉटस, नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शहर अभियंता (बांधकाम)
नांदेड वाघाळा शहर, महानगरपालिका, नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## **विवेंचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मो.अन्वरुल्लाखान बरकत उल्लाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सध्याचे जनअपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, श्री. वाघमारे मोहन धोंडीबा, (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर सध्याचे जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून नांदेड शहरातील बाबा मोटार गॅरेज ते चॉंद मस्जिद पर्यंतच्या प्रभाग ११ मधील सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्या संदर्भात हे काम सुरु होण्यापासून ते पूर्ण झालेल्या कालावधीतील काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - प्रशासकीय मान्यतेची झेरॉक्सप्रत, कंत्राटदारास अदा केलेली अंतिम बिलाची झेरॉक्सप्रत, काम चालू असतांना कार्यस्थळी व प्रयोगशाळात घेतल्या गेलेल्या १:२:४ व १:४:८ या दर्जाच्या क्राकींटच्या चाचणी निकालाच्या प्रती, (प्रत्यक्ष व प्रयोग शाळेमध्ये वेळोवेळी घेतलेल्या चाचण्यांची प्रत ) संबंधित कंत्राटदाराने त्यांच्याकडील

मंजूरांना किमान वेतन कायद्या प्रमाणे वेतन दिले होते किंवा कसे, दिले असल्यास संबंधित मजूरांच्या विम्याची रक्कम वजा केलेल्या मस्टरची प्रत.- या मुद्यांचा समावेश होता.
अपिलाथीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपीलाची प्रत दिनांक- ०१-०६-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते. सदर अपीलअर्ज जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आज सुनावणीत सांगितले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याच प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-०८-२००६ अन्वये व्दितीय अपील केले आहे.

सदर अपील करण्याची कारणे, जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देणे व जनअपिलीय अधिकारी यांनी अपीलाची कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेणे, अशी दर्शविली आहेत.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी अधिनियमा व्दारे निश्चीत करण्यात आलेल्या विहित मुदतीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व याच प्रकरणी त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्यांनी या अपीलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही. तथापि अपिलार्थीस दिनांक-०६-०९-२००६ रोजी ३ पैकी २ मुद्यावर पुर्णतः माहिती प्राप्त झाली असून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.३ मध्ये उल्लेखिलेल्या चाचणी निष्कर्षाच्या संदर्भात त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नाही, असे सांगितले. त्याच बरोबर अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितली असता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विलंबान व पोष्टाने पाठविली. या पाकीटावर अपु-या रकमेची तिकिटे जनमाहिती अधिकारी यांनी लावल्याने त्यांना ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पोष्टाच्या तिकिटाचा खर्च म्हणून २६ रुपये इतके शुल्क भरणे भाग पडले. तेंव्हा हे शुल्क अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी परत करण्या विषयी आयोगाने त्यांना सूचित करावे, अशी आज सुनावणीमध्ये विनंती केली आहे.

आज सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पूर्ण माहिती दिली गेली नसल्याचे कबुल केले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती विहित

कालावधीपेक्षा तीन महिने १० दिवस इतक्या उशिराने दिल्याचे दिसून येत आहे. माहिती विलंबाने देवूनही ती माहिती त्यांनी अपूरी दिली आहे. हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील न ठरविता त्यांच्या या अपील न ठरविण्याच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्यातील अक्षम्य बेपर्वाईचे प्रदर्शन केले आहे. नांदेड वाघाळा महानगरपालिकेतील कर्मचा-यांना जणू माहिती अधिकार अधिनियमाचा कोणत्याही प्रकारचे विधीनिषेध नसल्याचे त्यांनी त्यांच्या कृतीतून स्पष्ट करुन त्यांच्या अशा प्रकारच्याकार्यशैलीव्दारे या कायद्या विषयीचा त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांनी दर्शविला आहे.

तसेच जनमाहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी वेळेवर बोलावूनही ते आज राज्य माहिती आयोगाच्या सुनावणीस  कोणत्याही पूर्व परवानगी शिवाय गैरहजर राहीले. त्यांची ही वर्तणूक त्यांच्यातील बेमूर्दखोरपणा व माहिती अधिकार कायद्याविषयी बेपर्वाई स्पष्ट करते.

उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी दाखविलेल्या मानसिकतेवरुन त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे या त्यांच्या कर्तव्याची पर्णतः विसर पडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांचा माहिती मागण्याचा हक्क असूनही त्यांना या अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देणे हे संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे पहिले कर्तव्य आहे. याची जाणीव त्यांना देवून असे आदेशित करण्यात येते की-

१. जनमाहिती  अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापही न देण्यात आलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २६/- रुपये इतकी नुकसान भरपाई, त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक दिवसाच्या आत रोख अदा करावी.

३. या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दाखविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल राज्य माहिती आयोगाकडे दोन महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापही न देण्यात आलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २६/- रुपये इतकी नुकसान भरपाई, त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक दिवसाच्या आत रोख अदा करावी.

५. या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल राज्य माहिती आयोगाकडे दोन महिन्याच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ०४-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रत

१. श्री.मो. अन्वरुल्लाहखान बरकतउल्लाखान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, पाणी पुरवठा व जल निस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६६**

**निर्णय दिनांक** ०५-०९-२००७

श्री. चंद्रशेखर प्रल्हादराव मोहरीर, : अपिलार्थी

मु. पो. चिंचखेड, तालुका अंबड,

जिल्हा जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा माहिती अधिकारी, प्रकल्प संचालक,

इंडस बालकामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी

कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी जालना

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चंद्रशेखर प्रल्हादराव मोहरीर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे वकील श्री. सुनिल भास्करराव कुलकर्णी, वकील श्री. एम. एम. शेख यांचेसह हजर आहेत तसेच जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, श्री. मनोज देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जालना यांचे प्रतिनिधी श्री. चुन्नीलाल शामराव कोकणी तहसीलदार संजय गांधी योजना हे हजर आहेत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जालना यांच्या विना परवानगीने गैरहजेरीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. यापुढे आयोगाच्या सुनावणीसाठी त्यांना ज्या ज्या वेळी बोलाविणे येईल त्या त्या वेळी आयोगाच्या सुनावणीस अपवादात्मक परिस्थिती असल्याखेरीज करुन त्यांना उपस्थित राहण्यास सूचना द्याव्यात असे मुख्य सचिव

महाराष्ट्र राज्य यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांच्या वतीने आज सुनावणीस श्री. चुन्नीलाल शामराव कोकणी, तहसीलदार संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय हे विना अधिकार पत्र उपस्थित आहेत. आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहण्याचे अधिकार पत्र जिल्हाधिकारी यांच्याकडून का घेतले नाही असे विचारले असता त्यांनी जिल्हाधिंकारी यांच्या कडून अद्याप लेखी आदेश प्राप्त व्हावयाचे होते व संबंधीत नस्तीवर जिल्हाधिकारी यांनी सही केल्यामुळे ते हजर राहिले असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी यांच्या सदर नस्तीचे अवलोकन करता निवासी उपजिल्हाधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे श्री. कोकणी यांनी आयोगाकडील सुनावणीस हजर राहण्याचे प्रस्तावित केले होते व या प्रस्तावास जिल्हाधिकारी यांची मान्यता अपेक्षिली होती तथापि जिल्हाधिकारी यांनी या प्रस्तावावर त्यांना मान्य असल्याचे अथवा अमान्य असल्याचे कोणतेही अभिप्राय न नोंदविता ही नस्ती जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्याकडे पाठविली आहे. अपिलार्थीच्या वकिलाने जन अपिलीय अधिकारी म्हणून (तहसीलदार संजय गांधी योजना) यांना कामकाजामध्ये भाग घेण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगितले.

अपिलार्थीच्या वकिलाने सहमती दर्शविल्यावरुन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी तहसीलदार संजय गांधी योजना यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून आजच्या सुनावणीस भाग घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे इंडस बाल कामगार प्रकल्प संदर्भात खालील प्रमाणे माहिती विचारली होती.

१. “ इंडस बालकामगार प्रकल्प सुरु झाल्याच्या दिनांकापासून एकूण किती निधी उपलब्ध झाला.

२. विविध हेडस् खाली झालेला खर्चाचा तपशील.

३. एकत्रिक पगारावर काम करणारे शिक्षक कोणत्या केंद्रावर शिकविण्याचे काम करतात. शिक्षकांचा कायमचा पत्ता व ज्या केंद्रावर ते काम करतात त्या केंद्राचा पूर्ण पत्ता.

४. या विविध केंद्रावर मीड डे मील पुरविणा-या व्यक्तींचे नांव व पत्ता, या मीड डे मील वर आतापर्यत किती खर्च झाला त्याचा केंद्रनिहाय खर्चाचा तपशील. मीड डे मील पुरविणा-या प्रत्येकाला आतापर्यत किती पैसे दिले गेले ?

५. मीड डे मील पुरवणारा व्यक्ती किती केंद्रावर मीड डे मील पुरवतो त्या केंद्रांचा पत्त्यासहीत तपशील.

६. प्रत्येक केंद्रावर किती विद्यार्थी संख्या आहे.

७. एखादे केंद्र सुरु करण्यासाठी प्रकल्प अधिकारी कशाचा आधार घेतात त्याचे विश्लेषण.

८. काही कर्मचा-यांना १५००/- रु. वेतन व काही कर्मचा-यांना १०००/- रु. वेतन हा फरक कशामुळे याशिवाय प्रकल्पामध्ये वेगळे वेतन असलेले किती कर्मचारी कार्यरत आहेत.”

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेल्या या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राने ही माहिती त्यांना देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये १२ त्यांच्या कार्यालयात भरण्याचे या पत्राव्दारे सूचित केले. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-११-२००६ रोजी या शुल्काचा भरणा केला. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना दिनांक ३०-१२-२००६ रोजी माहिती पाठविली. माहिती दिनांक २२-१२-२००६ रोजी तयार असल्याचे देखील ती दिनांक ३०-

१२-२००६ ला पाठविण्याचे प्रयोजन काय असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस सदर माहिती पाठविण्यापोटी लागणारे तिकिटाचे शुल्क त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हते. अपिलार्थीने मागितलेली माहिती केंद्र शासनाच्या योजनेशी संबंधीत असल्यामुळे केंद्र शासनाकडून त्यांना कोणताही निधी पुरविण्यात आलेला नव्हता. त्यांच्या कार्यालयाकडे त्यावेळी आकस्मिक निधी शिल्लक नव्हता. तदनंतर त्यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडून तो ८ दिवसात प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पाठविली. या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ सदर सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती तयार होताच वरील प्रकारची कोणतीही क्षुल्लक कारणे न दर्शविता कोणाही अर्जदारांना सदर माहिती त्वरित पाठविण्याच्या सूचना जन माहिती अधिकारी यांना आज रोजी देण्यात आल्या.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०१-२००७ रोजी घेतली. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या माहिती-तील चुका कबूल करुन त्यांना त्याप्रमाणे त्यांच्याकडील दिनांक ११-०१-२००७ रोजीचे चुकिची दुरुस्ती करणारे व खुलासा करणारे पत्र दिनांक १९-०१-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविले.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या सुनावणीचे आदेश त्यांच्याकडील ३१-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये पारीत केले. या अपिल निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संबंधीत संचिकेची पाहणी करण्यासाठी सदर संचिका उपलब्ध करुन देऊन

त्यांना हवी असलेली माहिती देण्याचे सूचित केले व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत व सत्य माहिती देण्यासंदर्भात ताकीद दिली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील आदेशानुसार अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संचिकेची पाहणी करण्याकरिता गेले असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ३ दिवसाची मुदत मागितली असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तद नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली व त्यांनी संबंधीत नस्तीची पाहणी करुन मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि सदर माहिती अपूर्ण आहे असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने देखील अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याचे वाटल्यावरुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याच प्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्य माहिती मिळाली नसल्याचे म्हटले आहे व अपील अर्जात पुढे त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००७ च्या पत्रान्वये माहिती देण्यापोटी अतिरिक्त शुल्क रुपये ३५८ भरण्याचे सूचित केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून अपिलार्थीस या प्रकरणातील प्रथम अपिलाचा निर्णय झाल्यानंतर ०३ फेब्रुवारी २००७ च्या पत्रान्वये काही माहिती देण्यात आली. या पत्रावर अपिलार्थीने " नियमावली कॉपीज पूर्ण नाही - माहिती अपूर्ण आहे " असा त्यांचा अभिप्राय दिला आहे. तथापि अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम दिनांक ०४-१०-२००६ रोजीचा अर्ज

पाहता त्या मध्ये अपिलार्थीने कोठेही नियमावलीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत नाही यावरुन अपिलार्थीने अपिलामध्ये मूळ माहिती व्यतिरिक्त इतर अतिरिक्त माहिती मागविल्याचे सिध्द होते.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून असत्य माहिती पुरविण्यात आलेली आहे. ती माहिती त्यांना अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी देणे अपेक्षित होती ती त्यांना विलंबाने प्राप्त झालेली आहे. त्यांनी केंद्रनिहाय माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना केंद्रनिहाय माहिती दिली नाही. त्यांनी प्रत्येक केंद्रावर उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येची मागणी केली होती तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची, विसंगत व अयोग्य माहिती पुरविली गेली आहे. अपिलार्थी यांनी आपल्या युक्तिवादात पुढे असेही सांगितले की, या योजनेचे जे मूळ उदिष्ट शासनाने ठरविले आहे ते उदिष्ट सफल न होता ती योजना राबविणा-या शासकीय यंत्रणेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे त्यांनी संबंधीत अधिका-याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याकरिता शासनाची परवानगी देखील मागितली आहे. हा भ्रष्टाचार सिध्द करण्यासाठी त्यांना या कागदपत्रांची जरुरी आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम ७ (९) मध्ये सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या नमुन्यामध्ये माहिती देणे अपेक्षित आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळाचा अथवा साधनसामुग्रीचा प्रमाणाबाहेर वापर, ही माहिती देण्याकरिता, करावा लागण्याची शक्यता नसल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने मागितल्यानुसार द्यावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता वेळोवेळी सहकार्य केले असून त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००६ रोजी माहिती पुरविली आहे. त्याच बरोबर अपिलाची सुनावणी झाल्याबरोबर देखील त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळणे अशा प्रकारचा त्यांचा उद्देश या प्रकरणात कधीही नव्हता.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००६ च्या पत्रान्वये पुरविलेली माहिती अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी पुरेशी सुसंगत नाही. या माहितीमध्ये त्यांनी इंडस बाल कामगार प्रकल्प विभागा कडील रुपये १०,२१,३४२/- रुपये इतका खर्च झाल्याचे कळविले आहे तथापि तदनंतर या रकमेतील ४ हा अंक टाईप करण्याचे राहून गेल्याचे व एकूण रक्कम रुपये १०४२१३४२/- एवढी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी ही चूक त्यांच्याकडील दिनांक ११-०१-२००७ च्या पत्राव्दारे सुधारीत केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केंद्रनिहाय माहिती मागितलेल्या माहितीचा केंद्रनिहाय तपशील न देता त्या केंद्राच्या मुख्यालयानिहाय त्यांना माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थीस प्रत्येक केंद्रात उपस्थित असणा-या संख्येची माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या विशेषतः सरळ प्रश्नांना सरळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळल्याचे या उत्तरावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्यानंतर दिनांक ०३-०२-२००७ रोजी अपिलार्थीस अतिरिक्त माहिती पुरविल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने अपील झाल्या नंतर जादा माहितीची मागणी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जादा माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी ही माहिती अपूर्ण असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस विसंगत व उशिरा माहिती दिल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या स्वरुपात ७ दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणी मध्ये कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीस अपिलार्थीने दिनांक ०३-११-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर त्यांना दिनांक २२-१२-२००६ रोजी म्हणजेच विहीत मुदतीपेक्षा ३४ दिवसाच्या (विहित मुदतीपेक्षा) अधिक विलंबाने माहिती उशिरा दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देता ती पुरविण्यासाठी लावलेल्या या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर प्रतीदिनी रुपये २५० प्रमाणे विलंबाच्या एकूण ३४ दिवसाकरिता रुपये ८५०० इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर रकमेचा भरणा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाचे आत शासकीय कोषागारात " लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा. सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकमा १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड " या लेखा शीर्षा खाली करावा व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपेक्षित असलेल्या स्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या स्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने ३४ दिवसाच्या विहित मुदतीपेक्षा अधिक विलंबाने माहिती उशिरा दिली. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देता ती पुरविण्यासाठी लावलेल्या या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर रुपये ८५०० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर रकमेचा भरणा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाचे आत शासकीय कोषागारात " लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड " या लेखाशीर्षा खाली करावा व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रशेखर प्रल्हादराव मोहरीर, मु. पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना
२ जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, प्रकल्प संचालक, इंडस बाल कामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

## अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८५

**निर्णय दिनांक** **०५-०९-२००७**

मो. अन्वरउल्लाखान : अपिलार्थी

पि. मो. बरकतउल्लाखान,

९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, माफको जवळ,

नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी मो. अन्वरउल्लाखान मो. बरकतउल्लाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. महमद अब्दुल मुजीब (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री. सुनिल आण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५ आर्थिक वर्षापर्यतच्या निविदा संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये – जन माहिती अधिकारी यांच्या पातळीवर किती कामाच्या निविदा निश्चित झाल्या, त्या कामाची नावे आणि ही कामे करणा-या कंत्राटदाराची नांवे, किती निविदा अंदाजपत्रक दराने स्विकृती केल्या गेल्या, किती निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा कमी किंवा जास्त स्विकृत केल्या गेल्या, या कामांची यादी, या प्रक्रियेमध्ये शासनास झालेला फायदा किंवा तोटा व निविदामध्ये दर्शविलेल्या कामापोटी प्राप्त झालेल्या निविदाचे दर कमी-जास्त ठरविण्यासंदर्भात काय पध्दत वापरली जाते व संबंधीत कंत्राटदाराकडून तुलनापत्राचे विवरण – या माहितीचा समावेश होता."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ संबंधीत लिपिकाची सही माहिती अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ७६ त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार अपिलार्थी यांनी सा. बा. उपविभाग

(इमारती) नांदेड या जन माहिती अधिकारी यांच्या प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या प्राधिकरणामध्ये दिनांक १४-०३-२००६ रोजी ७६ रुपयाचा भरणा केला. अपिलार्थीने दिनांक १४-०३-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे व ही माहिती दिशाभूल करणारी असल्याचे आपल्या अपील अर्जात म्हटले आहे व त्याच बरोबर अपिलार्थीस दिशाभूल करणारी व अपुरी माहिती दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी न घेता अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अपील अर्जास उत्तर देवून या उत्तरामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर असल्याचे म्हटले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने केलेली मागणी विचारात घेऊन, जन माहिती अधिका-यास ०५-०६ या वर्षातीलही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देण्याचे सूचित केले असल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगा कडे दिनांक १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी जन अपिलीय अधिकारी हे बेजबाबदार असल्याचे निर्देशित करुन त्यांनी

त्यांच्या मूळ अर्जाच्या दिनांकापासून मागील ५ आर्थिक वर्षामधील माहिती मागविली असतांना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी फक्त ३१-०३-२००५ पर्यतची माहिती दिली असल्याने ही माहिती अपूर्ण असल्याचे नमूद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व अपुरी माहिती मिळाली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मूळातच शुल्क भरण्यासंबंधी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कडे अर्ज केल्यानंतर एक महिना इतक्या कालावधीनंतर पत्र देण्यात आले. अपिलार्थीच्या मताप्रमाणे हा कालावधी जास्त आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, त्यांना अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०२-२००६ रोजी प्राप्त झाला. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी लागणारे शुल्क भरण्याचे सूचित केले व दिनांक १४-०३-२००६ रोजी शुल्क भरल्यानंतर दिनांक १६-०३-२००६ रोजी अपिलार्थीस त्वरित ही माहिती देण्यात आली. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावलेला नाही व त्याच बरोबर अपिलार्थीने मूळात माहिती मागवितांना गेल्या ५ आर्थिक वर्षातील माहिती मागितली आहे. शासनाचे आर्थिक वर्ष ०१ एप्रिलला सुरु होवून पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी ते संपते. अपिलार्थीने गेल्या ५ आर्थिक वर्षातील माहिती मागितली असल्या-मुळे व अपिलार्थीने अर्ज फेब्रुवारी २००६ मध्ये केल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी मार्च २००५ पर्यतच्या मागील ५ वर्षातील माहिती अपिलार्थीस पुर्णतः पुरविली आहे तसेच अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दा क्रमांक ४ व ५ वर त्यांनी समर्पक उत्तर दिल्याचा युक्तिवादामध्ये दावा केला.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केलेला युक्तिवाद आयोगास समर्पक वाटतो. मूळात अपिलार्थीने मागणी करतांना त्यांच्या अर्जाच्या दिनांकापासून मागील ५ वर्षाच्या कालावधीच्या माहितीची मागणी करावयास हवी होती म्हणजे त्यांना हवी असलेली अपेक्षित माहिती त्यांना मिळू शकली असती. परंतु अपिलार्थीने अर्ज करतांना त्यांना निश्चित कोणती माहिती हवी आहे हे त्यांचे त्यांनाच निश्चित माहीत नसल्या-मुळे त्यांच्या हातून ही चूक झाली असावी. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे पूर्ण माहिती दिली आहे. अपिलार्थीस अजूनही जर ०१ एप्रिल २००५ ते फेब्रुवारी २००६ या कालावधीमधील जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरील जर काही माहिती हवी असेल तर ती सशुल्क देण्यास जन माहिती अधिकारी आजही तयार आहेत तेव्हा अपिलार्थीस ही माहिती आजही आवश्यक असल्यास त्यांनी ती माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन ही माहिती प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत कार्यालयात भरल्यानंतर २ दिवसात अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दिली व जी माहिती दिली ती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसगत असल्याने दिसून येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ मो. अन्वरउल्लाखान पि. मो. बरकतउल्लाखान, ९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, माफको जवळ, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९१
निर्णय दिनांक- ०५-०९-२००७

१ श्री.नामदेव तेजराव शेजूळ, : अपिलार्थी

मु.कोठा (दाभाडी) पो.चांदाई (एक्को)
ता.भोकरदन, जि.जालना.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत : प्रतिवादी
मौजे कोठा (दाभाडी) तालूका- भोकरदन, जिल्हा-
जालना.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन.

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०५-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नामदेव तेजराव शेजूळ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कोठा (दाभाडी) श्री. अंबादास तुकाराम काळे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, श्री.राजेश विष्णू इंगळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २०-०६-२००६ रोजीच्या रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत कोठा (दाभाडी) या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील प्रशिक्षणा संदर्भात खालील प्रमाणे एकूण ८ मुद्यावर माहिती मागविली होती.

“१. आपला दाभाडी ग्रा.प.ला.सप्ताहातील भेटीचे दिवस किती व कोणते व त्यानुसार आता पर्यंत कोठा दाभाडी ग्रा.प.ला.भेटी दिल्याची संख्या दिनांकासहीत देण्यात यावी. होती.

२ दिनांक- २९-१२-२००५ रोजी घेण्यात आलेल्या ग्राम सभेच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत उपलब्ध करुन द्यावी.

३. दिनांक- ३१-५-२००६ पर्यंत झालेल्या ग्राम सभांची संख्या व इतिवृत्तांची छायाकिंत प्रत उपलब्ध करुन द्यावी व सदर ग्रामसभेचे अध्यक्ष स्थान कोणी स्विकारले?

४. ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार घरांची संख्या व त्या घरातील १८ वर्षा वरिल नागरिकांची नांवे व कोठा दाभाडी शिवारात येत असलेल्या कोठावाडी येथील घरांची संख्या व १८ वर्षा वरील नागरीकांची नावे.

५. सध्यस्थितीत कोठा दाभाडी ग्रामपंचायत अंतर्गत राहिवाशी असलेल्या १८ वर्षावरील नागरिकांची संख्या व नावे.

६. ग्रामपंचायत स्थापनेपासून दिनांक १३-५-२००६ पर्यत शासनाकडून मिळालेले अनुदान व आज रोजी ग्रामपंचायत अखत्यारीतील येणा-या योजनांच्या खात्यावर शिल्लक असलेले रक्कम याची माहिती द्यावी.

७. जे नागरीक प्रत्यक्ष कोठा दाभाडी येथे रहिवाशी नसतांना दिलेलया रहिवाशी प्रमाणपत्राची संख्या. ”

८. रहिवाशी प्रमाणपत्राची व्याख्या देण्यात यावी.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याचे कारण विचारले असता, जनमाहिती

अधिकारी यांनी त्यांच्याकडे मुलतः देवखडा (खु.) व देवखेडा (बु.) या दोन ग्रामपंचायतीचा कार्यभार आहे. या दोन ग्रामपंचायतीच्या कार्यभारा व्यतिरीक्त त्यांच्याकडे  पिंपळगाव (सुतार) पळसखेडा दाभाडी, पिंपळगाव शेरमुनकी, कोठा दाभाडी या चार ग्रामंपचायतीचा अतिरीक्त कार्यभार सोपाविण्यात आला होता. या अतिरिक्त ग्रामपंचायतीच्या कार्यभारामूळे व त्यांच्या पत्नी सतत आजारी असल्यामूळे ते अपिलार्थीस, त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत, असे सांगितले.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामूळे  अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०९-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून या संदर्भात दिनांक २८-०८-२००६ रोजी एक पत्र दिनांक- ०५-०९-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांना पाठविण्यत आले आहे. या पत्रामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००६ च्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जनमाहिती अधिका-यास सूचित केले आहे. व पुढे त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यास ते सर्वस्वी जबाबदार राहून दंडनीय कार्यवाहीस पात्र राहाल, असा इशारा दिला आहे. सदर पत्र जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना  मिळाल्याचे आज सुनावणीमध्ये मान्य केले आहे. या पत्रामध्ये अशा प्रकारची विसंगती आढळते की, जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिका-यास, अपिलार्थीस दिनांक- २९-०८-२००६ च्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि हे पत्र मात्र त्यांनी दिनांक- ०५-०९-२००६ रोजी पाठविले आहे. यावरुन जनअपिलीय अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीचे किती गांभीर्याने

पालन करतात, हे दिसून येत आहे. त्यांनी या प्रकरणी सुनावणी तर घेतली नाहीच तथापि अपिलार्थीस  माहिती देण्याबाबत जनमाहिती अधिका-यास उशिराने सूचना देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव आपल्या या कृतीव्दारे व या पत्राव्दारे स्पष्ट केला आहे. त्यांच्या कार्यशैलीत असलेल्या या कर्तव्यपरायणतेच्या अभावाची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जालना यांनी यथायोग्य नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून हे पत्र प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती घेण्यासाठी गेले नाहीत, असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे आजच्या सुनावणीमध्ये मांडले. तर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार असल्याची सूचना अपिलार्थी यांना कोणत्याही प्रकारे दिली नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे  दिनांक- १५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांच्या मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत तर देण्यात आली नाही. तथापि त्यांच्यावर ही माहिती न घेण्यासाठी अप्रत्यक्षरित्या अनेक व्यक्तीकडून  दबाव आणला गेला आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस ही माहिती मागण्याचा अधिकार नसल्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी वेळोवेळी विधाने केली आहेत.

अपिलार्थी यांना त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती शतप्रतिशत हवी असल्याचे त्यांनी पुढे प्रतिपादन केले. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे सोपाविण्यात आलेल्या उपरोक्त ग्रामपंचायतीच्या कार्यभारामूळे अपिलार्थीस त्यांना ही माहिती विहित मुदतीत पुरविणे शक्य झाले नाही. तथापि त्यांनी ही माहिती तीन महिन्यापूर्वीच तयार केली असून ते अपिलार्थी यांच्या घरी स्वतः, ही माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः मागितली असल्यामूळे, माहिती घरी घेवून गेले असता, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडून ही माहिती घेण्यास नकार दिला. जनमाहिती अधिकारी यांच्या या युक्तीवादावर अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या घरी माहिती शिवाय जावून अपिलार्थीस ही माहिती घेण्यापासून परावृत करण्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रयत्न केला. तथापि त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केले असल्यामूळे, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना केलेल्या विनंती प्रमाणे आयोगाकडे दाखल केलेले हे अपील मागे घेतले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, असे दिसून येते की, मुळतः या प्रकरणी जे जनमाहिती अधिकारी नेमले गेले आहेत. ते ग्रामसेवक या दर्जाचे जनमाहिती अधिकारी असून त्यांना व जनअपिलीय अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियमा विषयी किमान आवश्यक ते ज्ञान अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. आजच्या सुनावणीच्या वेळेस त्यांनी केलेल्या विधानावरुन त्यांची जनमाहिती अधिकारी म्हणून काम करण्याची कुवत नाही असे दिसून येत आहे. कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदीखाली मागितलेली माहिती त्यांना एका विशीष्ट मुदतीमध्ये द्यावयाची असते, हे साधे ज्ञान देखील संबंधित जनमाहिती अधिका-यास नाही. अर्जदारास माहिती न मिळाल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करण्याची तरतूद आहे व या अपीलाची

सुनावणी घेणे संबंधित जनअपिलीय अधिकारी यांचे कर्तव्य आहे. याची पुसटशी जाणीव देखील जनअपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना नाही. तेंव्हा ग्रामपंचायतीच्या स्तरावर ग्रामपंचायतील ग्रामसेवका पेक्षा वरिष्ठदर्जाचे माहिती अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे जनअपिलीय अधिकारी म्हणून नेमण्याबाबत सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई यांनी विचार करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविली नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या बचावापित्यर्थ केलेली कारणमिंमासा (कार्यबाहूल्य व पत्नीचे आजारपण) आयोगास मान्य नाही. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की-

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महिती देण्याप्रित्यर्थ लावलेल्या या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जालना यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून तपासून घेवून ती अपिलार्थीस स्पष्टपणे व साक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

४. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महिती देण्याप्रित्यर्थ लावलेल्या या असमर्थनिय विलंबाबाबत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जालना यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

६. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून तपासून घेवून ती अपिलार्थीस स्पष्टपणे व साक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ०५-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.नामदेव तेजराव शेजुळ, रा.कोठा (दाभाडी) पो. चांदाई (एक्को) ता.भोकरदन, जिल्हा- जालना.

२. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोठा (दाभाडी) तालूका- भोकरदन, जिल्हा- जालना,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,भोकरदन, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जालना, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७
निर्णय दिनांक- ०६-०९-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री.शंकर मारोती इंगळे,<br>आनंदनगर चौक, नांदेड- ४३१६०५. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जनमाहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हापरिषद, नांदेड. | : | प्रतिवादी |

२. जनअपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद,नांदेड.
(प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी, शिक्षण
उपसंचालक, लातूर )

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०६-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकर मारोती इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड, श्री.शंकर सीताराम वाघमारे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद,नांदेड (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे विनाअनुदानित माध्यमिक व प्राथमिक नवीन शाळा काढण्याचे नियम व कार्यप्रणालीच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. विनाअनुदानित तत्वावर माध्यमिक व प्राथमिक शाळा नव्याने काढण्या बाबतचे शासनाचे निघालेल्या अद्यावत आदेशाच्या किंवा परिपत्रकाच्या प्रति द्याव्यात.

२. प्रस्ताव केंव्हा व कोणाकडे दाखल करावे लागतात. अंतीम मंजूरी घेण्याची कार्यप्रणाली कशी असते ?

३. प्रस्तावा सोबत कोणकोणते कागदपत्रके जोडावी लागतात. त्या सर्वांचे नमूने द्यावेत., फी किती भरावी लागते.

४. नांदेड जिल्हयात व विशेषतः अर्धापूर तालूक्यात कोठे शाळा काढता येतील.

५. शाळा काढण्या बाबतच्या वरील जी.आर.शिवाय जिल्हा परिषदेने काही वेगळे मार्गदर्शक तत्वे काढली असतील तर त्याच्या प्रति द्याव्यात.

६.  सर्व प्रति प्रमाणित करुन द्याव्यात.”

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०५-०६-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देवून काही माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस पोहचले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे दिनांक- १४-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपीलअर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

आज सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी हे आयोगास असे सांगत आहेत की, या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी हे शिक्षण उपसंचालक हे आहेत. जरी अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे अपील केले असले तरी ते योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची होती. तथापि त्यांनी ही जबाबदारी व्यवस्थीतपणे पार न पाडता अपिलार्थीच्या अपीलावर सुनावणी न घेणे पसंत केले. त्यांच्या या कृतीतून या कायद्याविषयी अनादर व अज्ञान स्पष्ट होते. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली नाही. मात्र दिनांक-२२-०६-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या दिनांक- ०५-०६-२००६ रोजीच्या पत्राने पाठविल्याचे निर्देशीत केले. या नंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता दिनांक ०५-०७-२००६ व दिनांक २६-०७-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करुन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि त्यांच्या प्रयत्नांना यश न

आल्याने अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवून सदर माहिती त्यांना आता मोफत मिळावी व जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१), २० (२) नुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस त्यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला की, त्यांनी ही माहिती मिळविण्यासाठी वरील अर्जा व्यतिरीक्त जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते दिनांक- ०५-०६-२००६ व २६-०६-२००६ या दोन दिवशी उपस्थित राहून त्यांनी ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाची सही व कार्यालयाचा शिक्का असलेल्या त्यांच्याकडील स्थळप्रतीच्या झेरॉक्सप्रती आयोगास दाखविली. या पत्रामध्ये त्यांनी ते दिनांक- २१-०७-२००६ व दिनांक- २५-०७-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहीले असतांना त्यांच्या कार्यालयातील श्री.राठोड शिक्षण विस्तार अधिकारी, श्री.कदम , श्री.जोशी व कार्यालयीन अधिक्षक यांच्याशी त्यांनी संपर्क साधूनही त्यांना कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याशी वैयक्तीक संपर्क साधूनही त्यांना त्यांच्या कार्यालयाकडून माहिती मिळाली नसल्याचे वरील पुराव्याच्या आधारे सिध्द होत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात मूळात आले नव्हते. जनमाहिती अधिकारी यांचा दावा क्षणभर जरी सत्य आहे, असे गृहीत धरले तरी अपिलार्थीने लिहीलेली दोन्हीही पत्रे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावाने लिहीली होती. त्यामूळे ही पत्रे प्रचलीत कार्यालयीन

पध्दतीप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे जाणे भाग आहे. तथापि या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतल्याचे दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक- ०५ जून, २००६ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी माहिती व्यक्तीशः मागितली असल्यामूळे व अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर राहीले नसल्यामूळे त्यांनी ही माहिती पोष्टाने पाठविली, असे त्यांचे म्हणणे आहे. या त्यांच्या दाव्यापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयातील आवक जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत दाखविली असता ५६४८ या क्रमांकाने अपिलार्थीस दिनांक-०५ जून, २००६ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते.

जर त्यांनी दिनांक- ०५ जून, २००६ रोजी माहिती पाठविली होती असे त्यांचे म्हणणे आहे तर त्यांनी अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपीलाची सुनावणी का घेतली नाही व ही माहिती पाठविण्याचे अपिलार्थीस त्याचवेळी का सूचित केले नाही. असा हा प्रश्न उरतो. या प्रश्नाची जनमाहिती अधिकारी यांनी अशी उत्तरे दिली की, त्यांना या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी कोण आहेत हे माहिती नव्हते. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे अशा प्रकरणात जनअपिलीय अधिकारी हे शिक्षण उपसंचालक हे आहेत. जनअपिलीय अधिकारी शिक्षण उपसंचालक असल्या बाबतचे आदेश त्यांनी आयोगास सादर केले असता या शिक्षण उपसंचालकाच्या आदेशावर तारखेचा उल्लेख नसल्याचे दिसून आले. त्यामूळे अपिलार्थीने अपील करतेवेळी प्रत्यक्षात जनअपिलीय अधिकारी कोण हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थी यांच्या मते जिल्हापरिषदेतील शिक्षण विभागाच्या कार्यालयातील फलकावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अपिलीय अधिकारी असल्याचे नमूद केले आहे. कसेही असले तरी, जर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अपिलीय अधिकारी नव्हते तर त्यांनी अपिलार्थीचे अपील शिक्षण उपसंचालक यांच्याकडे त्वरीत पाठवून देणे या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारे कोणतीही

कृती न करता अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर कोणतीही कार्यवाही स्वतः केली नाही. अथवा दुस-या जनअपिलीय अधिका-यास या अपीलावर सुनावणी घेण्याची विनंती देखील त्यांनी केली नाही व परिणामी अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनूसार विहित मुदतीत माहिती मिळण्यापासून वंचीत राहिले. ही बाब आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सिध्द होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर ही माहिती देण्यापोटी अपिलार्थीस किती शुल्क भरावे लागेल, याची त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदती मध्ये माहिती द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी तशी कोणतीही माहिती न देता, अपिलार्थीस त्यांचे दिनांक २२ जून, २००६ रोजीच्या पत्रान्वये आपण आवश्यक ते चालन भरले नाही, अशा अर्थाचे विधान केले आहे. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटी किती फी भरावयाची, याचे मार्गदर्शन जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतूदी प्रमाणे करावयाचे असते. तथापि त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन न करता,अपिलार्थीस दिनांक- २२ जून, २००६ रोजीच्या पत्राव्दारे आपण चालन भरले नाही, अशा अर्थाचा उल्लेख केला आहे. तो अयोग्य व चुकीचा आहे, असे आयोगाचे मत आहे.

थोडक्यात शिक्षणविभागाच्या अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणी संदर्भात किमान आवश्यक ते ज्ञान प्राप्त नाही. परिणामी अपिलार्थी विहित मुदतीत माहिती मिळण्यापासून वंचित राहिले असे या पूर्ण प्रकरणातून अनुमान काढण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येत आहे

की, त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीस अनुसरुन त्यांच्याकडे नागरीकाची माहितीसाठीचे अर्ज प्राप्त होताच त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद द्यावा. आयोगाने दिलेल्या ताकिदीची नोंद जनमाहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तकामध्ये शिक्षण उपसंचालक, यांनी घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीस अनुसरुन त्यांच्याकडे नागरीकांची माहितीसाठीचे अर्ज प्राप्त होताच त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद द्यावा.

४. वरील अनुक्रमांक ३ ची नोंद जनमाहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तकात शिक्षण उपासंचालक,लातूर यांनी घ्यावी.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- ०६-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.शंकर मारोती इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४१८

निर्णय दिनांक- ०६-०९-२००७.

श्री. देहरे शिवशर्मा रघुनाथ : अपिलार्थी
११, वृंदावन कॉलनी, संगिता कॉलनी शेजारी,
नंदनवन कॉलनी, भावसिगपुरा रोड,
औरंगाबाद.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
मिलींद मल्टीपरपज हायस्कूल,

नागसेनवन, औरंगाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
सचिव, पिपल्स एज्युकेशन सोसायटी,
आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट,
मुंबई-४०००२३.

## विवेंचन

वरील प्रकरणाची व्दितीय सुनावणी आज दिनाक- ०६-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.देहरे शिवशर्मा रघुनाथ ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मिलींद मल्टीपरपज हायस्कूल नागसेन वन औरंगाबाद,श्रीमती लिना आयझॅक (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) या हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा सचिव पिपल्स एज्यूकेशन सोसायटी (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १५-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे श्री. आमराव यांची विद्यालयात लिपीक म्हणून झालेल्या नेमणूकीबद्दल सन २००३ ते २००७ या कालावधीतील एकूण खालील प्रमाणे १६ मुद्यावर माहिती मागविली होती.

“१. श्री.आमराव यांची नेमणूक कायमस्वरुपी करण्या करीता जाहिरात दिली होती का?

१७.कायम स्वरुपी नेमणूक केलेल्या आदेशाची झेरॉक्सप्रत.

१८.आमराव यांच्या नेमणूकी बाबत आपण संस्थेकडे शाळेचा प्रस्ताव कधी पाठविला ? (त्याची झेरॉक्स प्रत )

१९.आमराव ची नेमणूक करतांना निवड समितीची बैठक बोलाविली होती का ?

२०.संस्थेने त्यांची नेमणूक कधी केली ? (झेरॉक्स प्रत द्यावी)

२१.निवड समितीमध्ये किती सभासद आहेत, त्यांची नांवे द्यावी.

२२.आमराव यांच्या मान्यतेसाठी शिक्षणाधिका-याकडे प्रस्ताव कधी पाठविला त्याची झेरॉक्स प्रत.

२३.शिक्षणाधिका-याकडे शालेय समितीचा ठराव पाठविला होता का ? त्याची झेरॉक्स प्रत द्यावी.

२४.शिक्षणाधिका-यांकडून मान्यता कधी मिळाली ?

२५.आमराव यांच्य मान्यतेसाठी शिक्षकेतर कर्मचा-यांची सिनिअरीटी लिस्ट शिक्षणाधिका-यांचा सादर केली होती का ? त्याची झेरॉक्स प्रत मिळावी.

२६.शाळेतील बरेचसे शिपाई शैक्षणिक दृष्टया पात्र असतांना त्यांना पदोन्नती का दिली नाही ?

२७.शिक्षकेतर कर्मचा-यांना पदोन्नतीसाठी अर्ज सादर केले होते. त्याचा विचार का केला नाही?

२८. नविन नेमणूक करतांना प्रथम कायम स्वरुपी व शैक्षणिक पात्र असलेल्या शिपायांचा विचार करायला हवा होता त्यांना का डावलण्यात आले ?

२९.शाळेच्या संच मान्यतेची २००३ ते २००७ पर्यंत झेरॉक्स प्रत मिळाव्यात ?

३०.मुख्याध्यापिका यांना कायमस्वरुपी मान्यता मिळाली का ? त्याची झेरॉक्स प्रत मिळावी.

३१.मुख्याध्यापिका यांची नेमणूक कोणत्या कॅटेगरी मध्ये झाली ?”

अपिलार्थीने मागितलेली माहिती ही केवळ वर्तमानकाळातील किंवा भूतकाळातील नसून त्यांनी भविष्य काळातील मागणी या अर्जाव्दारे केली आहे, हे येथे प्रामुख्याने विचारात घ्यावे लागेल.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १८-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये अपिलार्थीस, " आपण विचारलेल्या बाबीवर उत्तर देण्यास व माहिती पुरविण्यास पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यालय, मुंबई हेच केवळ सक्षम आहेत. अशा परिस्थितीत सदरहू बाबीवर टिप्पणी करणे हे माझ्या कार्यक्षेत्राचा विचार करता उचित नाही. करिता माहितीच्या अधिकाराचा कायदा २००५ यातील कलम ६ (३) नुसार पिपल्स एज्यूकेशन सोसायटी, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे." तरी कृपया या संदर्भात यापूढे सदरहू संस्थेशी संपर्क साधावा, असे उत्तर दिले.

सदर मुख्याध्यापक हया जनमाहिती अधिकारी म्हणून संस्थेने घोषीत केलेले असल्यामूळे ही माहिती त्यामूळे अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी आपली जबाबदारी या पत्राव्दारे झटकून टाकल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांच्याकडे त्यांचा दिनांक- २०-१२-२००६ च्या अपील अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले.

शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी दिनांक- २६-१२-२००६ रोजी अपिलार्थीस या प्रकरणी संबंधित संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील करावे, अशा सूचना दिल्या. वरील सूचनास अनुसरुन अपिलार्थीने दिनांक ०३-०१-२००७ रोजी संबंधित संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. संस्थेचे जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. अपिलार्थी या सुनावणीमध्ये सांगत आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या विधानास दुजोरा दिला आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही हवी आहे. ते या शिक्षण संस्थेमध्ये शिपाइ या पदावर काम करीत असून संस्थेने 'लिपीक' या पदाची भरती करतांना अपिलार्थीच्या नावाचा विचार केला नसल्याने त्यांनी माहिती आयोगाकडे धाव घेतली असल्याचे पुढे सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या तर्फे असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या संस्थेस शिपाइ या पदावर कार्यरत असून त्यांच्या शाळेमध्ये श्री.आमराव हे संगणक प्रशिक्षक म्हणून कामाला होते. लिपीक या पदास लागणारी पात्रता ते पूर्ण करीत होते व त्यांना संगणकाचे ज्ञान नसल्यामूळे त्यांनी श्री. आमराव यांच्या नावास पसंतीक्रम देवून श्री. आमराव यांची संस्थेमध्ये रिक्त असलेल्या लिपीक पदावर नेमणूक केली आहे. याचबरोबर त्यांना माहिती अधिकार कायद्या विषयी फारसे ज्ञान नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले.

वरील घटनाक्रम पहाता अपिलार्थी यास लिपीक पदावर नेमणूक मिळणे संदर्भात घ्यावयाचा निर्णय ही सर्वस्वी संबंधित संस्थेच्या अखत्यारीतील बाब आहे. त्यावर आयोगाचे काहीही भाष्य नाही. तथापि केवळ माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीचे ज्ञान

जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेतले नसल्याने ते अपिलार्थीस ही माहिती देण्यामध्ये त्यांना उशिर झाला आहे. असे या प्रकरणी दिसून येत आहे.

आज रोजी अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती बरोबर आणली असून ती त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीस दिली आहे. ही माहिती पाहून अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. एवढे जरी झाले तरी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये जो विलंब लावला आहे त्या प्रित्यर्थ त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात व माहिती अधिकार अधिनियम २००५मधील तरतूदीनूसार प्राप्त झालेल्या विविध अर्जाचा त्यांनी अधिनियमात विहित केलेल्या मुदतीमध्ये सकारात्मक दृष्टीकोन ठेवून निपटारा करावा, अशा त्यांना सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबद्दल त्यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि.बा.बोरगे)
दिनांक- ०६-०९-२००७. — राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. देहरे शिवशर्मा रघुनाथ, वुंदावन कॉलनी, संगिता कॉलनी शेजारी, नंदनवन कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद
२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मिलींद मल्टीपरपज हायस्कूल, नागसेवनवन,औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा सचिव, पिपल्स एज्युकेशन सोसायटी आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. अध्यक्ष, पिपल्स एज्युकेशन सोसायटी,मुंबई, आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड,मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८७**

**निर्णय** ०६-०९-

**दिनांक** २००७

श्रीमती एम. डी. वाघ : अपिलार्थी

(श्रीमती एम. एच. धोंडे), भाग्यनगर, गणेश

मंदिराजवळ, श्रीनिवास बंगल्यासमोर,

पारनेरकर महाराज मंदिरामागे, बीड

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक संस्कार विद्यालय (प्राथमिक
विभाग), बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती एम. डी. वाघ (श्रीमती एम. एच. धोंडे), जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक संस्कार विद्यालय श्री. बाळासाहेब दत्तात्रय कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९७९ ते ८२ व आजपर्यंतच्या (अर्ज केलेल्या दिनांकापर्यंत) कालावधीतील संस्कार विद्यालयामधील कर्मचा-यांच्या / शिक्षकांच्या नेमणुका व मान्यता प्रस्तावाच्या व शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या मान्यतेबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. सन १९७९ ते १९८२ या कालावधीत आपणामार्फत माझ्या नेमणूक व मान्यता प्रस्तावाच्या ज्या प्रती मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविल्या त्या प्रस्तावाच्या प्रती,

२. या प्रस्तावांना मान्यता दिलेल्या शिक्षणाधिकारी यांच्या मान्यता पत्राच्या प्रती,

३. या कालावधीतील सह शिक्षक पदासाठी नेमणूक केलेल्या शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी,

४. संस्थेने स्थापनेपासून आजपर्यत नियुक्त केलेल्या सर्व कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी, नांव, पद, पात्रता, प्रथम नेमणूक दिनांक व वेतनश्रेणी वगैरे सर्व माहितीसह द्यावी. (सेवा जेष्ठता यादी ही कर्मचा-यांची जेष्ठता ठरविणारी असते त्यावर याची वेतनश्रेणी अवलंबून असते त्यामुळे रेकॉर्ड जळाल्याचे कारण दाखवू नये कारण त्यानंतरही सर्व रेकॉर्ड संबंधितांकडे उपलब्ध आहे)

सदर माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिका-यास दिनांक ०६-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम उत्तर दिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील रेकॉर्ड त्यांच्या संस्थेच्या शाळेत सन १९९३ साली झालेल्या जळीत प्रकरणामध्ये नष्ट झाले असून सदर रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००६ च्या अर्जान्वये प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची व शास्ती लावण्याची कारवाई करण्याची विनंती केली आहे. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०७-२००६ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक ०४-०८-२००६ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिल निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

विलंबाने माहिती दिल्याप्रित्यर्थ त्यांना जबाबदार ठरविले असून त्यांच्यावर ९२५० रुपये इतकी शास्ती लावण्याची शिफारस केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी शिफारस केलेल्या शास्तीच्या रकमेमध्ये वाढ करण्याची व माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करण्या-संदर्भात आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक ०५-०७-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती. या पुष्ठ्यर्थ त्यांनी तयार केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती आयोगास दाखविल्या. यावरुन ही माहिती त्यांनी दिनांक ०५-०७-२००६ रोजी तयार करुन ठेवल्याचे दिसून येते व ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००६ रोजी देऊन ती मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीची सही त्यांच्या स्थळप्रतीवर घेतल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती न देण्याचा किंवा माहिती देण्यामध्ये टाळाटाळ करण्याचा त्यांचा या प्रकरणात उद्देश नव्हता. त्यांनी माहिती विहित मुदतीत म्हणजेच दिनांक ०५-०७-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती.

जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना ३७ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्यामुळे शास्तीची शिफारस केली आहे. जन माहिती अधिका-यास कोणत्याही अर्जदाराने त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास त्यांना ही माहिती ३० दिवसाच्या आत देणे बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती

शोधून तयार करणे इत्यादी प्रक्रिया करण्याकरिता माहिती अधिकार अधिनियमामध्ये ३० दिवसाचा कालावधी दिलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना या ३० दिवसाच्या कालावधीचा विचार केलेला दिसून येत नाही, जो त्यांनी निर्णय देण्यापुर्वी करणे आवश्यक होते. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना विलंब लागला हे जरी खरे असले तरी तो ३४ दिवसांचा नसून १० दिवस इतका आहे. हा विलंब माहिती तयार करणे व अपिलार्थीपर्यत ती पोहोचवणे या प्रोसेसमध्ये लागला आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. एवढेच नव्हे तर ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्या वकिलाकडे ते ४ ते ५ वेळेस गेले असता अपिलार्थीच्या वकिलाची व त्यांची भेट होऊ शकली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात त्यांच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांना आयोगाकडे कोणताही पुरावा सादर करता आली नाही. त्यांनी आज पुढे असा युक्तिवाद मांडला की, शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे दिनांक १८-०१-२००६ च्या आदेशाप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी तर त्या शाळेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी आहेत त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी घेण्यास गट शिक्षणाधिकारी हे सक्षम नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने चुकिच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले असून त्यांनी हे अपील या शिक्षण संस्थेच्या सचिवाकडे करावयास हवे होते तथापि त्यांनी तसे न करता त्यांनी गट शिक्षणाधिका-याकडे जे अपील ठरविण्यास सक्षम नाहीत व या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नाहीत यांच्याकडे केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात शिक्षण संचालकाचे संदर्भीय आदेश दाखविले यामध्ये खाजगी प्राथमिक शाळेकरिता मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी तर सदर संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे स्पष्ट पणे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा मान्य करण्यात येत असून अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (१) च्या तरतुदीनुसार चुकिच्या प्राधिकरणाकडे अपील केले

आहे हे आयोगास दिसून आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अपील चालविण्याची अधिकारिताच मुळात नाही असे आयोगास आढळून आले आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर वाढीव शास्ती लावण्याची त्यांनी विनंती आयोगास मान्य करता येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेली सर्व उपलब्ध माहिती दिली आहे हे पाहता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक २९-०१-२००६ चे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक २९-०९-२००६ चे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती एम. डी. वाघ (श्रीमती एम. एच. धोंडे), भाग्यनगर, गणेश मंदिराजवळ, श्रीनिवास बंगल्यासमोर, पारनेरकर महाराज मंदिरामागे, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक संस्कार विद्यालय (प्राथमिक विभाग), बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८८**

**निर्णय दिनांक ०६-०९-२००७**

श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, : अपिलार्थी
एन-९, एम-२, ९९/३, जैन मंदिरासमोर,
सिडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद), उपविभाग,
वैजापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री. राजेंद्र मधुकर अमृतकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " सन २००५-२००६ या कालावधीतील यांच्या कार्यक्षेत्रातील एस. जी. आर. वाय. आणि राष्ट्रीय कामासाठी धान्य कार्यक्रम योजने अंतर्गत, कामावर उपस्थित असलेल्या मजुरांच्या मस्टरच्या सत्य प्रतिलिपी (कुपन रकमा वाटपासहीत) मिळण्याबाबत अर्ज केला होता."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थी यांच्याकडे आज ते दारिद्र्य रेषेखालील असल्याच्या प्रमाणपत्राची मूळ प्रत मागितली असता ते ती आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीच्या प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम उत्तर दिले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-१२-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीकडून सादर करण्यात आलेल्या

कागदपत्रा बरोबर जोडले आहे. सदर पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व सविस्तर स्वरुपाची आहे व ही माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्याचे कार्यालयात एकूण लिपिकाच्या पदापैकी फक्त २ कनिष्ठ लिपिकाची पदे भरलेली असून अपिलार्थीस ही माहिती देण्यास विलंब लागणार असल्याचे त्यांनी कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली होती. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय त्यांच्या कडील दिनांक ०६-०२-२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यास त्यांच्याकडे पुरेसा निधी नसल्याचे स्पष्ट करुन सदर निधी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती देणे शक्य होईल असे कळविले व त्याच बरोबर ही माहिती त्यांच्या कार्यालयात हजर राहून अपिलार्थीने पहावी अशा अर्थाचे अपिलार्थीस याच पत्रामध्ये पुढे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी हा निधीचा मुद्दा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये उपस्थित केला होता किंवा कसे असे विचारले असता त्यांनी आयोगास होकारार्थी उत्तर दिले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्याचा निर्णय या सर्व बाबी विचारात घेवून दिला आहे असे आयोग गृहीत धरीत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिल निर्णयानेही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडला की, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्याप्रमाणे, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्वरीत पुरवावी. ही माहिती पुरविण्यापोटी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या, ते दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबतच्या त्यांच्या प्रमाणपत्राची सत्यसत्यता पडताळून पाहण्यास त्यांना मुभा राहील.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांना निधी व पुरेशा मनुष्यबळाअभावी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देणे शक्य झाले नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी एकंदर ३००० पानांच्या झेराक्स प्रती त्यांना अंदाजे काढाव्या लागतील व झेरॉक्स प्रती काढण्याच्या प्रित्यर्थ तरतूद त्यांच्याकडे त्यावेळी नव्हती म्हणून ही तरतूद प्राप्त करुन घेण्या-करिता त्यांनी त्यांचे कार्यकारी अभियंता यांचे मार्फत ०१ मार्च २००७ रोजी अतिरिक्त तरतुदीची मागणी केली होती. यासंबंधीचे सदर दिनांक ०१-०३-२००७ रोजीचे पत्र त्यांनी आयोगास सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणातील घटनाक्रम पाहिला असता अपिलार्थीने सविस्तर व विस्तृत स्वरुपात माहितीची मागणी केली आहे. ही माहिती देण्यासाठी त्यांच्या कडे पुरेसे आर्थिक व मनुष्यबळ नाही. त्यांनी आपले हे म्हणणे विहित मुदतीत अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या भागाची माहिती देण्यास ते तयार आहे हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोठेही नकारात्मक दृष्टीकोन ठेवल्याचे दिसून येत

नाही. आयोगासोर सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अशी बाब आयोगाच्या निदर्शनास आणली की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्ज करुन माहितीची मागणी करत असतात त्यापैकी काही अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्य रेषेखालील नसल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांच्याकडे एकून ४ उप विभाग असून प्रत्येक उपविभागाकडे अपिलार्थीचे माहितीसाठी दिलेले सरासरी १० अर्ज पडून आहेत. अपिलार्थी खरोखरच दारिद्र्य रेषेखालील आहेत किंवा कसे याची पडताळणी त्यांनी अद्यापपर्यंत केलेली नाही. यावर अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून माहिती मिळत नाही त्यामुळे त्यांना माहिती करिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे वारंवार अर्ज करणे भाग पडते.

वरील वस्तुस्थिती व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रथम तयार ठेवावी. तदनंतर अपिलार्थी खरोखर दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे याची संबंधीत प्राधिकरणाकडून चौकशी करावी त्यांना आवश्यक वाटल्यास ते या प्राधिकरणाच्या कार्यालयास भेट देऊन शकतील. संबंधीत प्राधिकरणाने जन माहिती अधिकारी यांना संबंधीत तपशील तपासणी कामी पूर्ण सहकार्य करावे. जर अपिलार्थी खरोखरच दारिद्र्य रेषेखालील असतील तर त्यांना, त्यांनी मागितलेली पूर्ण माहिती तदनंतर ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व जर अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील नसतील तर त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार आवश्यक फीची आकारणी करुन घेऊन सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा झाल्यानंतर ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रथम तयार ठेवावी. तदनंतर अपिलार्थी खरोखर दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे याची संबंधीत प्राधिकरणाकडून चौकशी करावी त्यांना आवश्यक वाटल्यास ते या प्राधिकरणा-च्या कार्यालयास भेट देऊन शकतील. संबंधीत प्राधिकरणाने जन माहिती अधिकारी यांना संबंधीत तपशील तपासणी कामी पूर्ण सहकार्य करावे. जर अपिलार्थी खरोखरच दारिद्र्य रेषेखालील असतील तर त्यांना, त्यांनी मागितलेली पूर्ण माहिती तदनंतर ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व जर अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील नसतील तर त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार आवश्यक फीची आकारणी करुन घेऊन सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा झाल्यानंतर ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, एन-९, एम-२, ९९/३, जैन मंदिरासमोर, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद), उपविभाग, वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९०**

**निर्णय दिनांक** ०६-०९-२००७

श्री. खान रजाउल्लाह हिदायतउल्लाह, : अपिलार्थी

अल्फलाह उर्दू शाळेजवळ, सनअतनगर,

लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, शिक्षण

उप संचालक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. खान रजाउल्लाह हिदायतउल्लाह (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उप संचालक श्री. सुनिल रतनसिंग चौहाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. विजय वसंतराव जोशी सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ष ९६-९७, ९७-९८ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ ज. क्र. प्रावि-३/१९९६-९७ मा. शिक्षण उप संचालक औरंगाबाद दिनांक ३१-१२-९६ चे आदेश व आदेश ज्या टिपणीव्दारे पारीत करण्यात आले त्याची झेरॉक्स प्रत,

२. जा. क्र. प्रावि-१/९६-९७  १३८३० दिनांक ३०-०३-९७ शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांचे आदेश व आदेश ज्या टिपणीव्दारे पारीत करण्यात आले त्याची झेरॉक्स प्रत,

३. जा. क्र. प्रावि-३/९६-९७/२४९७०७१दिनांक ०४-०८-९७ शिक्षण उप संचालक औरंगाबाद चे आदेश व आदेश ज्या टिपणीव्दारे पारीत करण्यात आले त्याची झेरॉक्स प्रत.”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने केलेल्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ च्या पत्राने प्रथम उत्तर दिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीकडे त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधीत शाळेचे पूर्ण नाव व पत्ता याबाबतची माहिती अपिलार्थीस विचारली. शिक्षण उप संचालकाच्या कार्यालयात लातूर सारख्या शहरातील उर्दू शाळांचे पत्ते उपलब्ध नसावेत ही बाब त्या कार्यालयाच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विनंतीनुसार अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००६ रोजी जन माहिती अधिका-यास संबंधीत शाळेचे नांव व पत्ता कळविला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००६ च्या अर्जान्वये प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून घेण्यात आली नसल्याचे सांगितले. सदर बाबीस जन माहिती अधिकारी यांनी दुजोरा दिला आहे.

यावर व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थी हे अद्यापही त्यांच्या मूळ माहितीच्या मागणी वर ठाम असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कडील दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना अंशतः माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद मांडला की त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मान्यता व अनुदानाच्या आदेशाच्या प्रती

अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजी पुरविल्या आहेत. तथापि ते, अपिलार्थीने मागितलेल्या हे आदेश काढण्यापुर्वीच्या टिपणीच्या प्रती अद्यापही अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लातूर जिल्ह्याशी संबंधीत असून त्यांच्या औरंगाबादस्थित कार्यालयाकडे पुर्वी औरंगाबाद महसूल विभागातील आठही जिल्ह्याचा कारभार होता. तथापि जुलै २००३ मध्ये लातूर येथे शिक्षण उपसंचालकाचे स्वतंत्र कार्यालय उघडण्यात आले त्यावेळी लातूर विभागाशी संबंधीत सर्व नस्त्या लातूर विभागाकडे औरंगाबाद येथून हस्तांतरीत केल्या. अपिलार्थीने मागितलेली माहिती ९६-९७, ९७-९८ या सालातील असल्यामुळे ही माहिती शोधण्यास त्यांना अद्यापही वेळ लागेल असे त्यांनी आयोगा-समोर सांगितले. त्याच बरोबर त्यांनी विशेष अथक प्रयत्न करुन अपिलार्थीस शाळा मान्यता व अनुदान मान्यतेच्या प्रती पुरविल्याचे आयोगासमोर सांगितले.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता विशेषतः औरंगाबाद येथे असलेल्या शिक्षण उप संचालकाचे शासकीय कार्यालयाचे विभाजन झाल्यानंतर व सदरील नस्त्या लातूर येथे औरंगाबाद येथून पाठविण्यात आल्यानंतर ही माहिती शोधण्यास जन माहिती अधिका-यास वेळ लागत आहे व ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी निम्मी माहिती अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजी पुरविली होती. अपिलार्थीस उर्वरीत माहिती किती दिवसात जन माहिती अधिकारी देऊ शकतील हे विचारले असता त्यांनी ही माहिती देण्यास त्यांना २० दिवसांचा कालावधी लागेल व दिनांक २६-०९-२००७ पर्यत ही माहिती देण्याचे कबूल केले. अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर ३ दिवसाच्या आत द्यावयाची होती ती माहिती देण्यास देखील त्यांनी एक वर्ष चार महिने २१ दिवस इतका अक्षम्य विलंब केल्याचे या प्रकरणी

नि:संशयपणे सिध्द होत आहे याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे भविष्यात अशा प्रकारच्या चूका त्यांनी टाळाव्यात अशी सक्त ताकीद देण्यात येत आहे.

प्रसंगवशात या ठिकाणी असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन माहिती अधिकार अधिनियमाचे त्यांना काहीही देणे-घेणे नसल्याचे आपल्या कृतीव्दारे सिध्द केले आहे. शिक्षण विभागासारख्या महत्वाच्या विभागामध्ये जर माहिती अधिकाराचा अशा प्रकारे अनादर व्यक्त केला जात असेल तर इतर विभागाकडे या अधिनियमाविषयी काय भावना असतील याची कल्पना न केलेली बरी. सचिव (शिक्षण) यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील न ठरविण्याच्या त्यांच्या कृतीबद्दल योग्य ती दखल घ्यावी असे त्यांना, या निमित्ताने आयोग सुचवित आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत झाल्या पासून २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

३. सचिव (शिक्षण) यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील न ठरविण्याच्या त्यांच्या कृतीची योग्य ती दखल घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खान रजाउल्लाह हिदायतउल्लाह, अल्फलाह उर्दू शाळेजवळ, सनअतनगर, लातूर
२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव, (शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९८**

**निर्णय** ०७-०९-

**दिनांक** २००७

श्री. आर. एम. पोरवाल, : अपिलार्थी

बालाजी मंदिर रोड, परतूर

जिल्हा जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, परतूर,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा. प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांच्या वतीने त्यांचे वकील श्री. दिगंबर शेषराव काळे, जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, परतूर श्री. पांडुरंग माणिकराव मसलेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्री. पद्‌माकर कुलकर्णी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे परतूर नगरपरिषदे अंतर्गत घर नंबर १७४८ व १७४९/१ या संदर्भात त्यांनी मुख्य अधिकारी नगर परिषद यांच्याकडे दिलेल्या दिनांक १०-०१-२००६ रोजीच्या नामांतर करण्यासंबंधी दिलेल्या अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने दिनांक २७-०१-२००६ रोजी अर्ज करण्यापुर्वी या संबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००६ रोजी याच प्रकारचा विनंती अर्ज सादर केला होता.

अपिलार्थीच्या या दिनांक १०-०१-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. अपिलार्थीच्या

आज प्रश्नाधीन असलेल्या दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतेही उत्तर अथवा माहिती दिली नसल्याचे दिसते.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २४-०१-२००६ च्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस घर नंबर १७४८ व १७४९/१ ची नामांतर संचिका नगरपरिषदेचे कायदे विषयक सल्लागार यांच्याकडे मार्गदर्शनास्तव पाठविली असून सदर संचिका नगरपरिषदेस प्राप्त होताच सदर संचिकेमध्ये काय कारवाई केली याची संपूर्ण माहिती आपणास तात्काळ देण्यात येईल असे म्हटले आहे. सदर पत्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील देशपांडे नावाच्या शिपायाने दाखविले तथापि त्यात संचिका कोणत्या वकिलाकडे व केव्हा पाठविली याचा निश्चित खुलासा नव्हता म्हणून त्यांनी हे पत्र जन माहिती अधिका-यास परत केले. परत करण्याचे कारण म्हणून त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केलेल्या दिनांक २७-०१-२००६ च्या अर्जामध्ये देशपांडे शिपाई यांनी पत्र कोणत्या वकिलाकडे व केव्हा पाठविले याची माहिती आणून देतो असे सांगितल्यावरुन त्यांनी हे पत्र संबंधीत शिपायाकडे परत केल्याचे म्हटले आहे.अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड अथवा स्पीड पोस्टाव्दारे मागितली नसून ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत पाठवावी अशा अर्थाचे मोघम विधान त्यांच्या माहितीसाठीच्या प्रश्नाधीन अर्जात केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त यांच्याकडे दिनांक २२-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणाची विभागीय आयुक्त तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०४-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १५-०४-२००६ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थी यांचे अपील मान्य करुन अपिलार्थी यांनी

दिनांक १०-०१-२००६ व दिनांक २७-०१-२००६ च्या अर्जान्वये मागितलेली सर्व माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिका-यास आदेश दिले.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या नस्तीची पाहणी केली असता या प्रकरणातील आदेश जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयाकडून दिनांक २०-०५-२००६ रोजी निर्गमीत झाल्याचे दिसून येते तथापि हे आदेश जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयुक्तांनी आदेश दिल्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिला-मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही त्यांनी माहिती न पुरविल्याने संबंधीत जन माहिती अधिका-यावर दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना अद्यापपावेतो देखील संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थी यांना परतूर येथील घर क्रमांक १७४८ व १७४९/१ या परतूरस्थित घराच्या मालकी हक्काचे नामांतर करुन पाहिजे होते. या दृष्टीने त्यांनी मुख्य अधिकारी नगर परिषद परतूर यांच्याकडे अर्ज करुन त्यावर अद्याप कारवाई झाली नाही, ही कारवाई न होण्याची कारणे समजण्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००६ व दिनांक २७-०१-२००६ रोजी अर्ज केले होते तथापि ही माहिती त्यांना अद्यापही प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांना दंडीत करावे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीने अशाच प्रकारचा अर्ज दिनांक १०-०१-२००६ रोजी त्यांच्याकडे केला असता त्यांनी त्यांचे कडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील लक्ष्मणराव देशपांडे या शिपायामार्फत पाठविली होती ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ह्या माहितीबाबत त्यामध्ये संबंधीत वकिलाचे नाव नसल्याने व सदर संचिका वकिलाकडे केव्हा पाठविली त्याचा उल्लेख नसल्याने ते पत्र मूळ स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत केले. अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कडे केलेले दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांची कबुली दिली आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या प्रकरणाची सद्यस्थिती माहिती होती असे दिसून येते. तथापि अपिलार्थीस जी माहिती अपेक्षित होती ती माहिती जन माहिती अधिकारी यांना सहज देणे शक्य होते हेही तितकेच खरे आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती माहिती न दिल्याचे या प्रकरणी सिध्द होते. वस्तुतः अपिलार्थीने संदर्भित केलेल्या प्रकरणाची संचिका परतूर येथीलच वकिलाकडे पाठविण्यात आली होती. या वकिलाकडून संदर्भिय संचिका प्राप्त करुन घेऊन त्यातून अपिलार्थीस ही माहिती देणे हे जन माहिती अधिका-यास सहज शक्य होते असे आयोगाचे मत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत त्यांच्या कार्यालयास पोहोचली नाही असे जन माहिती अधिकारी म्हणतात. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते व जन अपिलीय अधिकारी यांनी तोंडी दिलेले आदेश त्यांना माहित होते. याप्रित्यर्थ जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित असल्याबाबत चा त्या दिवशीचा रोजनामा आयोगास दाखविला. यावरुन जन माहिती अधिकारी यांची

अपिलार्थीस माहिती देण्याची मनोमनी इच्छा नसल्याचे स्पष्ट होते त्यामुळे ही माहिती न देण्याची कारणे त्यांनाच ठाऊक असावीत असे अनुमान आयोग काढीत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या नावावर संबंधीत घराचे नामांतर झाले असल्याचे सांगितले. जरी अपिलार्थीच्या मूळ विनंतीप्रमाणे नामांतराची कारवाई पूर्ण झाली असली तरी अपिलार्थीस हवी ती इतर संलग्न माहिती विहित मुदतीमध्ये देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कसूर केला हे या प्रकरणी सिध्द होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास ते अशा त-हेने पात्र ठरल्याने असे आदेशित करण्यात येते की :

१. सचिव (नगरविकास) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ७ चा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य कारवाई करावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली प्रकरणाशी संबंधीत असलेली संचिका वकिलाकडून मागवून घेऊन त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली प्रकरणाशी संबंधीत असलेली संचिका वकिलाकडून मागवून घेऊन त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (नगरविकास) यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ७ चा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्यात सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आर. एम. पोरवाल, बालाजी मंदिर रोड, परतूर जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (नगरविकास), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५००**

**निर्णय दिनांक ०७-०९-२००७**

१. दक्ष नागरिक समिती, : अपिलार्थी

व्दारा/- अ.लतीफ कुरेशी,
मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ.लतीफ कुरेशी, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी श्री.हरिचंद्र आनंदा गवळी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, श्री.पिरतवाड प्रकाश मोतिराम ( यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी दक्ष नागरिक समिती व्दारा अ.लतीफ कुरेशी, मु.पो.आखाडा बाळापूर, तालूका-कळमनूरी, यांच्यातर्फे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-१०-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल झाले आहे. यामध्ये राष्ट्रीय कुटूंब लाभ योजने अंतर्गत आज दिनांक- २७-०३-२००६ पर्यंत मंजुर करण्यात आलेल्या व अनुदानाचे धनादेश अद्याप न देण्यात आलेल्या लाभार्थ्याच्या नावाची यादीची सर्टीफाईड कॉपीज मिळणे बाबत आयोगास विनंती केली आहे.

प्रथम दर्शनी आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, माहितीची मागणी करणारी व्यक्ती ही कोणी एक व्यक्ती नसून दक्ष नागरिक समिती या नावाची समिती आहे. सदर समितीच्या प्रतिनिधीकडे या समितीची स्थापना कोणत्या कायद्यांतर्गत झाली आहे किंवा अन्य मार्गाने तिची वैधता सिध्द करण्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आज रोजी उपलब्ध नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे अपील करतांना अपिलकर्त्याचे नाव या सदराखाली दक्ष नागरीक समिती व्दारे अ.लतिफ कुरेशी असा उल्लेख केला आहे. अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी करतांना व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना देखील अपिलकर्त्याच्या नावे दक्ष नागरिक समिती असा उल्लेख केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम ३ व ६ मधील तरतूदी खालील प्रमाणे आहेत.

**कलम ३ ( माहितीचा अधिकार )**

" ३. या अधिनियमाच्या तरतुदीना अधिन राहून सर्व **नागरिकांना** माहितीचा अधिकार असेल, त्याच बरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) मध्ये खालील प्रमाणे उध्दृत केलेले आहे."

**कलम ६ ( माहिती मिळण्याकरिता विनंती करणे )**

६. (१) या अधिनियमा अन्वये कोणतीही माहिती मिळण्याची इच्छा **असलेली व्यक्ती, त्याने किंवा तीने** मागणी केलेल्या माहितीचा तपशील. **...**"

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये वरील कलमांचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की, हे अधिकार फक्त सजीव मनुष्य प्राण्याला आहेत. या दाव्या पृष्ठयर्थ राज्य माहिती आयोग गोवा यांनी दिनांक- १९-१०-२००६ रोजी तक्रार क्रमांक- २५/ २००६ च्या मे.लाल्का असोसिएटस विरुध्द जनमाहिती अधिकारी या संदर्भातील खालील आदेश येथे विशेष करुन उध्दृत करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते.

" However, the request for obtaining the information, which is prescribed under Section 6, has to be made only by a human being and not by a company or firm society or other legal person. This is clear from the words " specifying the particulars of the information sought by him or her. " This clinches the issue that only human beings (natural persons ) can request for the information as the companies are in the neutral gender"

सदर आदेश या प्रकरणी देखिल तंतोतंत लागू पडत असल्याने प्रस्तुत प्रकरणी देखिल उपरोक्त निर्देशित केलेली कारणमिमांसा या प्रकरणास लावणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०७-०९- २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ. लतीफ कुरेशी, मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५०२**

**निर्णय दिनांक ०७-०९-२००७**

१. दक्ष नागरिक समिती, : अपिलार्थी
व्दारा/- अ.लतीफ कुरेशी,
मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ.लतीफ कुरेशी, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी श्री.हरिचंद्र आनंदा गवळी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, श्री.पिरतवाड प्रकाश मोतिराम ( यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी दक्ष नागरिक समिती व्दारा अ.लतीफ कुरेशी, मु.पो.आखाडा बाळापूर, तालूका-कळमनूरी, यांच्यातर्फे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-१०-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल झाले आहे. यामध्ये सदर समितीने मौजे महालिंगी येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या चौकशीच्या जबाबाच्या सत्यप्रती मिळणे बाबत आयोगास विनंती केली आहे.

प्रथम दर्शनी आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, माहितीची मागणी करणारी व्यक्ती ही कोणी एक व्यक्ती नसून दक्ष नागरिक समिती या नावाची समिती आहे. सदर

समितीच्या प्रतिनिधीकडे या समितीची स्थापना कोणत्या कायद्यांतर्गत झाली आहे किंवा अन्य मार्गाने तिची वैधता सिध्द करण्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आज रोजी उपलब्ध नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे अपील करतांना अपिलकर्त्याचे नाव या सदराखाली दक्ष नागरीक समिती व्दारे अ.लतिफ कुरेशी असा उल्लेख केला आहे. अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी करतांना व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना देखील अपिलकर्त्याच्या नावे दक्ष नागरिक समिती असा उल्लेख केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम ३ व ६ मधील तरतूदी खालील प्रमाणे आहेत.

**कलम ३ ( माहितीचा अधिकार )**

"३. या अधिनियमाच्या तरतुदीना अधिन राहून सर्व **नागरिकांना** माहितीचा अधिकार असेल, त्याच बरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) मध्ये खालील प्रमाणे उध्दृत केलेले आहे."

**कलम ६ ( माहिती मिळण्याकरिता विनंती करणे )**

६. (१) या अधिनियमा अन्वये कोणतीही माहिती मिळण्याची **इच्छा असलेली व्यक्ती, त्याने किंवा तीने** मागणी केलेल्या माहितीचा तपशील. ..."

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये वरील कलमांचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की, हे अधिकार फक्त सजीव मनुष्य प्राण्याला आहेत. या दाव्या पृष्ठयर्थ राज्य माहिती आयोग गोवा यांनी दिनांक- १९-१०-२००६ रोजी तक्रार क्रमांक- २५/ २००६ च्या

मे.लाल्का असोसिएटस विरुध्द जनमाहिती अधिकारी या संदर्भातील आदेश येथे विशेष करुन उध्दृत करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते.

" However, the request for obtaining the information, which is prescribed under Section 6, has to be made only by a human being and not by a company or firm society or other legal person. This is clear from the words " specifying the particulars of the information sought by him or her. " This clinches the issue that only human beings (natural persons ) can request for the information as the companies are in the neutral gender"

सदर आदेश या प्रकरणी देखिल तंतोतंत लागू पडत असल्याने प्रस्तुत प्रकरणी देखिल उपरोक्त निर्देशित केलेली कारणमिमांसा या प्रकरणास लावणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०७-०९- २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ. लतीफ कुरेशी, मु. पो. आखाडा

बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९६
निर्णय दिनांक- १०-०९-२००७

१ श्री.आश्रुबा अण्णासाहेब मजमुले, : अपिलार्थी
बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड,
बीड, ता.जि.बीड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस : प्रतिवादी
अधिकारी, उपविभाग, बीड, ता.जि.बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड, ता.जि.बीड.

# विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १०-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.आश्रुबा अण्णासाहेब मजमुले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांच्या वतीने श्री. शेख फिरोज चाँद, पोलीस निरीक्षक (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१८-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

'' डॉ.ए.ए.मजमुले यांवरील गुन्हा नंबर २८१/२००४ पो.स्टे. बीड शहर दिनांक- १६-०९-२००४ च्या संदर्भात आज पर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या तपास अहवालाच्या प्रती व तपासाच्या सद्यस्थितीची माहिती.''

अपिलार्थीने वरील माहिती टपालाने अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामूळे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या प्रथम अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) मधील कलमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या या प्रथमअपीलावर जनअपिलीय

अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-२००६ रोजी त्यांचे कार्यालयात सुनावणी ठेवली होती. तथापि मध्यतरींच्या काळात जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००६ रोजी त्यांच्या प्रथम माहिती अर्जाच्या संदर्भात एक पत्र लिहण्यात आले. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बीड येथे दिनांक- १६-०९-२००४ रोजी दाखल झालेल्या गुन्हया संदर्भात पुरावा गोळा करण्याचे काम चालू असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (त्र) व (ख) नुसार मागविलेली कागपत्रे त्यांना देता येत नाही, असे कळविले. तदनंतर जनअपिलीय अधिकारी यांनी वरील प्रमाणे दिनांक- ०१-०८-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडे प्रथम सुनावणीस बोलाविले. या सुनावणीच्यावेळी देखील अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार जनमाहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याचा मुद्दा त्यांच्या वकीलामार्फत जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे उपस्थित केला. त्याचबरोबर त्यांनी विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्याचे देखील त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले होते.

या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस बोलाविलेल्या वेळी अपिलार्थी हे स्वतः सुनावणीस हजर राहीले नसल्याचे दिसून येते.

अपिलार्थी हे जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०८-२००६ रोजी सुनावणीस हजर न राहील्याने अपिलार्थीचे अपील जनअपिलीय अधिकारी यांनी फेटाळले. जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००६ रोजी त्यांच्या कडील पत्र क्रमांक- १३६०५, दिनांक- ०३-०८-२००६ अन्वये कळविला आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार दुसरे अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्यास नकार दिला आहे. ही माहिती नाकारता येण्यासारखी नाही. त्यामूळे जनमाहिती अधिका-यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २० (१) २० (२) नुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी नियमबाहय रितीने निकाल दिला असल्याचे त्यांनी या अपीलामध्ये म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांच्या वतीने सुनावणीस कोणीही उपस्थित नाहीत. तर जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या वतीने श्री.शेख फिरोज चाँद, पोलीस निरीक्षक ( पोलीस कल्याण ) बीड हे उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे उपस्थित असलेल्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद मांडला की, अपिलार्थी यांच्या विरुध्द भा.द.वि.संहितेचे कलम ४०९ - सरकारी रक्कमेचा अपहार करणे- या कलमाखाली दिनांक १६-०९-२००४ रोजी गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयाचे चार्जशिट अद्याप तयार व्हावयाचे आहे व या गुन्हयाची चौकशी, पोलीसाकडून पुरावा गोळा करणे व तपास करणे या प्रक्रियेच्या स्तरावर असून ही माहिती अपिलार्थीस या टप्प्यावर दिल्यास या तपासाकामी पुढे अडथळे येवू शकतात.

अपिलार्थीने त्यांच्यातर्फे आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्राव्दारे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, त्यांना नाकारता न येणारी माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून नाकारली गेली आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी नियमबाहय अपील ठरविले आहे. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २०

(१) २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व सुनावणीच्या वेळी जनअपिलीय अधिकारी यांना बोलाविण्यात यावे.

या प्रकरणी अपिलार्थी यांच्यावर सरकारी पैशाचा अपहार करण्याचा गुन्हा दाखल झाला असल्याने व या गुन्हयाच्या संदर्भात  पोलीस अधिकारी तपास करीत असल्याने व तपासाच्या या टप्प्यावर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिल्यास अफरातफीचा तपास करणे व त्यांच्यावर खटला दाखल करणे, इत्यादी प्रक्रियेमध्ये अडथळे येतील, अशी  त्यांची खात्री झाली असल्याचे दिसून येते. त्यामूळे  अपिलार्थीस ही माहिती दिल्यास कलम ८ (१) (ज) चा भंग होईल, हे निःसंशयपणे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देणे, ही त्यांची कृती बरोबर ठरते. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतूदीचा,- "कोणत्याही अर्जदारास त्यांनी माहिती मागितल्यापासून ३० दिवसात माहिती देणे हे जनमाहिती अधिका-यावर बंधनकारक आहे."- त्यांनी अपिलार्थीस माहिती उशिरा देवून भंग केला आहे. हेही निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने दिनांक- १८-०५-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर तो अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०५-२००६ रोजी रजिष्टरपोष्टाने पोंहचला. याचाच अर्थ अपिलार्थीस या अर्जा संबंधिचा निर्णय जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ मधील तरतूदीनूसार दिनांक- १९-०६-२००६ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस आपला निर्णय कळविणे भाग होते. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३०-०६-२००६ रोजी प्रथम अपिल केल्यानंतर दिनांक- १८-०७-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे व त्यामध्ये अपिलार्थीस माहिती न देण्याचा निर्णय त्यांनी कळविला आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या दिनांक- १८-०७-२००६ रोजीच्या या निर्णयाचे अवलोकन करता त्यांनी ज्या कलमाखाली अपिलार्थीस माहिती नाकारली आहे.- ७ (त्र) व (ख)- हे कलमच मुळात माहिती अधिकार

कायद्यात अस्तित्वात नाहीत. त्यांनी अपिलार्थीस कलम ८ (१) (ज) अन्वये अपिलार्थीस ही माहिती नाकारणे उचित ठरले असते. त्याच बरोबर केवळ अपिलार्थी गैरहजर राहीले म्हणून त्यांचे अपील फेटाळण्याची जनअपिलीय अधिकारी यांची कृती देखील चुकीची आहे. त्यांनी हे अपील ठरवितांना जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला निर्णय पारीत करणे गरजेचे होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिनांक- ०१-०८-२००६ रोजी अपिलार्थीच्या वतीने त्यांचे वकील श्री.अजीत ए. देशमूख हे सुनावणीच्यावेळी हजर होते. हे सिध्द होत आहे. आज देखील सुनावणीच्यावेळी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. यावरुन त्यांना माहिती अधिकार २००५ च्या तरतूदीच्या संदर्भात किमान आवश्यक ते ज्ञान नाही हेही सिध्द होत आहे. तेंव्हा सचिव (गृह) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व क्षेत्रीय कर्मचारी / अधिका-यां करिता वेळोवेळी माहिती अधिकार २००५ मधील तरतूदीच्या अमंलबजावणी संदर्भात कार्यशाळा / शिबीरे आयोजीत करावीत.

उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय जरी बरोबर ठरत असला तरी त्यांनी अपिलार्थीस त्यांचा निर्णय अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये विहित केलेल्या तरतूदीपेक्षा विलबाने कळविला. या तरतूदीचा त्यांनी भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी अपिलार्थीस आपला निर्णय विहित मुदतीपेक्षा ३० दिवस उशिराने कळविला आहे. त्यामूळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदी प्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरतात. संबंधित जनमाहिती अधिकारी हे आता सेवानिवृत्त झाल्याचे त्यांचे उपस्थित प्रतिनिधी सांगत आहेत. त्यामूळे प्रचलित सेवानियमा प्रमाणे त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करणे हे या प्रकरणी उचित ठरेल असे आयोगाचे मत आहे.

तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, सचिव (गृह) यांनी संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्यात सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (गृह) यांनी, संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

३. सचिव (गृह) यांनी, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व क्षेत्रीय कर्मचारी / अधिका-यां करिता वेळोवेळी माहिती अधिकार २००५ मधील तरतूदीच्या अमंलबजावणी संदर्भात कार्यशाळा / शिबीरे आयोजीत करावीत.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- १०-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.आश्रुबा अण्णासाहेब मजमुले, बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड, बीड, ता.जि.बीड. ४३११२२.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (गृह) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९४
निर्णय दिनांक- ११-०९-२००७

१ श्रीमती एम.डी.वाघ (श्रीमती एम.एच.धोडे) : अपिलार्थी
भाग्यनगर, गणेश मंदिराजवळ,
श्रीनिवास बंगल्यासमोर, पारनेरकर महाराज
मंदिरामागे, बीड-४३११२२.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, बीड,
तालूका- जिल्हा-बीड

२.	जनअपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ११-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती एम.डी.वाघ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, बीड (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे तिघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जनमाहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, बीड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

“१. मी संस्कार विद्यालय, बीड (प्राथमिक विभाग) येथे १९७९ पासून नौकरीस आहे. संस्थेचे तसे आदेश माझ्याकडे आहेत. मला आपणाकडून १९७९ ते १९८२ पर्यंतच्या आपण या शाळेच्या शिक्षकांना दिलेल्या मान्यता आदेशाच्या प्रती पाहीजे आहेत.

२. सन १९७९ ते १९८२ या कालावधतील या शाळेच्या शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी द्यावी.

३. मला संस्थेने १९७८ ला सहशिक्षक पदावर नियूक्ती /मान्यता दिलेली आहे. तेंव्हा पासून आजपर्यंतची संस्थेची सेवाजेष्ठता यादी द्यावी. यात प्रथमनेमणूक दिनांक,पात्रता वगैरे सर्व माहिती द्यावी. व ती आपल्या कार्यालयातीलच द्यावी. मुख्याध्यापकाचा मार्ग दाखवु नये.

अपिलार्थीने ही माहिती  टपालाने अपेक्षिली होती.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०८-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्राव्दारे जनमाहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, संस्कार विद्यालय, बीड यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती १५ दिवसात सादर करण्या बद्दल कळविले व त्या पत्राची प्रत अपिलार्थीना देवून सदर माहिती त्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे दिनांक- १५-०४-२००४ रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते, असे नमूद करुन मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त होताच त्यांना देण्यात येईल, असे कळविले आहे. त्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी अपीलार्थी यांना दिनांक- ३०-०६-०६ रोजीच्या पत्राव्दारे मुख्याध्यापक, संस्कार विद्यालय,बीड यांनी सादर केलेली माहिती व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बीड यांच्या कार्यालयाकडे असलेली सेवाजेष्ठता यादी सोबत देण्यात येत असल्याचे कळविले. तथापि  त्यामध्ये सन १९७९ ते १९८२ च्या काळातील जेष्ठता यादी उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक- ०४-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २६-०७-२००६ रोजी अपीलाची सुनावणी घेवून दिनांक- २९-०७-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले व त्यामध्ये या प्रकरणाशी संबंधित  संचिका गहाळ करणा-या दोषी कर्मचा-याचा शोध घेवून सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याचे व तसेच अपिलकर्त्यास त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याच्या जनमाहिती अधिकारी यांना सूचना दिल्या.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक- २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी अपिलार्थी यांना अपूरी माहिती पुरविली असून, विहित मुदतीत पुरविली नसल्याचे तसेच जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, बीड यांनी या प्रकरणात कोणतीही चौकशी केली नाही व अपिलार्थीना कळविले नाही. त्यामूळे अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्यात यावी व जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) अन्वये शास्ती लावण्यात यावी. तसेच २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तपासली असता, सदर माहिती अपिलार्थी यांनी या पूर्वी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार विद्यालय, प्राथमिक शाळा, बीड यांच्याकडून दिनांक- ३०-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे मागविलेली माहिती ही एक सारखीच असल्याचे आयोगास आढळले आहे. त्या अर्जा संबंधीच्या व्दितीय अपील क्रमांक ४८७/२००७ च्या प्रकरणामध्ये दिनांक- ०६-०९-२००७ रोजी सुनावणी होवून आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. त्या अपील सुनावणीच्यावेळी सुध्दा अपिलार्थी गैरहजर होत्या. त्यावेळी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली व संस्थेकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे सांगितले होते व त्या व्यतिरीक्त त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले होते. अपीलार्थीचे निवेदन व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून सदर अपील फेटाळण्यात आले होते.

या प्रकरणी शिक्षण विभागातर्फे सर्व खाजगी शाळांच्या बाबतीत सबंधित शाळाचे मुख्याध्यापक हे जनमाहिती अधिकारी व संस्थेचे सचिव यांची जनअपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याबद्दल आदेश जारी केलेले आहेत व त्यानूसार अपिलार्थी यांनी या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हापरिषद बीड यांच्याकडे प्रथम पाठविलेला माहितीचा अर्ज हा

चुकीच्या प्राधिकरणाकडे पाठविल्याचे दिसून येते. अपीलार्थी यांनी त्याच दिवशी दुस-या अर्जाव्दारे शाळेच्या मुख्याध्यापकाकडेही याच माहितीच्या मागणीचा अर्ज केला होता. याप्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतूद ६ (३) (i) अन्वये संबधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे हा अर्ज पाठविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तशी कोणतीहि कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीने शिक्षणाधिका-या व्यतिरिक्त अशीच माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दुस-या अर्जान्वये मागितली होती व ती त्यांना प्राप्त झाली आहे हे पाहता व अशा प्रकारच्या माहिती करिता शिक्षण संचालकाच्या परिपत्रकान्वये मुख्याध्यापक हे जनमाहिती अधिकारी व संस्थेचे सचिव जनअपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने अपिलार्थीने चुकिच्या प्राधिकरणाकडे अर्ज व अपिल केले असल्याचे सिध्द होत आहे. संबंधितांना या अर्ज प्रकरणी निर्णय व अपिल ठरविण्याची अधिकारिता नसल्याने अपिलार्थीचे हे अपिल फेटाळण्यात येत आहे.

सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

७. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ११-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्रीमती एम.डी.वाघ ( श्रीमती एम.एच.धोंडे) व्दारा/- डी.डी.वाघ,भाग्यनगर, गणेश मंदिराजवळ, श्रीनिवास बंगल्यासमोर, पारनेकरकर महाराज मंदिरामागे,बीड.

२. जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हापरिषद बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९७**

**निर्णय दिनांक ११-०९-२००७**

मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, : अपिलार्थी

मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर,

बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा,

चैतन्यनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जिल्हा परिषद, नांदेड (सध्या सचिव सना उर्दू

प्राथमिक शाळा, चैतन्यनगर, नांदेड)

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ यांच्या वतीने म. वसीम म. एकबाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, चैतन्यनगर, कौसर तसनिम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सना उर्दू प्राथमिक शाळा श्री. महमद एहतेशामुद्दीन (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेसंदर्भात मार्च १९९८ ते ३१ जानेवारी २००६ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ सह शिक्षकांची कायमस्वरुपी नियुक्ती केल्याबद्दल त्यांच्या भरतीसाठी संस्थेच्या मान्यता ठरावाची सत्यप्रत, तसेच शिक्षणाधिकारी यांचेकडून मंजूर झालेले शिक्षकांची मंजुरी संचिकाची सत्यप्रत, शिक्षक भरतीसाठी नियमानुसार वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची वृत्तपत्रांची सत्यप्रत, संस्थेच्या शालेय शिक्षण समितीच्या ठरावाची सत्यप्रत.”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिका-याकडून माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर, प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १३-०४-२००६ रोजी अपिलार्थीस या संदर्भात, संबंधीत शाळेच्या संस्थेचे सचिव या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांच्याकडे अपील करावे असे या पत्राव्दारे सूचित केले व त्याच बरोबर या पत्राची प्रत संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाला देवून त्यांनाही अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील माहिती देण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे अर्ज व अपील करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. यामध्ये मुख्याध्यापक यांनी माहिती देण्यास जाणुन-बुजून विलंब व टाळाटाळ केली असे कारण दर्शवून आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिका-यास पोस्टाने अर्ज पाठविला असा युक्तिवाद केला तर जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही असा युक्तिवाद केला. अपिलार्थीने पुढे असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिका-याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी ते अपील संस्थेच्या सचिवाकडे पाठविले. आजच्या सुनावणीस

संस्थेचे सचिव हजर आहेत. त्यांना शिक्षणाधिका-याचे पत्र न मिळाल्याचे ते सांगत आहेत. तथापि आयोगाचे पत्रावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आज त्यांनी आणली आहे व आज रोजी ती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची त्यांनी आयोगासमोर तयारी दर्शविली आहे.

अपिलार्थी यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने प्रथम अपील चुकिच्या प्राधिकरणाकडे केले. त्यांनी ते योग्य त्या प्राधिकरणाकडे पुढे पाठविले तथापि ते अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाले नाही. त्याचबरोबर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सदर अपील संस्थेच्या सचिवाकडे पाठविल्यानंतर त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली होती. तीही प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. थोडक्यात अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची कोणचीही पत्रे एकमेकास प्राप्त झाली नाहीत असे या प्रकरणी दिसून येत आहे. एकमेकांना एकमेकांची पत्रे न पोहोचल्याने जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती देण्यास जाणुन-बुजून विलंब लावला किंवा टाळाटाळ केली असे सिध्द करता येणार नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती आज रोजी तयार असून ती माहिती अपिलार्थीस विनमूल्य देण्यास ते तयार आहेत हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केली माहिती एक दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगवशात या प्रकरणी असे आढळून आले आहे की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसाच्या आत हे अपील संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे पाठवावयास हवे होते तथापि त्यांनी त्यांच्याकडे चुकीने प्राप्त झालेले अपील संबंधीताकडे पाठविण्यास ८ दिवसाचा विलंब लावला

आहे. त्यांचे प्रतिनिधीकडे या विलंबाचे सर्मथन -- संबंधीत लिपीक रजेवर असल्यामुळे -- या खेरीज करुन कोणतेही नाही. या सर्व प्रकारावरुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे माहिती अधिकार अधिनियमातील अपील संदर्भाकडे किती गांभीर्याने पाहतात याची कल्पना येते. त्यांनी या प्रकरणी दाखविलेल्या या बेपवाईची नोंद शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांनी यथायोग्य रित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एक दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी दाखविलेल्या या बेपर्वाईची नोंद शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांनी यथायोग्य रित्या घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, चैतन्यनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सना उर्दू प्राथमिक शाळा, चैतन्यनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९९
निर्णय दिनांक- ११-०९-२००७

१ श्री.दत्तात्रय भीमराव देशमुख, : अपिलार्थी
समता कॉलनी, माजलगाव
प्राध्यापक रामपूरकर यांच्या शेजारी,
तालूका-माजलगांव, जिल्हा-बीड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी नगरपरिषद, माजलगाव जिल्हा-बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ११-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दत्तात्रय भिमराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, माजलगाव (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, तथा उपआयुक्त,श्री.सोमनाथ सा.गुंजाळ (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माजलगाव नगरपरिषद हद्दीतील मिळकत सर्वेनंबर ३७५/०३, घरनंबर २४/६२ च्या पीटीआर च्या उता-यावरील नावे बदललेल्या बाबत मार्च १९८३ ते २४-०८-२००६ पर्यंतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१. पी.टी.आर.उता-यातील माझे नाव कां कमी केले व त्रिंबक बाळाजी देशपांडे अध्यक्ष सि.वि.मंडळ माजलगांव यांचे नाव कसे लावले. त्या संपूर्ण संचिकेची प्रत म्हणजेच त्याचे नाव कोणत्या कागदपत्रा आधारे लावले त्या सर्व कागदपत्राची व आपल्या आदेशाची प्रत द्यावी.

२. पी.टी.आर.उता-यातील मालकाचे नाव कमी करुन दुस-या व्यक्तीचे नाव लावण्याचे जे नियम आहेत. त्या नियमाच्या तरतुदीची शासन आदेशाची प्रत द्यावी.”

अपिलार्थीने ही माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या प्रथम अपिला नंतर जनमाहिती अधिकारी यांनी लागलीच अपिलार्थी यांचे दिनांक- २४-०८-२००६ रोजीच्या अर्जास उद्देशून त्यांना त्यांच्याकडील दिनांक-०५-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्या विषयी लिहीले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या सूचनेनूसार अपिलार्थीने दिनांक- ०८-१०-२००६ रोजी सदर रक्कम जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात जमा केली. तदनंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक-१३-१०-२००६ रोजीचे पत्रान्वये काही माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीस त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १६-१०-२००६, ३१-१०-२००६, २३-११-२००६, व ३०-११-२००६ या दिवशी घेवून दिनांक- २४-०१-२००७ रोजी आपला अंतिम आदेश पारीत केला. यामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन शासकीय माहिती अधिकारी यांना माहितीशी संबंधित संचिका स्वतः शोधून काढण्याचे आदेश दिले व ज्या कर्मचा-यांनी ही माहिती हाताळली आहे त्यांचेकडून त्या बाबतचा खुलासा घेवून ही संचिका का सापडत नाही, याचा निष्कर्ष त्यांनी काढावा, अशा अर्थाच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून ही माहिती त्यांना देण्यापोटी लागणारे शुल्क २० रुपये/- इतके त्यांना परत करण्याच्या सूचना दिल्या.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतूद २० (२) प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची प्रार्श्वभूमी समाजवून घेतली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीचा विषय हा पीटीआर उता-यावरील नाव बदलण्या बाबतचा असून संबंधित प्लॉट हा अपिलार्थीसह सहा जणानी एकत्र खरेदी केला व तोच प्लॉट अर्जदार वगळून इतर पाच जणानी श्री. सिध्देश्वर विद्यालय भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, माजलगाव यांना विक्री केल्याचे दिसून येते. विक्री करतांना संपूर्ण क्षेत्राची विक्री केली व त्याप्रमाणे सर्वांची नावे मालकी रकान्यातून कमी करुन संस्थेच्या अध्यक्षाचे नाव मालक म्हणून पीटीआर वर लावले गेले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने त्या प्लॉटची विक्री केली नव्हती.

अपिलार्थीने त्यांच्या अपीलअर्जा सोबत लेखी स्वरुपात त्यांचे म्हणणे व युक्तिवाद सादर केला आहे. त्यामध्ये त्यांना मूळअर्जा व्दारे मागितलेली माहिती हवी आहे व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती त्यानी आयोगास केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध असलेली सर्व माहिती पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळमाहितीच्या दिनांक- २४-०८-२००६ रोजीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद दिनांक- ०५-१०-२००६ रोजीच्या पत्राने दिला. तदनंतर दिनांक-१३-१०-२००६ रोजी अपिलार्थी यांच्याकडून विहित शुल्क प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस एका पानाची माहिती दिली. त्यांनी अपिलार्थीस

दिनांक- ०८-१०-२००६ रोजी २० रुपये त्यांच्या कार्यालयात भरण्याचे जे पत्र दिले आहे. त्यामध्ये एकूण माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दराचा त्यामध्ये उल्लेख केलेला नाही. जनमाहिती अधिका-याने दिलेल्या दिनांक- १३-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिल्या गेलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीचया क्रमांक-१ च्या मुद्यांची, संचिका जूनी असल्यामूळे विभागात शोधूनही सापडत नाही. तर मुद्या क्रमांक-२ च्या संदर्भात अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी पर्णतः विसंगत माहिती पुरविण्यात आलेली दिसते. जनमाहिती अधिका-याने अपिलार्थीस परत एकदा त्यांच्याकडे दिनाक- २९-११-२००६ रोजी याच मुद्यावरील माहिती वेगळया स्वरुपात दिल्याचे दिसून येते. यामध्ये अपिलार्थीच्या मूळअर्जातील मुद्या क्रमांक-२ च्या संदर्भात सुसगंत माहिती दिल्याचे दिसून येते.

या प्रकरणी वरील घटनाक्रम पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याचे व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जरी उपलब्ध असलेली माहिती दिली तरी ती विहित कालमर्यादेपेक्षा विलंबाने दिल्याचे सिध्द होत आहे. त्यामूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतूदीस ते पात्र ठरतात. त्यामूळे असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देणारे जबाबदार असलेले इतर सहाय्यक कर्मचारी यांच्यावर जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यास पात्र आहेत, त्या सर्वांवर सचिव (नगरविकास) यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे व खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

८. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

९. जनमाहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देणारे जबाबदार असलेले इतर सहाय्यक कर्मचारी यांच्यावर जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यास पात्र आहेत. त्या सर्वांवर सचिव (नगरविकास) यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत सादर करावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ११-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.दत्तात्रय भिमराव देशमूख, रा.समता कॉलनी, माजलगांव ता.माजलगाव जि.बीड

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,माजलगाव,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५५९**

**निर्णय दिनांक** ११-०९-२००७

श्री. देशमुख महमद हारुण अमिनमिया, : अपिलार्थी
न्यू देशमुख मेडिकल स्टोअर्स, सराफा मार्केट,
सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा
परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा
परिषद, औरंगाबाद (सध्या अतिरिक्त मुख्य
कार्यकारी अधिकारी)

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. देशमुख महमद हारुण अमिनमिया (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, श्री. जिवाजी बाबुराव बागूल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. विवेक गुजर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीस, अपिलार्थी यांनी त्यांना या प्रकरणी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक २७-१०-२००६ रोजीचे अपील मागे घेण्याची त्यांची विनंती आयोगाने मान्य करावी, अशा अर्थाचे विनंतीवजा शपथपत्र आयोगास सादर केले आहे.

अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०९-२००६ रोजी मिळाली असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मागे घेण्यासाठी आयोगास केलेली विनंती आयोग मान्य करत आहे.

सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख महमद हारुण अमिनमिया, न्यू देशमुख मेडिकल स्टोअर्स, सराफा मार्केट, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०**

**दिनांक १२-०९-**

## २००७

श्री. नागराज चांदबा गायकवाड, : अपिलार्थी
न्यू पहाडसिंगपूरा, लेणी रोड, घर नं.
१/६/९९, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, :
आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय, पैठण
तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव बादशहा अंजुमन इशाते व्दारा
आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय पैठण
तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची चौथी सुनावणी आज दिनांक १२-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नागराज चांदबा गायकवाड औरंगाबाद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय, व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव बादशहा अंजुमन इशाते व्दारा आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय हे गैरहजर आहेत. सहाय्यक शिक्षण संचालक, औरंगाबाद श्री. एस. आर. चौहान हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांचे दिनांक २५-०८-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विद्यालयाबाबत शैक्षणिक वर्ष २००५-२००६ या कालावधीतील माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये :

" विद्यालय ज्या संस्थेमार्फत चालते त्या संस्थेचे नांव, अध्यक्ष व सचिव यांचे नांव, मान्यताप्राप्त वर्ष, विद्यालयाचे शिक्षणाचे माध्यम, प्रवेशक्षमता, विद्यालय अनुदानीत आहे किंवा कसे, एन. सी. टी. ई. च्या नियमानुसार किती विद्यार्थ्यामागे एका शिक्षकाची नियुक्ती केली जाते, शिक्षकांची मान्य पदे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या संवर्गनिहाय आरक्षणाचा तक्ता, कार्यरत शिक्षकांची संख्या, शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या, अनुशेष बाकी असल्यास किती अनुशेष आहे, अनुशेष भरती प्रक्रियेची सद्यस्थिती, अनुशेष किती वर्षापासून शिल्लक आहे, शिक्षक पदासाठीची अर्हता / शैक्षणिक पात्रता काय आहे, शिक्षकांची यादी व प्रथम नेमणुकीचा दिनांक, पत्ता व जात संवर्ग, अनुभव, शिक्षकांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, सध्याच्या प्राचार्याचे नांव, प्रथम नेमणुकीचा दिनांक, पत्ता व जात संवर्ग त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, शिक्षक कर्मचा-यांना शासन नियमानुसार नियमित वेतन दिले जाते काय, शिक्षकांचे वेतन कोणत्या बॅंकेमार्फत अदा करण्यात येते, कार्यरत शिक्षकांचे बॅंक खाते क्रमांक व शैक्षणिक वर्ष २००५-२००६ चे शिक्षकांचे वेतन रजिस्टर, विद्यालयाची संच मान्यता विभागीय उपसंचालकाकडून झाली आहे काय, संच मान्यता झाली असल्यास विद्यालय स्थापन झाल्यापासून ते शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पर्यतच्या संच मान्यता प्रती, संच मान्यता करुन घेतली नसल्यास त्यांची कारणे, भारत सरकारच्या शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या बॅंकेमार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते, विद्यालयाचा बॅंकेतील शिष्यवृत्तीचा खाते क्रमांक, विद्यालय स्थापन वर्षापासून ते शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पर्यतच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाच्या रजिस्टरची सत्यप्रत, शिष्यवृत्ती बॅंकेमार्फत देण्यात

येत नसल्यास त्याची कारणे, संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला आहे किंवा कसे, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना घटनात्मक आरक्षण विद्यार्थी प्रवेश पाळणे आवश्यक आहे काय, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाल्यामुळे आपणास प्रवेशासंबंधी कोणते नियम पाळावे लागतात, तसेच काही विशेषाधिकार आहेत काय, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाल्यामुळे आपणास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या भरतीसाठी काय नियम व कसे आरक्षण लागू आहे, सध्या विद्यालय ज्या इमारतीत आहे ती इमारत संस्थेच्या मालकीची आहे काय, शाळेच्या इमारतीमध्ये एकूण किती खोल्या आहेत, त्या स्वतंत्र खोल्यांचे क्षेत्रफळ किती, विद्यालयास क्रिडांगणाची सोय उपलब्ध असल्यास त्यांचे क्षेत्रफळ" या माहितीचा समावेश होता. अपिलार्थीच्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या वरील माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या त्यांच्या अपील अर्जान्वये प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये एक उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती नाकारली असून ही माहिती नाकारण्याचे कारण म्हणजे सदर संस्था विना अनुदानीत असून ती राज्य शासकीय प्राधिकरण नाही व त्यामुळे माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या संस्थेस लागू होत नाहीत, असे कारण म्हणून दर्शविले आहे. याच बरोबर या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीव्दारे कोणतेही जनहित साध्य होणार नसल्याचा उल्लेख केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीन्वये दिनांक १५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये एकूण २७ मुद्दयावरील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या २७ मुद्दयापैकी २ मुद्दयाव्दारे (मुद्दा क्रमांक २३ व २७) त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कारणे विचारली आहेत. या कारणांची माहिती अर्थातच अपिलार्थीस देता येणार नाही हे त्यांना सुनावणीच्या वेळेस स्पष्ट करण्यात आले आहे. त्याच बरोबर त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १९ मध्ये कार्यरत शिक्षकांच्या बॅकेचे २००५-२००६ चे बॅक विवरण मागितले आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (त्र) नुसार संबंधितांच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप करील अशा वैयक्तीक तपशीलासंबंधातील असल्यामुळे ही माहिती देखील अपिलार्थीस देता येणार नाही असे त्यांना सुरुवातीसच स्पष्ट केले आहे. अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणातील ही चौथी सुनावणी असून त्यांनी त्यांचे म्हणणे दिनांक २३-०८-२००७ रोजी लेखी स्वरुपात आयोगास शपथपत्राव्दारे सादर केले आहे. या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी मागितलेली माहिती कशा प्रकारे व्यापक जनहित साध्य करणार आहे त्याची माहिती दिलेली आहे. यामध्ये त्यांनी राज्यमध्ये डि एड व बी. एड विद्यालयाचे अमाप पीक आले आहे व त्यांचा उद्देश विद्यार्थ्यांनी शिक्षक बनावे म्हणून नव्हे तर लाखो रुपये डोनेशन मिळते म्हणून

नफा मिळविण्याच्या उद्देशाने शिक्षण संस्थाचालकामार्फत या विद्यालयाची निर्मिती केली जाते व पालकाकडून-विद्यार्थ्याकडून लाखो रुपये उकळले जातात. पुढे हे विद्यार्थी पास झाले किंवा नापास झाले याकडे हे व्यवस्थापन दुर्लक्ष करते. हा सामाजिक बांधीलकीशी द्रोह असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. त्याच बरोबर विद्यालयाला मान्यता मिळण्यास आवश्यक असलेली संस्थेची इमारत, सुसज्ज ग्रंथालय, मैदान, प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा इत्यादी अनेक बाबी संस्थेतर्फे फक्त कागदावर पूर्ण केल्या जातात परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असते. या सर्व बाबी जनतेसमोर येणे आवश्यक आहे. त्यांना वरील माहितीच्या आधारे उच्च न्यायालयामध्ये जनहितार्थ याचिका दाखल करावयाची असल्यामुळे त्यांना या माहितीची आवश्यकता असल्याचे त्यांनी पुढे आपल्या अपिलामध्ये स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आज सुनावणीस उपस्थित नाही. सुनावणीची ही चौथी वेळ असून या प्रकरणी सुनावणी पुढे वाढविणे आयोगास उचित वाटत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांची संस्था विना अनुदानीत असल्याने व त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण नाही म्हणून त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा अपिलार्थीस दिनांक ३०-११-२००६ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये दावा केला आहे.

खाजगी अध्यापक विद्यालयावर शासनाचे नियंत्रण आहे किंवा कसे व त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे यासंदर्भात आयोगातर्फे शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे मत मागविण्यात आले होते. या संदर्भात त्यांनी त्यांचेकडील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे मत मागविले. सदर शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने शिक्षण उप संचालकांना त्यांचे मत कळविले असून त्यामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ हा या खाजगी अध्यापक विद्यालयांना कशा प्रकारे लागू होतो याचे विवरण केले आहे. शिक्षण

विभागातील संबंधीत तज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे की, महाराष्ट्रातील अध्यापक विद्यालय चालविणा-या संस्था या पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार रजिस्टर झालेल्या सार्वजनिक संस्था असतात व या कायद्याखाली नोंदविलेल्या संस्थांना अध्यापक विद्यालय सुरु करण्याची परवानगी दिली जाते त्यामुळे या माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) या प्रकारामध्ये मोडतात. एन. सी. टी. ई. कडून या अध्यापक विद्यालयांना मान्यता देण्यात येते. एन. सी. टी. ई. चे निर्देश दिनांक १३-०१-२००६ अन्वये संबंधीत परिक्षा घेणा-या मंडळाची, ज्यांच्यावर राज्य शासनाचे नियंत्रण असते, त्याची सलग्नता मिळाल्याशिवाय संबंधीत संस्थांना विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडून माहितीची मागणी केली आहे ती संस्था अल्पसंख्याक संस्था आहे. या अल्पसंख्याक संस्थांना त्यांच्या व्यवस्थापनाखालील डि एड विद्यालयामध्ये त्यांच्या अध्यापक विद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे पूर्ण अधिकार संबंधीत व्यवस्थापनाचे आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे अधिकार जरी संस्थेचे असले तरी या विद्यालयांच्या प्रथम, व्दितीय वर्षाच्या परिक्षा राज्य शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय परिक्षा परिषदेमार्फत घेतल्या जातात. ज्या प्राधिकरणामार्फत या विद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेतल्या जातात ते शासकीय प्राधिकरण आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी स्पष्ट केल्यानुसार खाजगी अनुदानित अथवा विना अनुदानित तत्वावर चालविण्यात येणा-या अध्यापक विद्यालयांवर राज्य शासनाच्या शिक्षण विभागामार्फत पूर्ण नियंत्रण असते. संबंधीत संस्था-मधील कर्मचा-यांच्या नियुक्त्या नियमीत करणे, विद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करणे, संस्थेतील गैरप्रकार आढळल्यास त्याची चौकशी करुन एन. सी. टी. ई. ला अहवाल सादर करुन कारवाई करणे, इ. बाबी राज्य शासनामार्फत हाताळण्यात येतात.

या प्राधिकरणावर अशा प्रकारे नियंत्रण राज्य शासनाचे असते त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा सदर शिक्षणसंस्था विनाअनुदानित असल्याने त्यांच्यावर शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही हा दावा फोल ठरतो. त्याचबरोबर या संस्थेमध्ये केल्या जाणा-या शिक्षकांच्या नेमणुका, त्यांच्या पात्रता, त्यांचे वेतन यावर राज्याच्या शिक्षण खात्याचे प्रत्यक्षपणे नियंत्रण असते. अपिलार्थी यांनी ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर ते कशा प्रकारे व्यापक जनहित साध्य करणार आहे याचा त्यांनी शपथपत्रामध्ये उहापोह केला आहे तो मान्य करण्यास हरकत नाही.

प्रसंगावशात या प्रकरणी अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा जन माहिती अधिकारी यांच्याकडील प्रथम अर्जामध्ये उल्लेख केलला आहे. अपिलार्थीने अशाच प्रकारची माहिती इतर शैक्षणिक संस्थेकडे मागितल्यानंतर त्यापैकी एका शैक्षणिक संस्थेने (डॉ. झाकीर हुसेन अध्यापक विद्यालय, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद) अपिलार्थीच्या दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबत आक्षेप घेऊन त्याचे पुरावे मागितले आहेत. आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रामध्ये या प्रमाणपत्राच्या प्रतीचा समावेश नाही तथापि या प्रकरणी अपिलार्थी हे महानगरपालिका हद्दीतील रहिवासी असल्याने त्यांनी महानगरपालिका कार्यालयाचे प्रमाणपत्र मागवले होते त्यावर त्यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी अपिलार्थीस एका पत्रा-व्दारे अशी माहिती दिली आहे की, अपिलार्थीचे नाव दारिद्र्य रेषेखाली प्रस्तावित करण्या-करिता प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून अंतिमतः हे नाव यादीत समाविष्ट करण्याचे अधिकार शासनास आहेत. याबद्दल अपिलार्थीचे म्हणणे – ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत -- हे संशयास्पद ठरते म्हणून ही माहिती मिळण्यापोटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे आवश्यक ते शुल्क भरणे अनिवार्य राहील असे आयोगाचे मत आहे.

दोन्ही बाजुंतर्फे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा, त्यांची संस्था विना

अनुदानीत असल्यामुळे त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण नाही हा दावा चुकिचा आहे व केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केल्यानुसार, शासनाचे नियंत्रणाखालील संस्था म्हणून सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण आहे व त्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा या खाजगी अध्यापक विद्यालयांना लागू होतो असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती – जी माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम क्रमांक ८ मधील तरतुदीला छेद देते ती (मुद्दा क्रमांक १९) व अपिलार्थीने विचारलेल्या कारणांचे मुद्दे (मुद्दा क्रमांक २३ व २७) वगळून - अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, (मुद्दा क्रमांक १९, २३ व २७) वगळून अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नागराज चांदबा गायकवाड, न्यू पहाडसिंगपूरा, लेणी रोड, घर नं. १/६/९९, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय, पैठण तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव बादशहा अंजुमन इशाते व्दारा आर. वाय. पी. अध्यापक विद्यालय पैठण तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०४**

**दिनांक १२-०९-२००७**

श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
मु. पो. बोदवड, मेन रोड, जळगांव
जिल्हा जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, जळगांव, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री. मिलींद नागेश ठोंबरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री. राजाराम तुळशीराम पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००७ रोजी फॅक्सव्दारे आपले म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांना राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिनांक ०४-०४-२००६ रोजीचे व्दितीय अपील

चालवावयाचे नाही असे म्हटले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने दिनांक ३०-०५-२००६ रोजी राज्य माहिती आयोग मुंबई यांचे कार्यालयास याच विषयावरील अपील संदर्भात लिहिलेले एक पत्र आयोगासमोर उपलब्ध झाले आहे. त्यामध्ये अपिलार्थीने हे अपील खारीज करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस जर हे अपील चालवावयाचे नसेल व त्यांचा माहिती मागविण्यासंदर्भात मूळ उद्देश साध्य झाला असेल तर आयोग हे अपील पुढे चालवू इच्छित नाही.

अपिलार्थीने आयोगास केलेल्या विनंतीनुसार अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, मु. पो. बोदवड, मेन रोड, जळगांव जिल्हा जळगांव

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९२**

**दिनांक १२-०९-२००७**

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी

जिल्हा परभणी

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मधुकर हिराजी मूळे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पूर्णा, श्री. सुभाष रामकिशन चोले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी यांचे प्रतिनिधी (प्रभारी तंत्र अधिकारी तथा कृषि अधिकारी) श्री. प्रल्हाद शंकरराव जोशी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-याबाबत दिनांक ०१ एप्रिल २००३ ते १७ एप्रिल २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ आपल्या कार्यालयात एकूण दोन्ही मंडळाचे किती कर्मचारी आहेत ? त्यांचा पगार किती महिन्यापासून थकीत आहे.

२. एच. आर. ए. (घरभाडे भत्ता) टी. ए. / डी. ए. (दैनिक भत्ता), टी. ए. / सी. ए. (सायकलींग अलाऊंस) उचलणारे सर्व कर्मचारी यांची यादी नांव व त्यांना मिळालेली रक्कम.

३. सदरील कालावधीत कृषि अधिका-यांनी उचलेला टी. ए. / डी. ए. (प्रवास व दैनिक भत्ता) किती ? कधी व कशासाठी उचलला याची माहिती.

४. सर्व कर्मचारी पूर्णा शहरातच राहतात का ? राहत असल्यास त्यांचा पत्ता, राहत नसल्यास का नाही ? न राहण्यासाठी शासनाचा आदेश असेल तर शासनाच्या आदेशाची प्रत.”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २७-०४-२००६ च्या पत्राव्दारे काही माहिती कळविली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे दिलेली माहिती पाहता त्यांनी पूर्ण माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसन येत नाही. तथापि त्यांनी या संदर्भात दिनांक ३०-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्र देवून अपिलार्थीस अचूक माहिती विनाविलंब देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचे अपील ठरविण्याची ही कृती चुकिची असून त्यांनी या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून घेवून मग त्यावर आपला निर्णय देणे अभिप्रेत आहे तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली असल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००६ रोजी आर.पी.ए.डी. ने पाठविली. या संबंधात पोस्टाची पोच पावती त्यांनी आयोगा-समोर सादर केली आहे.

तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीन्वये व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकिची व दिशाभूल करणारी दिली असल्याचे म्हटले आहे. त्यांनी विचारलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस एकूण ३ टप्प्यामध्ये माहिती दिलेली आहे. प्रथम माहिती दिनांक २७-०४-२००६ रोजी, तदनंतर दिनांक ०९-०६-२००६ रोजी व शेवटच्या मुद्दया-वरील माहिती दिनांक ०१-१२-२००६ च्या पत्रान्वये दिनांक ०५-१२-२००६ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलानंतर दिली आहे. ही माहिती अपिलार्थीस पोहोचल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडील स्थळप्रतीवर सही केल्याचे त्यांनी आयोगास दाखविले.

या प्रकरणी अपिलार्थीस जरी पूर्ण माहिती वेगवेगळ्या टप्प्यात प्राप्त झाली असली तरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुळातच ही माहिती विहित मुदतीत द्यावयास हवी होती तथापि त्यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडील कर्मचा-यांचे घरचे पत्ते मागितले होते. अपिलार्थीने ही मागणी करण्यापुर्वीच त्यांनी दिनांक ३१ मार्च २००६ रोजी एक परिपत्रक जारी करुन त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व कर्मचा-यांचे पत्ते संबंधितांकडून त्यांच्या कार्यालयात मागविले होते. कर्मचा-यांचे पत्ते सोडून उर्वरीत माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहज उपलब्ध असावयास हवी होती तथापि या प्रकरणात तसे असल्याचे दिसून येत नाही. तेव्हा आयोगातर्फे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये सुधारणा करुन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या

अर्जावर सत्वर व सकारात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या प्रकरणी पुनरावृत्ती होणार नाही याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष द्यावे अशी त्यांना ताकीद देण्यात येवून अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य (कारण अपिलार्थीस एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतरच्या तारखेस दिली आहे) करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत :

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अर्जाची सत्वर दखल घेऊन त्यांना विहित मुदतीत सकारात्मक असा प्रतिसाद द्यावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२ सप्टेंबर २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९३
निर्णय दिनांक- १२-०९-२००७

१ श्री.विजयकूमार नारायणराव गोरे, (मुख्यसंपादक) : अपिलार्थी
सा.देवमन समाचार, शिवाजीनगर दाद-या जवळ,
नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार(पुरवठा)
तहसील कार्यालय,हदगाव,
तालूका-हदगाव, जिल्हा- नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, हदगाव, जिल्हा-नांदेड.

# विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १२-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजयकूमार नारायणराव गोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) हदगाव, श्री.राजाराम किसन गवई (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये येणा-या केरोसीन वाटपा बाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “.मुख्यालयावरील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांनी किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना विक्री केलेल्या वितरण रजिस्टराच्या सत्यप्रती, किरकोळ विक्रेत्यांनी कार्डधारकांना विक्री केलेल्या रॉकेलच्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रति मिळणे बाबत.”

अपिलार्थीने सदर माहितीचा कालावधी ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ असा दर्शविला असून ही माहिती त्यांनी टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीच माहिती न दिल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २३-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपीलअर्जावर काहीही कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या अखंड प्रतिसादामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १३-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलावर अपिलार्थीची स्वाक्षरी नाही तथापि शपथपत्रावर अपिलार्थी यांची स्वाक्षरी आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून २ महिने १५ दिवस इतका कालावधी उलटून गेल्या नंतरही त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब व टाळाटाळ केल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती सुध्दा त्यांनी आयोगास केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी व जनअपिलीय अधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपील त्यांना मूळात प्राप्त झाले नसल्यामूळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगास मूळ अर्जाची व प्रथम अपीलाच्या ज्या झेरॉक्सप्रति दिल्या आहेत. त्यावरुन हे दोन्हीही अर्ज त्यांनी अनुक्रमे नायब तहसीलदार (पुरवठा) व तहसीलदार

हदगाव यांच्याकडे अंडर पोस्टींग सर्टीफिकेटने (माहितीचा अर्ज व अपील अर्ज ) पाठविल्याचे ( पोस्टाच्या शिक्यानूसार ) दिसून येते. यावरुन हा अर्ज व अपीलअर्ज अनुक्रमे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात पोंहचला असणार, हे निश्चीत आहे.

अपिलार्थीने संबंधित अधिका-यांकडे अर्ज केल्याचे पुरावे सोबत जोडली आहेत. परंतू नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी अर्जदारास माहिती पुरविली नाही व तहसीलदार, हदगाव यांनी अपीलाची सुनावणी घेतली नाही, ही वस्तुस्थिती उरतेच. तेंव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी नायब तहसीलदार व तहसीलदार हदगाव यांच्या कार्यालयामध्ये उपरोक्त प्रकरणातील दोन अर्ज खरोखरच दाखल झाले नाहीत. याची शहानिशा करावी. जर अर्ज दाखल झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधित अधिका-यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करावी. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सांक्षाकित करुन विनामूल्य नोंदणी पोंच देय डाकेने पाठवावी. व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे. हे जनमाहिती अधिकारी यांना आज आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आले.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

६. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सांक्षाकित करुन विनामूल्य नोंदणी पोंच डाकेने अपिलार्थीस पाठवावी.

८. जिल्हाधिकारी नांदेड यांनी तहसीलदार हदगाव यांच्या कार्यालयामध्ये उपरोक्त प्रकरणातील दोन अर्ज खरोखरच दाखल झाले नाहीत याची शहानिशा करावी. जर अर्ज दाखल झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधित अधिका-यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करावी.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- १२-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.विजयकूमार नारायणराव गोरे, मुख्य संपादक साप्ताहिक देवमन समाचार, शिवाजीनगर दाद-या जवळ, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार ( पुरवठा )तहसील कार्यालय, हदगाव जिल्हा- नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव, जिल्हा-नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५०३
निर्णय दिनांक- १२-०९-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भीमराव कोंडीबा भोसले,<br>ब्लॉक नं.११, फुले कॉलनी, खोकडपूरा,<br>(शिवाजी हायस्कुल समोर), औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपप्राचार्य, श्री.बंकट स्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री.बंकट स्वामी महाविद्यालय,<br>जालनारोड,बीड. | | |

### विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १२-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भीमराव कोंडीबा भोसले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड श्री.एकनाथ राजाराम आबूज (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड

श्री.विवेक रामराव मिरगणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माजी प्राचार्य डॉ.जी.बी. सांडगे यांनी घेतलेल्या पगारासंबंधी व त्यांच्या वेतन निश्चीती व सेवा पुस्तीके विषयी दिनांक- ०१-०१-१९९६ ते १७-०५-२००३ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

“ १ माजी प्राचार्य जी.बी.सोंडगे, यांनी ०१/०१/१९९६ ते १७/०५/२००३ पर्यंत घेतलेल्या पगाराच्या सविस्तर ( महिनावाईज ) पगार पत्रकाच्या प्रती देण्यात याव्यात.

२. माजी प्राचार्य जी.बी. सोंडगे यांनी पाचव्या वेतन आयोगानुसार करुन घेतलेल्या वेतन निश्चीतीच्या प्रस्तावाची प्रत देण्यात यावी.

३. माजी प्राचार्य जी.बी.सोंडगे यांच्या सेवा पुस्तीकेची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देण्यापृष्ठयर्थ रुपये ५६६/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे दिनांक- ०५-०७-२००६ रोजी रुपये ५६६/- इतकी रक्कम महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये जमा केली. अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे त्यांच्याकडील दिनांक-०८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यात आली. अपिलार्थीने एकूण ३ मुद्यावर माहिती विचारली असता, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून ४ मुद्यावर काही माहिती दिल्याचे या पत्राचे अवलोकन करता दिसून येते. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्या क्रमांक ३ प्रमाणे श्री.जी.बी.सोंडगे यांच्या

सेवापुस्तिकेची प्रत त्यांच्याकडे पाठविल्याचे दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना परिपूर्ण माहिती न देता अनावश्यक माहिती देवून मुख्य माहिती देण्याचे टाळने त्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे व २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याचे जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे व त्याचबरोबर माहिती अधिकारी यांनी माहितीची फीस म्हणून भरुन घेतलेले जास्तीचे रु.५०५/- इतके परत करण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती.

सदर अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८/०८/२००६ रोजी घेवून अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जलअपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यांनी प्रथम सुनावणी घेतांना चुकीच्या कायद्याचा म्हणजे महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ मधील तरतूदीनूसार प्रथम अपीलाची सुनावणी घेतल्याचे दिसून येते. तथापि त्यांनी सुनावणी घेतेवेळेस ( दिनांक २८-०८-२००६) रोजी हा कायदा निरसीत झाला होता. त्यामूळे त्यांनी घेतलेली सुनावणी अवैध ठरते. जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी मुख्य माहिती देण्याबाबत जाणीवपूर्वक टाळले असल्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली

आहे व त्याचबरोबर माहिती अधिका-याने माहितीची फीस म्हणून भरुन घेतलेले जास्तीचे रुपये ५०५/- सव्याज परत मिळण्या विषयी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीने असा मुद्दा मांडला की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक १ वर त्यांनी मागितल्याप्रमाणे महिनानिहाय माहिती प्राप्त झाली नाही व श्री.जी.बी.सोंडगे यांच्या सेवापुस्तिकेची झेरॉक्सप्रत त्यांना मिळाली नाही. त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक-२ च्या संदर्भातील माहिती मिळाल्याचे त्यांनी कबूल केले. त्याचबरोबर त्यांना अनावश्यक असणारी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिल्यामूळे कागदाच्या प्रतींची संख्या वाढून त्यांना माहिती देण्यापोटी जादाचे शुल्क भरावे लागले, या जादा शुल्काची सव्याज परतफेड मिळावी, असाही त्यांनी पुढे युक्तीवाद केला. त्यांनी आयोगाकडे लेखी सादर केलेल्या अपीलअर्जा प्रमाणे संबंधीत जनमाहिती अधिकारी यांना शास्ती व शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची त्यांनी आज आयोगास परत या युक्तिवादामध्ये विनंती केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी मागितलेली माहिती महिनानिहाय दिलेली आहे. अपिलार्थीस सेवापुस्तकाच्या झेरॉक्सप्रती माहिती अधिकार अधिनियमातील १२ (फ) च्या तरतूदीनूसार देता येत नाही व त्याचबरोबर श्री.जी.बी.सोंडगे तत्कालीन प्राचार्य यांनी महाविद्यालय सोडतांना त्यांच्या कार्यभारामधील संबंधित अभिलेखे व नस्त्या कोणासही हस्तांतरण न केल्यामूळे व सध्या संस्थेकडे श्री.जी.बी.सोंडगे यांची सेवापुस्तिका उपलब्ध नाही. त्यामूळे त्यांना श्री.जी.बी.सोंडगे यांच्या सेवापुस्तिकाची झेरॉक्सप्रत अपिलार्थीस पुरविता आल्या नाहीत.

अपिलार्थी यांच्याकडून रुपये ५६६/- इतक्या रक्कमेचा भरणा करुन घेवून अपिलार्थीस फक्त १३ पृष्ठांची माहिती दिली आहे. याचे कारण विचारता जनमाहिती

अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांच्याकडून संस्थेला माहिती अधिकाराच्या इतर अर्जासंबंधात जे काही येणे बाकी आहे, त्याचा या माहिती शुल्कामध्ये समावेश केलेला आहे.

दोन्हीही बाजूंनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जरी अपिलार्थीने ३ मुद्यांवर माहिती मागविली होती तरी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक- ०८-०७-०६ रोजी दिल्या गेलेल्या माहितीमध्ये एका जादा मुद्यावर माहिती दिली गेली आहे. या जादा मुद्याचा या माहितीमध्ये समावेश केला आहे. त्यामूळे अपिलार्थी यांचा त्यांना अनावश्यक माहिती पुरविली हा दावा सिध्द होतो. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामध्ये एकूण माहितीच्या पृष्ठांची संख्या व दर अपिलार्थीस कळविला नाही. त्यांनी अपिलार्थीस एकूण १३ पृष्ठांची माहिती पुरविली असल्यामूळे त्या माहितीचे शुल्क फक्त प्रतिपृष्ठ २/-रुपये दराने २६ रुपये अधिक पोस्टेजखर्च इतके होते. या प्रकरणी अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांना स्पीडपोस्टाने पाठविल्यामूळे त्याचा खर्च वजा जाता अपिलार्थीकडून जनमाहिती अधिकारी यांनी ५०५/-रुपये जास्त घेतल्याचे सिध्द होते. अपिलार्थी यांच्याकडून दुस-या कोणत्याही प्रकरणी येणे असलेली रक्कम अशा त-हेने वसूल करण्याची जनमाहिती अधिकारी यांची कृती निश्चीतपणे  अयोग्य आहे, असे म्हणणे वावगे होणार नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सेवापुस्तिका संदर्भातील माहिती न देण्याकरिता संदर्भीत केलेली कलम १२ (फ) ची तरतूद मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नसून ‘‘माहितीचा अधिकार २००५’’ या संदर्भात एका खाजगी प्रकाशनाने केलेल्या पुस्तकातील असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. वास्तविकतः जनअपिलीय अधिकारी यांनी अपील ठरवितांना अधिकृत अधिनियमाच्या प्रतिवरुन अपील ठरवावयास हवे. तथापि त्यांनी या प्रकरणी तसे केल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, श्री.जी.बी.सोंडगे हे श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथे सन १९८८ ते २००२ पर्यंत प्राचार्य  या पदावर कार्यरत होते. तथापि तदनंतर त्यांना संस्थेने सन २००४ मध्ये कार्यमूक्त केले आहे. जनमाहिती  अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानूसार त्यांनी कार्यभार सोडतांना कोणतेही अभिलेखे महाविद्यालयाकडे हस्तांतरीत न केल्यामूळे त्यांची सेवापुस्तिकाची प्रत संस्थेकडे उपलब्ध नाही. त्यामूळे ते माहिती देवू शकत नाही. हा त्यांचा दावा जरी ग्राहय धरला तरी मूलतः आपल्या संस्थेतील कर्मचा-यांच्या सेवा पुस्तीका अद्यावत ठेवण्याचे काम संबंधीत संस्थेचे आहे हा मुद्दा उरतोच. केवळ संबंधित प्राचार्यांनी कार्यभार हस्तांतरीत केला नाही म्हणून सेवापुस्तकाची प्रत देता येत नाही हा संस्थेचा दावा आयोग मान्य करीत नाही. कर्मचा-यांची सेवापुस्तके  ताब्यात ठेवण्यावरिल संस्थेने निश्चितपणे एखादा लिपिक नेमला असणार व सेवापुस्तके सुरक्षित ठेवण्याचे त्याचे कर्तव्य असल्याने असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी श्री.जी.बी.सोंडगे यांची सेवापुस्तिका त्यांच्या जुन्या वैयक्तिक अभिलेखावरुन नव्याने तयार करावी व  माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदीस अधीन राहून अपिलार्थीस त्या सेवापुस्तिकेची प्रत सांक्षाकीत करुन ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व त्याचबरोबर अपिलार्थीकडून घेतलेले जादा शुल्क रुपये ५०५/- अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्या नंतर २४ तासाच्या आत परत करावेत. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती देण्यामध्ये हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून न आल्यामूळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१०. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

११. जनमाहिती अधिकारी यांनी श्री.जी.बी.सोंडगे यांची सेवापुस्तिका नव्याने तयार करावी व माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदीस अधीन राहून अपिलार्थीस, त्या सेवापुस्तिकेची प्रत सांक्षाकीत करुन ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

१२. अपिलार्थीकडून घेतलेले जादा शुल्क रुपये ५०५/- अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्या नंतर २४ तासाच्या आत परत करावेत.

१३. या रक्कमेच्या व्याजा संदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- १२-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.भीमराव कोंडीबा भोसले, ब्लॉक नंबर ११, फुले कॉलनी, खोकडपूरा, औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, जिल्हा-बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री.बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३१०**

**दिनांक १३-०९-**

**२००७**

श्री. अनंत दगडू गारदे, : अपिलार्थी

व्दारा - ॲड अरुण कानडे,

फ्लॅट नं. ८, पुष्कर बिल्डींग, आदिनाथ नगर,

जवाहरनगर पोलीस स्टेशन समोर, गारखेडा,

औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,

औरंगाबाद

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनंत दगडू गारदे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. विजय सखाराम लाटकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व उप विभागातील २००२-२००३ ते २००४-२००५ या २ वर्षाच्या कालावधीमधील डांबराच्या वाहतुकीची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> “ वरील कालावधीमध्ये आपल्या आखात्यारीतील सर्व उपविभागात रस्त्याचे खड्डे भरणेकामी खरेदी केलेल्या डांबराचे गेटपास, वजन काट्याच्या पावत्या (डांबर खाली करतानाच्या) वाहतुकीचे कार्यारंभ आदेशाच्या प्रती, त्याच्या देयकाच्या प्रती, सदर डांबर ज्या कामावर वापरले आहे त्या कामाच्या ब-१ निविदेतील शेड्यूल अ व ब च्या प्रती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, त्यांनी सादर केलेला अर्ज उप विभागीय अभियंता कार्यालय गंगापूर, वैजापूर, खुलताबाद, कन्नड यांच्या कार्यालयाशी संबंधीत असून अपिलार्थीचा अर्ज त्यांनी दिनांक १८-०१-२००६ रोजी संबंधितांच्या कार्यालयात पाठविला असून अपिलार्थीने त्यांच्या उपविभागीय कार्यालयाकडून परस्पर माहिती

घ्यावी.  सदर पत्र अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

अपिलार्थीस संबंधीत उप विभागीय अभियंता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतीही माहिती न मिळाल्या-मुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०४-२००६ रोजी माहिती संदर्भात प्रथम अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.  या अपिलाच्या सुनावणी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या सुनावणीप्रित्यर्थ दिनांक ०९-०६-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहण्याविषयी सूचित केले व त्याच बरोबर जर अपिलार्थी स्वतः उपस्थित राहिले नाहीत तर एकतर्फी निर्णय घेण्यात येईल असा इशारा त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये दिला आहे.  सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.  अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०१-०६-२००६ चे पत्र त्यांनी दिनांक ०८-०६-२००६ रोजी पोस्टात टाकले आहे.  त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र ज्या लिफाफ्यामध्ये पाठविले तो लिफाफा आयोगास दाखविला.  या लिफाफ्यावर पोस्टाचा दिनांक ०८-०६-२००६ चा शिक्का आहे यावरुन अपिलार्थीचा दावा सिध्द होत आहे.  अपिलार्थीस प्रत्यक्षात हे पत्र दिनांक १२-०६-२००६ रोजी प्राप्त झाले त्यामुळे अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००६ रोजीच्या कथित सुनावणीस हजर राहता आले नाही.  जन अपिलीय अधिकारी यांची सुनावणी घेण्याची  अशा प्रकारची पध्दत पूर्णतः गैर आहे असे आयोगाचे मत आहे. सुनावणीची सूचना सुनावणीच्या प्रस्तावित तारखेच्या किमान १५ दिवस आधी पाठवावी असे

त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांच्या या कृतीने त्यांनी अपिलार्थीचे म्हणणे ऐकण्यास अप्रत्यक्षपणे नकार देवून एक प्रकारे माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ केल्याचे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीन्वये दिनांक ३०-०६-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी त्यांनी त्यांचे म्हणणे शपथपत्राव्दारे लेखी सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी देणे अपेक्षित असतांना त्यांनी त्यांच्या हाताखालील उप अभियंत्यांना माहिती देण्याचे फर्मान काढले. संबंधीत उप अभियंत्यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य होते, तथापि त्यांनी ते जाणुन-बुजून टाळून आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे नमूद केले आहे. त्याच बरोबर अपिलार्थीस सुनावणीस बोलविण्याचे त्यांचे दिनांक ०१-०६-२००६ चे पत्र त्यांनी दिनांक ०८-०६-२००६ रोजी पोस्टात टाकले व हे पत्र त्यांना दिनांक १२-०६-२००६ रोजी प्राप्त झाले. सुनावणीची तारीख ०९-०६-२००६ असतांना त्यांनी अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्याची सूचना देणारे पत्र दिनांक ०८-०६-२००६ रोजी पोस्टात टाकले. यावरुन सदर विभागाचा अपिलार्थी-ची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचा व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम यांनीही जाणुन-बुजून माहिती देण्याचे टाळण्याचा प्रयत्न केला आहे असा त्यांनी दावा केला आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयात या कालावधी दरम्यान डांबराचा फार मोठा भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रात आल्या आहेत. ही माहिती देण्यास जन माहिती अधिकारी टाळाटाळ करत आहे. म्हणून व्यापक जनहित साधण्याच्या दृष्टीने त्यांनी

मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना त्वरीत मिळावी व संबंधीत माहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० मधील तरतुदीनुसार जास्तीत जास्त दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक २३-०८-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागितलेली सविस्तर मुद्देनिहाय माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ती विनाशुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून हस्तगत करावी. अपिलार्थीस पाठविलेले हे दिनांक २३-०८-२००७ रोजीचे पत्र आयोगाच्या मूळ सुनावणीच्या एक दिवस आधी त्यांना पाठविले आहे. (या प्रकरणी आयोगाने दिनांक २४-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि ती दिनांक १३-०९-२००७ पर्यत पुढे ढकलण्यात आली)

अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर शपथपत्राव्दारे सादर केले याचा उल्लेख वरील परिच्छेदात केलेला आहे. अपिलार्थीने मुलतः जी माहिती मागितली होती ती पाहता ही सर्व माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखा संहितेप्रमाणे व नियमावलीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असावयास हवी होती तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधीत उप अभियंत्याकडून का गोळा करावयास सांगितली हे कळण्यास मार्ग नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाचा फारशा गांभीर्याने विचार केला नसल्याचे स्पष्ट होते. अपिलार्थीने मुळतः दिनांक १३-०१-२००६ रोजी माहिती मागितली असतांना जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांना दिनांक १२-०२-२००६ पर्यत अथवा त्यापुर्वी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये देणे भाग होते. तथापि अधिनियमा-तील विहित तरतुदीमध्ये अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

**जन माहिती अधिकारी यांनी ज्या उप अभियंताकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याचे सांगितले त्यांचे कार्यालय व जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे भाग आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे मुळात ही माहिती मागितली होती त्यांनीच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये ही माहिती उपलब्ध करुन देणे भाग आहे.** तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे त्यांच्या वरील कृतीवरुन दिसून येते. याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील आपले कर्तव्य या प्रकरणी आवश्यक त्या गांभीर्याने पार पाडले नसल्याचे आयोगास दिसून आले आहे. सुनावणीची तारीख ०९ जून २००६ असतांना अपिलार्थीस सुनावणीचे निमंत्रण त्यांनी ०८ जून २००६ रोजी पोस्टात टाकले यावरुन त्यांचा या प्रकरणी सुनावणी घेण्याचा उद्देश होता किंवा कसे यावर शंका घेण्यास भरपूर वाव दिसत आहे व परिणामी त्यांचे वर्तन या प्रकरणी संशयास्पद ठरत आहे.

जी माहिती अपिलार्थीस दिनांक १२-०२-२००६ पुर्वी जन माहिती अधिकारी यांनी देणे भाग होते ही माहिती अपिलार्थीस देण्याची तयारी त्यांनी दिनांक २३-०८-२००७ रोजी दर्शविली म्हणजेच **त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी विहित कालावधीपेक्षा एक वर्ष सहा महिने ११ दिवस इतक्या विलंब लावला असल्याचे दिसून येते.** जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यापोटी असमर्थनीय विलंब लावल्याचे या प्रकरणी पुरेपुर सिध्द होत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) च्या तरतुदी अनुसरुन असे आदेश देण्यात येत आहेत की, सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीस माहिती न देवून त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी,

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून ती २ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीस माहिती न देवून जो कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविला आहे त्याबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनंत दगडू गारदे, व्दारा - ॲड अरुण कानडे, फ्लॅट नं. ८, पुष्कर बिल्डींग, आदिनाथ नगर, जवाहरनगर पोलीस स्टेशन समोर, गारखेडा,

औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३१३
निर्णय दिनांक- १३-०९-२००७

१ श्री.राजेंद्र गुरुराज बहिरे : अपिलार्थी
२७/५२५, माणिक चौक, माणिकनगर,
उस्मानाबाद.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, कळंब,
जिल्हा-उस्मानाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.राजेंद्र गुरुराज बहिरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,कळंब (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तहसीलदार कळंब यांच्यावतीने नायब तहसीलदार, तहसील कार्यालय कळंब श्री.भिमराव शेटीबा मस्के हे हजर आहेत. जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, श्री.प्रकाश बाबुराव खपले (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आज सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी हे विनापरवानगी गैरहजर राहील्याचे आयोस दिसून आले आहे. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी, आयोगा समोरील सुनावणीस विनापरवानगी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याचे आत सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१८-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील केरोसीन विक्रेत्यांची व त्यांच्याकडील या विषयाची असलेली संगणकातील माहिती मागितली असून याच विषयातील

काही संचिकाची पहाणी करण्यासाठीचा अर्ज दिला होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली असून माहितीचा कालावधी जानेवारी २००४ ते डिसेंबर, २००५ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये – तालूक्यातील टक्केवारीनूसार गावनिहाय / विक्रेतानिहाय केरोसीन निश्चीती केलेल्या पत्रकाच्या झेरॉक्स प्रती, गॅसधारक व कार्डधारकांच्या गावनिहाय संख्या, केरोसीन वितरक व जिल्हा पुरवठा अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी या कार्यालयाला केलेल्या पत्रव्यवहाराची पाहणी, तसेच ऑगस्ट २००५ ते डिसेंबर, २००५ या महिन्यातील प्रपत्र अ व ब च्या झेरॉक्स प्रती व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या संगणकातील सर्व माहिती सी.डी. व्दारे देण्या विषयी – या मुद्यांचा समावेश होतो.

त्याच बरोबर अपिलार्थीने ब-याचशा रॉकेल किरकोळ विक्रेत्यांची नावे या अर्जात नमूद केली आहेत. त्यांच्या केरोसिन वितरणा संदर्भातील नस्तीची पहाणी करण्यास परवानगी देण्याची विनंती जनमाहिती अधिकारी यांनी या अर्जात पुढे केली आहे. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक- २१-०१-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देण्यात आला. त्यामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधितांकडून मागविली असल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न प्राप्त झाल्यामूळे अपिलार्थीने,माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०३-०३-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांचे दिनांक- २०-०३-२००६ रोजी सुनावणी घेवून त्यांचे या अपीला संदर्भातील आदेश दिनांक ३१-०३-२००६

रोजी पारीत केलेले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून या माहिती संदर्भातील आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करुन घेवून विहित मुदतीत माहिती देण्याचे सूचित केले आहे. मध्यंतरीच्या काळात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांना देण्यापोटी रुपये ९०३८ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे त्यांचेकडील दिनांक- १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. जनअपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने,माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ३०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

सदर अपील करण्याचे कारण म्हणून त्यांनी, त्यांना अद्याप माहिती प्राप्त न झाल्यामूळे व अवाजवी शुल्क कळविल्याबद्दल, अशी दिली आहेत.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामूळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये जी विनंती केली आहे. तीचा विचार करण्यात येत आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवल्याचे व ही माहिती देण्यापोटी त्यांच्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अवाजवी शुल्क लावल्याचे म्हटले आहे.

जनमाहिती अधिकारी  यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या तरतूदीपेक्षा जास्त विलंबाने माहिती देण्याचे कारण त्यांना आज रोजी सांगता येणार नाही. त्यांच्या या विधानावरुन अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी आयोगा समोर एकच मुद्दा मांडला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वयें ही माहिती देण्यापोटी  रक्कम रुपये ९०३८ इतकी भरणा करुन तदनंतर माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले होते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दिनांक- १८-०१-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्या संदर्भात दिनांक- १७-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी आपला निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये कळविणे भाग होते. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यापोटी त्यांना काही शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन घेण्याची गरज वाटत होती तर ते शुल्क अपिलार्थीस भरण्याची सूचना त्यांनी दिनांक- १७-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी करावयास हवी होती. तसे न करता त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये ( म्हणजेच विहित मुदतीनंतर ) ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क भरण्याचे त्यांना कळविले. जनमाहिती अधिकारी यांच्या दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीला त्यांनी मागितलेली किती पृष्ठांची व प्रतिपृष्ठ दर किती आहे, हे कळविले नाही. अपिलार्थीस माहिती व या शुल्काचा तपशील विहित मुदतीत न देवून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील (७) (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे आयोगास दिसून आल्याने व त्याव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने त्या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीनूसार त्यांच्यावर कार्यवाही करण्यास पात्र ठरतात.

वरील घटनाक्रम पहाता, असे आदेशित करण्यात येते की-

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामूल्य व सांक्षाकित करुन द्यावी.

२. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या नस्तीची / अभिलेखाची पहाणी करण्याची विनंती जनमाहिती अधिकारी यांना केली आहे त्या सर्व नस्त्या/ अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.

३. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये वरीलप्रमाणे दर्शविलेल्या कर्तव्यपराणतेच्या अभावा बद्दल त्यांच्यावर सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१४. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामुल्य व सांक्षाकित करुन पुरवावी.

१६. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या नस्तीची / अभिलेखाची पहाणी करण्याची विनंती जनमाहिती अधिकारी यांना केली आहे त्या सर्व नस्त्या/ अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.

१७. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये वरीलप्रमाणे दर्शविलेल्या कर्तव्यपराणतेच्या अभावा बद्दल त्यांच्यावर सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- १३-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिक चौक, २७/५२५, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळंब ,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळंब, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०३
निर्णय दिनांक- १३-०९-२००७

१ श्री.निहाल हाशिम मोंहमद आझमी, : अपिलार्थी
बजंरगवाडी प्लॉट नं.२६, गुरुवार वॉर्ड, मालेगाव
जिल्हा- नाशिक.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, : प्रतिवादी

इमारत व अतिक्रमण विभाग,
मालेगाव महानगरपालिका मालेगाव, जिल्हा-नाशिक

२. जनअपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, मालेगाव महानगरपालिका मालेगाव,
जिल्हा-नाशिक.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. निहाल हाशिम मोंहमद आझमी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत व अतिक्रमण विभाग, मालेगाव महानगरपालिका मालेगाव, श्री. मनोहर त्र्यंबक आहिर (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, श्री.प्रदीप उमाकांत येवले (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मालेगाव नगरपरिषद हद्दीतील गुरुवार वार्ड स.नं.२२१/२२२ (२५५) प्लॉट नंबर २६ बजरंगवाडी या प्लॉटवर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीची नक्कल देणे बाबत, (दिनांक- ०१-०१-१९९२ ते पुढील कालावधीमधील) खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१ महानगर पालिका हद्दीतील गरुवार वॉर्ड स.नं. २२१/२२२/ (२५५) प्लॉट नं.२६, बजरंगवाडी या प्लॉटावर बांधकाम करण्यापुर्वी संबंधीत प्लॉट

मालकांनी कार्यालयाकडून बांधकाम परवानगी घेतली आहे का? घेतली असल्यास परवानगीची साक्षांकीत नक्कल मिळणेस विनंती आहे.

२. जर वरील ठिकाणी बांधकाम करण्याकरिता प्लॉट मालकांनी बांधकाम परवानगी घेतली नसल्यास व बिना परवानगी बांधकाम करुन घेतले असल्यास आपल्या कार्यालयाकडून प्लॉट मालकां विरुध्द व बिना परवाना बांधकाम बाबत काही कारवाई करण्यात आलेली आहे का ? कारवाई केली असल्यास संबंधीत नोटीस, चौकशी अहवाल इत्यादीची सांक्षाकित नक्कल मिळणे विनंती आहे.

अपिलार्थीने ही माहिती नगरपरिषद कर्मचारी / शिपाई यांच्या व्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक-०६-०२-२००४ (वर्ष चुकून पडले आहे प्रत्यक्ष २००६ असे आहे.) माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती प्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर म्हणजे कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी कशी टाळाटाळ करावी याचे मुर्तीमंत उदाहरण आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीने ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी निश्चीत किती फी भरावयास हवी, याचा उल्लेख नाही. या उलट अपिलार्थीने मागितलेली माहिती संदीग्ध स्वरुपाची असल्याचा अभिप्राय नोंदवून "ही माहिती देता येईल" अशा अर्थाचे मोघम विधान केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

संबंधित अपिलाची जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २४-०२-२००६ रोजी सुनावणी घेतली व सदर अपीलावर सुनावणीचा निर्णय जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०७-०६-२००६ रोजी पारीत केला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती संयुक्तीक असल्याचे नमूद करुन संबंधित बाब न्यायप्रविष्ठ असल्याने अपिलार्थीने अपेक्षिलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती न्यायालयाच्या आदेशानंतर देण्यात येतील, असे कळवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०८-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची व त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतूद ७ (६) अन्वये मोफत माहिती पुरविण्याचे आदेश पारीत करण्या संदर्भात आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात आयोगास सादर केले असून, त्यांच्या विषयाचा ऊहापोह वर उल्लेखलेल्या प्रमाणे केला आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक- ०६-०२-२००६ रोजी अपेक्षित असलेली माहिती पुरविली आहे. (या पत्रामध्ये दिनांक ०६-०२-२००४ अशी चुकीने तारीख पडलेली आहे.) असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

वरील घटनाक्रम व जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर पहाता, वर उल्लेखिलेल्या प्रमाणे जनमाहिती अधिका-याने अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविलेली

नसल्याचे दिसून येते. त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी किती शुल्क भरावे, याचाही या पत्रामध्ये उल्लेख नाही. फक्त ही माहिती अभिलेख विभागाकडून एकत्र करुन घेवून देता येईल. अशा अर्थाचे मोघम विधान केले. त्यामूळे अपिलार्थीस निश्चीतपणे माहिती देण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन नाहीच उलट अपिलार्थीने मागितलेली माहिती ही संदीग्धस्वरुपाची असल्याचा संभ्रम निर्माण करुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे. हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क त्याचा तपशील न कळवून व स्पष्टपणे माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्टपणे दर्शविला आहे, असे आयोगाचे मत आहे. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की-

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाचे आत त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सांक्षाकीत करुन व विनामूल्य द्यावी.
२. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी वर निर्देशित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या त्यांच्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर आयुक्त महानगरपालिका मालेगाव यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१८. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१९. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाचे आत अपिलार्थीने मूळअर्जा व्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सांक्षाकीत करुन व विनामूल्य द्यावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी वर निर्देशित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर आयुक्त महानगरपालिका मालेगाव यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- १३-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.निहाल हाशिम मोंहमद आझमी बजंरगवाडी, प्लॉट नं.२६, गुरुवार वॉर्ड, मालेगाव, जिल्हा- नाशिक.

२. जनमाहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत व अतिक्रमण विभाग, मालेगाव महानगरपालिका मालेगाव,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा,नगर रचनाकार, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५०५**

**दिनांक १३-०९-२००७**

श्री. दे. म. अकोलकर, : अपिलार्थी
३३ (अ) ''रेणुका'' छत्रपतीनगर, गारखेडा
परिसर, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र
वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई – ४०० ००८

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,

डॉ. आनंद नायर मार्ग, मुंबई – ४०० ००८

(प्रत्यक्ष : माहिती अधिकारी – विभागीय वाहतूक अधिकारी,
अपिलीय अधिकारी --- महाव्यवस्थापक, (वाहतूक))

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दे. म. अकोलकर व जन अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक वाहतूक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (वाहतूक) श्री. शशिकांत दामोधर माईनहळीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी, श्री. वसंत सुखदेव बच्छाव सध्या उप महाव्यवस्थापक वाहतूक (आवेदन) रा. प. प्रादेशिक कार्यालय, पुणे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा-कडे दिनांक १६-०१-२००६ रोजी केलेल्या अर्जासंबंधी काय कारवाई झाली याची याची सद्यस्थिती जाणून घेण्याकरिता व एस. टी. स्थानकावरील कॅन्टीनमध्ये पॅक वस्तुच्या विक्री संदर्भात वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. दिनांक ०१-०६-२००६ रोजी पत्र क्रमांक ८१०६ व्दारे मा. श्री. उत्तमराव खोब्रागडे, भाप्रसे, उपअध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, रा. प. मुंबई यांना सादर केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कारवाई जाणून घेणे.

२. एस. टी. स्थानकावरील कॅन्टीनमध्ये पॅक वस्तुवरील छापील किंमतीपेक्षा ज्यादा दराने त्या वस्तू विकण्याची महामंडळाने हॉटेल चालकांना परवानगी दिली आहे, नसल्यास येथे छापील किंमतीतच माल विकला जातो याच्या पाट्या ग्राहक / प्रवाशांच्या हितासाठी कॅन्टीन मध्ये लावलेल्या आहेत काय ?

सदरील माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अंशतः माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने एस. टी. महामंडळाकडे दिनांक १६-०१-२००६ रोजी एक तक्रार अर्ज दिला होता त्या तक्रार अर्जावर पुढे काय कारवाई झाली हे जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २ मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी एका मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००६ रोजी वरील पत्रान्वये माहिती दिली तथापि अपिलार्थीचा मूळ तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ खाली केलेल्या अर्जातील एका मुद्दयावर ते लागलीच माहिती देवू शकले नाहीत त्यामुळे अपिलार्थीने केलेल्या मूळ तक्रार अर्जाची प्रत त्यांना अपिलार्थीकडून मागवून घ्यावी लागली. त्याप्रमाणे त्यांनी ती अपिलार्थीशी, त्यांच्या औरंगाबाद येथील कार्यालयामार्फत संपर्क साधून सदर अर्जाची प्रत साधून दिनांक ११-०५-२००६ रोजी प्राप्त करुन घेतली. सदर तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस पहिल्या मुद्दयावर

त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सर्व माहिती विनामूल्य दिली.

तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीस अधीन राहून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिका-याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन बार्शी ते बीड या सरळ मार्गाने, व बार्शी ते बीड व्हाया इंदापूर वाशी या मार्गाच्या तिकिट दरा संदर्भात व वेळेचा अपव्ययासंदर्भात जास्तीची माहिती मागितली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद आहे असे गृहीत धरण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला आहे की, त्यांना मूळ अपिलार्थीने एस. टी. चे उप अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या कार्यालयाकडे केलेल्या दिनांक १६-०१-२००६ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत प्राप्त झाली नव्हती त्यामुळे

त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००६ रोजी एका मुद्दयावर माहिती दिली व तदनंतर अपिलार्थीकडून दिनांक ११-०५-२००६ रोजी व अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००६ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविलेल्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मूळ पत्राव्दारे मागणी केलेल्या माहितीपेक्षा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये जादा मागणी केल्याचे व त्याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आता प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २१-०६-२००६ रोजीचे सदर पत्र मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने दिलेली पोच पावतीची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे.

अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता मिळाली असल्यामुळे व आजच्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत हे पाहता आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ) “रेणुका” छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी, एस. टी. वाहतूक खाते, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई – ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक वाहतूक म.रा.मा.प. महा मंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंद नायर मार्ग, मुंबई – ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५१०
निर्णय दिनांक- १४-०९-२००७

१ सुभाष नामदेव जाधव, : अपिलार्थी
सी-५०/१ ११ वी योजना, सिडको, शिवाजीनगर,
औरंगाबाद.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
पोलीस आयुक्त, औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री.एस.व्ही.मेंडके (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचे तर्फे पोलीस उपआयुक्त, श्री.एम.बी.तांबडे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-२६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस आयुक्त कार्यालयात २००६ या वर्षात त्यांच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने या केलेल्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद दिला गेला नसल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-०६-२००७ रोजी झाली.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत सुनावणी न झाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०३-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. याची नोंद घेण्यात आली. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असणारी माहिती त्यांच्याकडील दिनांक- १४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक- २०-०५-२००७ रोजी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस दिनांक- २०-०५-२००७ रोजी माहिती दिल्यानंतर प्रथम अपीलअर्जावर दिनांक- ०७-०६-२००७ रोजी अपिलाची सुनावणी का घेतली, असे जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता अपिलार्थीने त्यांच्याकडे अपिल केले असल्यामूळे व ते अपिल निकाली काढण्यासाठी त्या अपिलाची अपिलार्थीस माहिती दिल्यानंतर दिनांक- ०७-०६-२००७ रोजी त्यांनी सुनावणी घेतल्याचे कबूल केले. जनअपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या सुनावणीच्या विवरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याचे कबूल करुन त्यांचेकडील दिनांक- ०७-०८-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपील अर्ज निकाली काढण्यात यावे, अशी विनंती अपिलार्थीने केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस आता माहिती मिळाली असल्याने व त्यांनी मूळात प्रथम अपील निकाली काढण्यात यावे अशी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या दिनांक- ०७-०६-२००७ रोजीच्या सुनावणीमध्ये विनंती केल्यामूळे त्यांचा दिनांक ०३-११-२००६ रोजीचा राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यास आयोगास कोणतेही कारण उरत नाही.

तथापि या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मधील तरतूदी मध्ये कार्यवाही केली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यामध्ये प्रत्यक्ष जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती पुरविण्यास जबाबदार असणारे इतर कर्मचारी / अधिकारी हे देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) नुसार जनमाहिती

अधिकारी म्हणून तितकेच जबाबदार ठरतात. सबब अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल जनमाहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे. तव्दतच जनअपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या अनुषंगाने त्यांच्याकडे वेळोवेळी जी अपीले दाखल होतील त्याचा त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी घ्यावी व भविष्यात प्रथम अपील प्रकरणी सुनावणी घेण्यामध्ये विलंब टाळावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे.

३. जनअपिलीय जनअपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या अनुषंगाने त्यांच्याकडे वेळोवेळी जी अपीले दाखल होतील त्यामध्ये त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी घ्यावी व भविष्यात प्रथम अपील प्रकरणी सुनावणी घेण्यामध्ये विलंब टाळावा.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- १४-०९-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.सुभाष नामदेव जाधव, सी-५०/१, ११ वी योजना सिडको, शिवाजीनगर,

औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद ,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५११**

**दिनांक १४-०९-२००७**

श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
एन. ११, के. ४०/४, नवजीवन कॉलनी,
हडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कल्याण सोपानराव सोनवणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. महमद अब्दुल खालीक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे गैरहजर आहेत.

सुनावणी संपत असतांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विवेक विश्वंबर गुजर हे हजर झाले.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे चैतन्यपुरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत ज्ञानप्रकाश विद्यामंदिर, औरंगाबाद, जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत प्राथमिक शाळा, औरंगाबाद, व्ही. ए. जाधव इंग्लीश मेमोरियल स्कूल औरंगाबाद यासंबंधीची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ सदरील संस्थेची मान्यता प्रत किती वर्गापासून किती वर्गापर्यत मान्यता दिली त्याची संच मान्यता सत्यप्रत,

२.  सदरील संस्थेतील आवश्यक असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता प्रत,

३.  सदरील संस्थेवर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने केलेल्या निरीक्षण अहवालाची सत्यप्रत,

४.  संस्था मान्यतेसाठी शासनास शिफारस करुन पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत,

५.  सदरील संस्थेचे मुख्याध्यापकाचे मत्ता व दायित्वाचे विवरण पत्राची सत्यप्रत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली होती व सदर माहितीचा कालावधी संस्थेची मान्यता प्राप्त झाल्यापासून ते २८-१२-२००६ पर्यत असा दर्शविला होता.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देवून अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी एकूण ६ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यास कळविले. तदनंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता त्यांनी अपिलार्थीस २६ रुपये इतक्या रकमेचे चलन अपिलार्थीस भरुन दिले. अपिलार्थीस ६ रुपये इतके शुल्क भरण्यास कळविले असतांना एकूण २६ रुपयाचे चलन कसे करण्यात आले याची विचारणा करण्यात आली असता अपिलार्थीस सुरुवातीस लिहिलेल्या पत्रात विनंती केलेल्या शाळेच्या तपासणी अहवाला-च्या प्रतीचा या प्रस्तावित माहितीमध्ये समावेश जन माहिती अधिकारी यांनी केला नव्हता तथापि तो नंतर केल्याने अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या पृष्ठांची संख्या वाढली व त्यामुळे ही माहिती देण्यापोटी लागणा-या शुल्कात वाढ करावी लागली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

पुढे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता अपिलार्थीस त्यांनी २६ रुपये इतक्या रकमेचे चलन भरुन दिले तथापि अपिलार्थीने हे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावर अपिलार्थी यांना शुल्क का भरले

नाही अशी विचारणा केली असता अपिलार्थीने असे सांगितले की, सदर शुल्क भरण्यापुर्वी त्यांनी संबंधीत लिपिक (श्री. दिगंबर लक्ष्मण जाधव, कार्यालयीन सहाय्यक) यांच्याकडे देण्यासाठी प्रस्तावित असलेल्या माहितीची पाहणी केली असता त्यांनी मागणी केलेली माहिती व त्यांना देण्यासाठी प्रस्तावित केलेली माहिती या दोन्ही माहिती मध्ये त्यांना भिन्नता आढळल्याने त्यांनी सदर शुल्क भरले नाही.

अपिलार्थीने शुल्क न भरता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली किंवा कसे या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर काहीही खुलासा करु शकले नाहीत. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा त्यांच्या अपील अर्जासंदर्भात त्यांना कोणता-ही निर्णय कळविलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती सर्वस्वी गैर आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य या प्रकरणी योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे दिसून येते. त्यांनी सुनावणी घेतली नाही, अपिलार्थीस त्यांच्या अपिला-संदर्भात निर्णय कळविला नाही, या त्यांच्या कृतीवरुन त्यांना माहिती अधिकार कायद्याशी त्यांचे काहीही घेणे-देणे नसून या कायद्याप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर व्यक्त केला आहे. त्यांच्या या कृतीची नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीन्वये दिनांक ०७-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाचा जिल्हा परिषदेमध्ये कोणत्याही स्तरावर

विचार केला गेला नसल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे व पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ चा अवमान केल्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी बरेच प्रयत्न करुनही त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिका-याकडून मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलाची सुनावणी घेतली नाही त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही हवी आहे व त्याच बरोबर संबंधीत जन माहिती अधिका-यावर दंडात्मक कारवाई करावी अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००७ रोजी व दिनांक २०-०३-२००७ रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपोटी लागणारे आवश्यक ते शुल्क भरण्याची अपिलार्थीस विनंती केली होती.

अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००६ रोजी ज्या माहितीकरिता अर्ज केला आहे त्या माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. त्यांनी सुनावणीमध्ये वर केलेली विधाने ही अपिलार्थीच्या दिनांक २८-१२-२००६ च्या अशाच प्रकारच्या परंतु वेगळ्या संस्थेसंदर्भात मागितलेल्या माहितीशी संबंधीत आहे. अपिलार्थी यांनी एकाच दिवशी एकसारखी माहिती असलेल्या वेगवेगळ्या संस्था संदर्भातील अर्ज जिल्हा परिषदेकडे दाखल केले असल्याने हा गोंधळ झाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपरोक्त प्रकरणी विचाराधीन असलेल्या माहितीशी संबंधीत असलेला अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या

प्रथम अर्जाच्या प्रतीमध्ये त्यावर जिल्हा परिषद कार्यालयाकडून त्याची पोच घेतल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे सदर अर्ज प्राप्त नाही हा जन माहिती अधिकारी यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क आहे व ती विहित मुदतीत पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे हे सर्वसाधारण तत्व — जे माहिती अधिकार अधिनियमाचा कणा आहे — पाहता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००६ रोजी केलेल्या अर्जात ज्या माहितीचा उल्लेख करण्यात आलेला आहे -- ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, -- सदरील माहितीतील मुद्दा क्रमांक ५ सोडून अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचे दिसून न आल्याने त्यांच्या विरुध्द दंडात्मक कार्यवाहीचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००६ रोजी केलेल्या अर्जात ज्या माहितीचा उल्लेख करण्यात आलेला आहे -- ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी -- सदरील माहितीतील मुद्दा क्रमांक ५ सोडून, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचे दिसून न आल्याने त्यांच्या विरुध्द दंडात्मक कार्यवाहीचे आदेश नाही.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १४-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन. ११, के. ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

## अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५८९

**दिनांक १४-०९-२००७**

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभाकर पाटील,<br>३५, म्हाडा, एच. आय. जी. कॉलनी,<br>शहानूरमियॉ दर्गा, रेल्वे गेट जवळ,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उप आयुक्त, महानगरपालिका (म),<br>औरंगाबाद (सध्या प्रशासकीय अधिकारी) | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद<br>( सध्या उप आयुक्त (म.)) | : | प्रतिवादी |

### विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०९-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रभाकर पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महा नगरपालिका श्री. बिपीन आबाजी वाहूळ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (म.) महानगरपालिका श्री. उध्दव घुगे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी " दिनांक २८-१०-२००५, २२-१२-२००५, २९-०४-२००६ व १०-०५-२००६ रोजी अतिक्रमण हटविणे व अनाधिकृत बांधकाम पाडण्याबाबत केलेल्या अर्जावर झालेल्या कारवाई संदर्भातील माहितीच्या सत्यप्रती " मागितल्या होत्या.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली असून अपेक्षित माहितीचा कालावधी २००५-२००६ हे आर्थिक वर्ष असल्याचे त्यांनी त्यांच्या अर्जात उल्लेख केला होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी केलेल्या अर्जातील प्रकरणाची संबंधीत वस्तुस्थिती कळवून अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती देण्यापोटी त्यांच्या कार्यालयात रुपये १० इतके शुल्क भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०१-०८-१००६ चे पत्र त्यांना दिनांक १०-०८-२००६ रोजी प्राप्त झाले व तदनंतर त्यांनी दिनांक ११-०८-२००६ रोजी ही माहिती पुरविण्यापोटी रुपये १०

इतके शुल्क महानगरपालिका पावती क्रमांक १८३९४० व्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत केला. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या अर्जावर केलेल्या कारवाईचा अहवाल त्यांना दिनांक ३०-०८-२००६ रोजी सादर करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या अर्जावर केलेली कारवाई कळविली असून याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पंचनामा व नोटीसच्या सत्यप्रती त्यांना देण्यापोटी रुपये १० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याची सूचना अपिलार्थीस दिली आहे. हे पत्र अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. तथापि हे पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्याकडे आता कोणताही पुरावा (जावक रजिस्टरची सत्यप्रत) उपलब्ध नाही. सदर पत्र अपिलार्थीस पोहोचले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना

अद्यापही हवी आहे.  ही माहिती मिळण्याप्रित्यर्थ त्यांनी महानगरपालिकेत आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना आजपर्यत ही माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती आज त्यांच्याकडे तयार असून ते ती माहिती सत्वर व एका दिवसात अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील विवेचनावरुन व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देणे सहज शक्य होते, तथापि त्यांनी नियमातील विहित मुदत संपता संपता एक दिवस आधी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये १० त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क भरण्यासंदर्भातील जन माहिती अधिकारी यांचे पत्र दिनांक १०-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने लगेचच दुस-या दिवशी दिनांक ११-०८-२००६ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केला.  अपिलार्थीने शुल्क भरल्या-नंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोहोचविण्याची व्यवस्था करणे हे जन माहिती अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य होते.  या प्रकरणी अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली होती त्यामुळे अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तयार असल्याचे व ती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः घेऊन जाण्याचे अपिलार्थीस वेळीच सूचित करणे सर्वसाधारण कार्यालयीन पध्दतीनुसार अपेक्षित होते तथापि त्यांनी तसे केले नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ माहितीचा त्यांच्या अपील निर्णयामध्ये फारसा विचार केल्याचे दिसून येत नाही.  अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर मनपा अधिका-यांनी काय कारवाई केली यासंदर्भात माहिती हवी होती.  याचा अर्थ अपिलार्थीने मनपाकडे अर्ज केल्या-

नंतर या विषयावर जो काही पत्रव्यवहार झाला असेल त्याच्या प्रती अपिलार्थीस अपेक्षित होत्या तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या तक्रारीवर केलेल्या कारवाईचा अहवाल मागितला. केलेल्या कारवाईचा अहवाल व अपिलार्थी यांनी अपेक्षित केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती या दोन्ही बाबी भिन्न आहेत असे आयोगाचे मत आहे.

एकंदरीत, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी हे आवश्यक ते शुल्क भरुनही माहिती मिळण्यापासून विनाकारण वंचित राहिले हे या प्रकरणी सिध्द होते. अपिलार्थी यांनी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण करुनही त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळण्यास संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे जबाबदार ठरतात. या प्रकरणी अपिलार्थी यांनी आवश्यक ते शुल्क भरण्यात जी तत्परता दाखविली आहे तितक्याच तत्परतेने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविणे अपेक्षित होते. त्यांनी या प्रकरणी दाखविलेल्या निष्काळजीपणाबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून यापुढे भविष्यात त्यांच्या कडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तदतुदीनुसार दाखल झालेल्या अर्जावर त्यांनी नियमामध्ये उल्लेखलेल्या विहित कालावधीमध्ये सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन आवश्यक ती कारवाई करावी अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे व अशा चूका त्यांनी भविष्यात टाळाव्यात अशी ताकीदही त्यांना याचबरोबर देण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी विहित शुल्क भरुनही त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी एक दिवसाच्या आत साक्षांकीत करुन व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत. अपिलार्थी यांनी ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी महानगरपालिकेकडे भरलेले शुल्क रुपये १० त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाच्या आत परत करावेत. जन माहिती अधिकारी यांना वर दिलेल्या ताकीदीची नोंद यथायोग्यरित्या महानगरपालिका आयुक्त यांनी घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या त्यांच्या कार्यशैली मधील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे याची महानगरपालिका आयुक्तांनी यथायोग्य नोंद घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी ही माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ दिनांक ११-०८-२००६ रोजी पावती क्रमांक १८३९४० व्दारे भरलेले शुल्क रुपये १० त्यांना, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी परत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १४-०९-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर पाटील, म्हाडा, एच. आय. जी. कॉलनी, शहानूरमियॉ दर्गा, रेल्वे गेट जवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महानगरपालिका (म), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती